इचलकरंजी ICHALKARANJI ▶ वर्ष - ४१ ▶ अंक - २९७ ▶ रविवार,ता.१ मार्च २०२६ ▶ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

एस. टी. महामंडळाचे (NCMC) स्मार्ट कार्ड काढून मिळेल. (सवलतीचे कार्ड) अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, दिव्यांग, प्रवासी सर्वांचे कार्ड काढून मिळेल.
भांबुरे मोबाईल शॉपी
सांगली रोड, आसरानगर बस स्टॉप समोर, इचलकरंजी. मो. ८२७५५३६७७२, ७६२०७६२०४७, ७३८५०३७५५५
वेळ : सकाळी ९ ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत
* सुट्टी दिवशीही चालू राहील. *

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

अथर्व होम्स
* 3 BHK चे १२ रो हाऊसचे प्रोजेक्ट
* १४०६ स्क्वे. फुट बांधकाम ८७५ स्क्वे. फुट जागा.
* सॅंपल (पाहण्यासाठी) रो हाऊस तयार आहे.
* आकर्षक - ३० फुटी रोड, रो हाऊस सभोवती संरक्षण भिंत.
पत्ता - शिक्षक कॉलनी, आयकॉन पार्क लगत आमराई रोड, इचलकरंजी.
संपर्क - पंकज बुद्धराज सोनी
8496998091

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# अमेरिका,इस्त्रायलचा इराणवर हल्ला

## इस्त्रायलसह यूएई,अबुधाबी,कुवेत,कतार,बहरीनवर इराणने क्षेपणास्त्रे डागली



इस्रायलने हल्ले केल्यानंतर इराणमध्ये विविध ठिकाणी धूराचे लोट असे दिसून येत होते.

तेहरान,ता.२८-

मध्य-पूर्वेत पुन्हा एकदा युध्दाचे ढग दाटून आले असून अमेरिका आणि इस्रायलने शनिवारी सकाळी इराणवर एकाच वेळी ३० ठिकाणी हल्ले केल्याने युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. इस्रायल-अमेरिकेच्या या लष्करी कारवाईत इराणमधील एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात ५१ विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच ६०हून अधिक मुली जखमी झाल्या आहेत. इराणच्या सरकारी माध्यमांनी याला दुजोरा दिला असून, या घटनेमुळे जगभरात संतापाची लाट उसळली आहे. निष्पाप शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याने या संघर्षाला अधिक गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे.दरम्यान,आम्ही इराणला अण्वस्त्रधारी देश बनू देणार नाही, असा थेट इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.



अमेरिका आणि इस्रायलच्या या हल्ल्यानंतर इराणनेही प्रत्युत्तर देत तब्बल ५ देशांवर हल्ले केले. इराणने इस्रायलवर मिसाइल हल्ले केले त्याशिवाय आखाती देशांमधील कुवेत, बहरीन, अबु धाबी, कतार या ठिकाणीही हल्ले केले. त्यामुळे आखाती देशांनी आपल्या हवाई हद्द बंद केल्या आहेत. अमेरिकेकडून झालेल्या

### निर्णायक उत्तर देणार-इराण

अमेरिका आणि इस्रायल यांच्या संयुक्त हल्ल्यानंतर इराणने परकीय दबावापुढे आतापर्यंत कधीही झुकलो नाही. या हल्ल्याचा अमेरिका आणि इस्त्रायलला पश्चाताप होईल, असे निर्णायक उत्तर देऊ, असा इशारा देत संयुक्त राष्ट्रांनी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणीही केली आहे.आणि या वेळी त्याला निर्णायक आणि ठोस उत्तर देऊ.

- मध्य पूर्वेत युध्दाची ठिणगी
- ..अन्यथा मृत्यूला सामोरे जा; ट्रम्प यांची इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांना धमकी
- इराणमधील शाळेवर हल्ल्यात ५१ विद्यार्थिनींचा मृत्यू

हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने अमेरिकेचा सगळ्यात मोठा लष्करी तळ बहरीनमध्येही हल्ला केला. बहरीनमधील नागरिकांच्या सुरक्षेसाठी सायरन वाजण्यास सुरुवात झाली आहे. अमेरिकेच्या जुफैर तळावर इराणकडून हल्ला करण्यात आला. अमेरिका - इस्रायल यांच्या हल्ल्यानंतर इराणने सौदी अरेबिया, कतार, बहरीन यासारख्या देशातील अमेरिकन तळांना टार्गेट केले आहे. त्यामुळे या हल्ल्यात ५ देशांना ओढण्याचा प्रयत्न इराणने केला आहे. सौदी अरेबिया, कुवैत यासारख्या ठिकाणीही इराणने (पान २ वर)

## आंध्रात फटाका कारखान्यात स्फोट;अठरा ठार

### सहा गंभीर जखमी ;मुख्यमंत्री नायडूंचे चौकशीचे आदेश

अमरावती,ता.२८-

आंध्र प्रदेशातील काकीनाडा जिल्ह्यामधील सामरलकोट मंडलच्या वेटलापालेम गावात एका फटाका निर्मिती कारखान्यात भीषण स्फोट होऊन १८ जणांचा जळून मृत्यू तर सहा जण गंभीर जखमी झाले.

जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे



सांगितले जात आहे.स्फोटाच्या वेळी कारखान्यात जवळपास ३० कामगार उपस्थित होते,अशी माहिती आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही महिला कामगार कारखान्याच्या आत स्फोटक साहित्य तयार करत असताना अचानक भीषण स्फोट झाला. स्फोट इतका प्रचंड होता की संपूर्ण कारखान्याची इमारत क्षणात जमीनदोस्त झाली. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कारखान्याचा मालक घटनेनंतर फरार झाला आहे. घटनास्थळावरील (पान २ वर)

### २१५ ग्रॅम सोने लंपास

सातारा,ता.२८(प्रतिनिधी)-

कुरिअर बॉयला मारहाण करून ३२ लाख पाच हजार पाचशे रुपये किमतीच्या २१५ ग्रॅम सोन्याच्या गोळ्या व बार चारचाकी वाहनातून आलेल्या टोळीने लंपास केल्याची घटना साताऱ्यात घडली. याबाबत श्रद्धा ज्वेलर्सचे मॅनेजर नितीन खेमचंद जैन यांनी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

सोन्याचे वितळवलेला मुद्देमाल मुंबई येथील (पान २ वर)

## विमान अपघातात अनेक गंभीर त्रुटी

### २२ पानांचा प्राथमिक अहवाल समोर



मुंबई,ता. २८ -

उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात हवाई उड्डाण मंत्रालयाच्या एएआयबी तपास यंत्रणेचा २२ पानांचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे. त्यामध्ये कमी दृश्यमानता, व्हीएफआर नियमांचे संभाव्य उल्लंघन आणि अनकंट्रोल्ड एअरफिल्डवरील सुरक्षा त्रुटी असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच मार्च २०१६ मध्ये बारामती रनवेची शेवटची दुरुस्ती करण्यात आल्याचेही अहवालात म्हटले आहे.

अजित पवार यांच्या विमानाचा (पान २ वर)

अहवालानुसार, दोन्ही वैमानिक अनुभवी होते आणि ते यापूर्वी बारामतीमध्ये गेले होते. उड्डाणापूर्वी अल्कोहोल चाचण्या घेण्यात आल्या, ज्या सामान्य असल्याचे आढळून आले. शवविच्छेदन अहवालात वैमानिकांच्या मृत्यूचे कारण अनेक जखमा आणि भाजलेल्या जखमा असल्याचे म्हटले आहे.

| रमजान - ११ | |
|---|---|
| इफ्तारी | ०६-४६ |
| सहरी | ०५-३० |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १६२५०० रु. | २७५००० रु. |

अंडी ५४५ रुपये शेकडा

हास्यतुषार -सुरेंद्र दास



अगं आई बाबांसारखा विसरभोळेपणा मला परीक्षेवेळी जाणवू लागलाय..!

## बारावी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थिनीचा हृदयविकाराने मृत्यू

चिक्कोडी,ता.२८(प्रतिनिधी)-

बारावी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थिनीचा हहदाविकाराचा झटक्याने मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी सकाळी बंबलवाड (ता.चिक्कोडी) येथे घडली.भूमिका माळंगी (वय १७) असे विद्यार्थीनीचे नाव आहे.

चिक्कोडी शहरातील चिंचणीच्या पदवी पूर्व कॉलेजमध्ये ती द्वितीय वर्षात शिकत होती. शनिवारी पहिला पेपर असल्याने



परीक्षेसाठी जाण्यासाठी सकाळी लवकर उठून अभ्यास देखील केला.त्यानंतर परीक्षा केंद्राकडे जाण्यासाठी तयार होत असताना अचानक तिला हार्ट अटॅक आला.तातडीने कुटुंबातील सदस्यांनी दवाखान्यात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला.मात्र वाटेतच तिचा मृत्यू झाला.आपल्या उज्वल भविष्यासाठी बारावीची परीक्षा देण्यासाठी जाणाऱ्या या मुलीचा दुर्दैवी अंत झाल्याने तालुक्यासह, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेविषयी खास. प्रियंका जारकीहोळी, पालकमंत्री सतीश जारकीहोळी यांच्यासह मान्यवरांनी दुःख व्यक्त केले आहे.



# अमेरिका,इस्त्रायलचा इराणवर हल्ला

(पान १ वरून)

हल्ले चढवल्यामुळे जागतिक बाजारपेठेत तेल पुरवठा साखळी यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तेल साठ्यावर याचा परिणाम झाल्यानंतर पेट्रोल महागण्याचीही शक्यता आहे.दरम्यान, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने इस्रायलचा हल्ला हा देशाच्या राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा भंग असल्याचे म्हटले आहे.

एकीकडे चर्चा सुरू असताना दुसरीकडे अमेरिका आणि इस्रायलने हल्ला करत संयुक्त राष्ट्र सनदेतल्या कलम २ (४) चे उल्लंघन केल्याचा दावा इराणने केला.

तणाव वाढल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी भूमिगत झाल्याच्या चर्चा सुरू होत्या. मात्र, इराणने नॅशनल सुप्रीम सिक्युरिटी कौन्सिलच्या बैठकीतील त्यांचा फोटो जाहीर केला. यामुळे नेतृत्व सुरक्षित आणि सक्रिय असल्याचा संदेश इराणकडून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**इस्रायलमधील भारतीय नागरिकांसाठी ॲडव्हायझरी जारी**

अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणवर हल्ला केला आहे. तेहरानमध्ये अनेक स्फोट झाले आहेत. =त्यानंतर इस्रायलमधील भारतीय दूतावासाने आपल्या नागरिकांसाठी ॲडव्हायझरी जारी करण्यात आली आहे. इस्त्रालयच्या सध्याच्या सुरक्षा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इस्रायलमधील भारतीय दूतावासाने सर्व भारतीय नागरिकांना इशारा जारी केला आहे. दूतावासाने सर्व भारतीयांना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचे आणि नेहमीच सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. भारतीय नागरिकांना इस्रायली अधिकाऱ्यांनी आणि होम फ्रंट कमांडने जारी केलेल्या सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचा सल्ला दिला आहे.

**तेल अवीवला जाणारे एअर इंडियाचे विमान परतले**

इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यांमुळे इस्रायलचे हवाई क्षेत्र बंद करण्यात आले आहे.यामुळे एअर इंडियाने दिल्ली-तेल अवीव विमान मुंबईकडे वळवले. एअरलाईनने सांगितले की, २८ फेब्रुवारी रोजी दिल्लीहून तेल अवीवला जाणारी फ्लाईट इस्रायलचे हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे तसेच प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या हितासाठी विमान मुंबईकडे वळवण्यात आले आहे. एअर इंडियाने म्हटले आहे की, ते त्यांच्या उड्डाण ऑपरेशन्ससाठी सुरक्षा वातावरणाचे मूल्यांकन करत राहील आणि गरजेनुसार ऑपरेशन्स समायोजित करणार आहेत. हे विमान पाच तासांहून अधिक काळ हवेत होते आणि सौदी अरेबियाच्या हवाई हद्दीत प्रवेश केल्यानंतर एअरलाईनने परतण्याचा निर्णय घेतला.या अचानक झालेल्या परिस्थितीमुळे प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल एअर इंडियानेही माफी मागितली आहे.

## भारतावर परिणामाची शक्यता

**इराण- इस्रायल संघर्ष वाढत गेल्यास पश्चिम आशियात मोठ्या प्रमाणावर युध्दजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संघर्षाचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित न राहता जगभर जाणवू शकतो. इराण हा महत्त्वाचा तेल उत्पादक देश असल्याने युद्ध दीर्घकाळ चालल्यास जागतिक इंधन पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची भीती आहे. परिणामी कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये मोठी उसळी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.अमेरिका, रशिया आणि चीनसारख्या महासत्तांची भूमिका निर्णायक ठरू शकते. भारतासारख्या देशांवरही याचे परिणाम तेलपुरवठा, व्यापार आणि सुरक्षेच्या दृष्टीने होऊ शकतात.इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू याच्या मते, इराणमधील अयातुल्ला खामेनी शासनाने गेल्या अनेक दशकांत इस्रायल आणि अमेरिके विरोधात कारवाया केल्या असून त्यांना अण्वस्त्रे मिळू देणे हे संपूर्ण मानवजातीसाठी धोकादायक ठरेल.**

**इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाच्या विरोधात इस्रायल आणि अमेरिकेने आघाडी उघडली आहे. इराणने इस्रायलच्या पाठोपाठ अमेरिकेच्या विरोधात युध्द जाहीर केले आहे. इराणने मध्य पूर्वेतील अमेरिकेच्या सात लष्करी तळांवर इराणने बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी मारा केला आहे. त्यामुळे अमेरिकेच्या सैन्य तळांवर खळबळ उडाली आहे.**

# मध्य-पूर्वेत तणाव शिगेला अर्थव्यवस्थेची चिंता वाढली

मुंबई,ता.२८-

**मध्य-पूर्वेत पुन्हा एकदा युध्दाचे ढग दाटून आले असून इराणवर इस्रायल आणि अमेरिकेने संयुक्त हल्ला केला. इस्रायलने आपल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी राहण्याचे आवाहन केले आहे.**

या संघर्षाचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित न राहता जगभर जाणवू शकतो. इराण हा महत्त्वाचा तेल उत्पादक देश असल्याने युध्द दीर्घकाळ चालल्यास जागतिक इंधन पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची भीती आहे.परिणामी कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये मोठी उसळी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.भारताच्या तेलाच्या सुमारे ८० टक्के गरजा आयातीद्वारे भागवल्या जातात.त्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत प्रति बॅरल एका डॉलरची वाढ झाली तरी भारताचे वार्षिक आयात बिल सुमारे ९,००० कोटी रुपयांनी वाढू शकते.याचा थेट परिणाम अर्थव्यवस्था आणि सर्वसामान्यांवर होण्याची शक्यता आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढेल आणि त्याचा परिणाम अन्नधान्य तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तूंवर होऊन महागाई वाढू शकते.

कच्च्या तेलासोबतच नैसर्गिक वायूच्या किंमतीतही वाढ होण्याची शक्यता आहे. एलपीजी, सीएनजी तसेच विमान इंधन महाग झाल्यास घरगुती गॅसपासून विमान प्रवासापर्यंत सर्वच क्षेत्रांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशावर अतिरिक्त भार पडण्याची शक्यता आहे.

**शेअर बाजारात अस्थिरता**

भारतीय शेअर बाजारावरही या घडामोडींचा परिणाम होण्याची शक्यता आहे. आधीच जागतिक संकेतामुळे बाजार अस्थिर असताना मध्य-पूर्वेतील संघर्षामुळे गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते.परदेशी गुंतवणूकदारांनी भांडवली गुंतवणूक कमी केल्यास बाजारात घसरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र विश्लेषकांच्या मते, भारताची अर्थव्यवस्था तुलनेने स्थिर असल्याने परिणाम मर्यादित राहू शकतो. तरीही अल्पकालीन अस्थिरतेची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**भारत-इराण व्यापारावर परिणाम**

अमेरिकेने इराणवर लादलेल्या निर्बंधांमुळे भारत-इराण व्यापारात आधीच घट झाली आहे. २०२४-२५ आर्थिक वर्षात दोन्ही देशांमधील एकूण व्यापार सुमारे १.६८ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका होता. यापैकी भारताने १.२४ अब्ज डॉलर्सची निर्यात केली



तर इराणकडून ०.४४ अब्ज डॉलर्सची आयात झाली होती. नव्या संघर्षामुळे या व्यापारावर आणखी परिणाम होण्याची शक्यता आहे.

**कच्च्या तेलाच्या किमती ९१ डॉलर्सपर्यंत?**

जागतिक तेल उत्पादनात इराणचा वाटा सुमारे ४ ते ५ टक्के आहे. त्यामुळे पुरवठ्यात अडथळा निर्माण झाल्यास तेलाच्या किमती वाढू शकतात.सध्या जागतिक बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल सुमारे ७१ अमेरिकन डॉलर्स आहे. मात्र संघर्ष दीर्घकाळ सुरू राहिल्यास त्या ९१ डॉलर्सपर्यंत जाऊ शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे. तेल दरवाढीमुळे भारताची वित्तीय तूट वाढण्याची आणि रुपयावर दबाव येण्याची शक्यता आहे. परिणामी देशांतर्गत इंधनदर वाढून महागाईचा फटका सर्वसामान्य जनतेला बसू शकतो.एकूणच, मध्य-पूर्वेतील वाढता तणाव जागतिक अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरू शकतो. परिस्थितीवर आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष लागले असून पुढील काही दिवस निर्णायक ठरणार आहेत.

## सुरक्षित गुंतवणुकीकडे कल

**युध्दजन्य परिस्थितीत गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. अशा वेळी सोने आणि चांदीला सुरक्षित गुंतवणूक मानले जाते.जागतिक अस्थिरतेमुळे सोन्या-चांदीच्या किंमतींमध्ये वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.अनेक देशांच्या मध्यवर्ती बँकांनी मागील काही वर्षांत सोन्यात गुंतवणूक वाढवली असून सध्याच्या परिस्थितीत हा कल आणखी वेग घेऊ शकतो.**

## चीन थेट युध्दात उतरण्याचे टाळणार

**अमेरिकेचा मुख्य जागतिक स्पर्धक असलेला चीन, या कठीण प्रसंगात आपल्या इराणच्या मदतीला धावून येईल का? आणि आल्यास, त्या मदतीचे स्वरूप काय असेल? हा सध्याचा सर्वात मोठा राजनैतिक प्रश्न आहे. चीन आपली युध्दनौका किंवा थेट सैन्य इराणच्या मदतीला पाठवणार नाही. चीनची रणनीती थेट लष्करी हस्तक्षेपाऐवजी 'धोरणात्मक पाठिंबा' देण्याची असू शकते. चीनकडून इराणला मिळणाऱ्या मदतीचा सर्वात महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा म्हणजे 'तेल आयात'.अमेरिकेने इराणवर लादलेल्या अत्यंत कडक आर्थिक निर्बंधांनंतरही, चीन हा इराणचा सर्वांत मोठा ऊर्जा भागीदार राहिला आहे. इराणच्या एकूण तेल निर्यातीपैकी तब्बल ९० टक्के तेल एकटा चीन खरेदी करतो.हा केवळ आकडा नाही, तर तो इराणच्या कोलमडलेल्या अर्थव्यवस्थेसाठी जणू 'ऑक्सिजन' ठरला आहे. या अवाढव्य तेल खरेदीमुळेच इराणला पाश्चात्य देशांच्या आर्थिक नाकेबंदीचा सामना करण्यास आणि आपली अंतर्गत व्यवस्था टिकवून ठेवण्यास बळ मिळत आहे.**

# विमान अपघातात अनेक गंभीर त्रुटी

(पान १ वरून)

२८ जानेवारीला बारामती विमानतळानजीक अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या विमान अपघाताप्रकरणी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. याच अपघात प्रकरणाचा प्राथमिक चौकशी अहवाल समोर आला आहे. दुर्घटनेच्या एका महिन्यानंतर प्राथमिक अहवाल आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईहून बारामतीकडे निघालेल्या नॉन-शेड्युल्ड/ फ्लाइटच्या दुर्घटनेबाबतच्या प्राथमिक अहवालात अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. रनवे ११ वर लँडिंगचा प्रयत्न करताना दृश्यमानता मर्यादेपेक्षा कमी असतानाही विमान उतरवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे अहवालात नमूद आहे. पहिल्या प्रयत्नात पायलटने गो आराउंड केले. दुसऱ्या प्रयत्नात पायलटने फिल्ड इन साइट' अशी माहिती दिली. मात्र, त्या वेळी एअर ट्रॅफिक कंट्रोलने तीन किलोमीटर दृश्यमानता नोंदवली होती, जी व्हीएफआर अंतर्गत आवश्यक ५ किलोमीटरपेक्षा कमी होती. लँडिंग क्लिअरन्स मिळाल्यानंतर काही क्षणांतच विमान रनवेच्या डाव्या बाजूला सुमारे ५० मीटर अंतरावर झाडांवर आदळले. त्यानंतर लागलेल्या आगीत विमान पूर्णतः नष्ट झाले.बारामती येथे अधिकृत मेट (हवामान) सुविधा नसल्याची नोंद करण्यात आली आहे. उपग्रह चित्रांनुसार परिसरात हलके धुके ( ) होते. त्याचवेळी पुणे आणि मुंबई येथे २००० ते २५०० मीटर इतकी कमी दृश्यमानता नोंदवली गेली होती. फ्लाईट डेटा रेकॉर्डर मधील डेटा डाउनलोड करण्यात आला असून त्याचे विश्लेषण सुरू आहे. मात्र कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर थर्मल डॅमेजमुळे खराब झाल्याने त्यातील डेटा पुनर्प्राप्तीसाठी अमेरिकेतील एनटीएसबीची मदत घेतली जाणार आहे. अंतिम निष्कर्ष सीव्हीआर डेटा मिळाल्यानंतरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेशासाठी सरकारचे पाऊल

अकोला,ता.२८-

**बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीला अखेर अधिकृत स्वरूप मिळाले आहे. राज्य सरकारच्या आदिवासी विकास विभागाने सहा सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

गेल्या अनेक दशकांपासून बंजारा समाजाची एसटी प्रवर्गात समावेशाची मागणी प्रलंबित आहे. हैद्राबाद गॅझेटीयरमधील उल्लेखाच्या आधारे समाजाने ही मागणी अधिक आक्रमकपणे पुढे रेटली आहे. मराठा आरक्षणाच्या निर्णयानंतर बंजारा समाजानेही त्याच गॅझेटीयरचा संदर्भ देत, जर मराठा समाजाला त्याचा लाभ मिळू शकतो, तर बंजारा समाजाला का नाही? असा सवाल उपस्थित केला आहे. समितीत मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि कायदा क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.त्यात न्या.एम.एल.तहलियानी (अध्यक्ष), डॉ.सी.जे.सोनोवाल,डॉ.शैलेशकुमार दारोकर,ॲड.नितीन गांगल, डॉ. संदीपान गव्हाळे यांचा समावेश आहे.ही समिती बंजारा समाजातील उपवर्गांसह संपूर्ण समाजाचा प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीचा सखोल अभ्यास करणार आहे. मात्र, शासन निर्णयात समितीला अहवाल सादर करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही.

# कुरिअर बॉयला मारहाण करून २१५ ग्रॅम सोने लंपास

(पान १ वरून)

रितेश कावेडीया ज्वेलर्स (झवेरी बझार, मुंबई) यांच्याकडे अंगडीया सर्विसने नेहमीच पाठवला जातो.हा सोन्याचा मुद्देमाल प्रमोद परमार (रा. कोल्हापूर) यांचे न्यु लक्ष्मी एअर पार्सल कुरीअर (अंगडीया सर्विस) मार्फत पाठवतो. न्यु लक्ष्मी एअर पार्सल नावाने कुरीअर कार्यालयातील नकोमलसिंग परिहार हा सोन्याचा मुद्देमाल श्रद्धा ज्वेलर्स रविवार पेठ सातारा येथून घेवून जाण्याचे काम करत असे. शुक्रवारी न्यु लक्ष्मी एअर पार्सल कुरीअर, (सातारा) मधील कर्मचारी कोमलसिंग परिहार यांना फिर्यादी नितीन खेमचंद जैन यांनी फोन करून आमचे मुंबईसाठी एक कुरीअर पाठवायचे असल्याचे परिहार याला सांगितले. त्यानंतर रात्री ८ वा.च्या सुमारास कोमलसिंग परिहार श्रद्धा ज्वेलर्स मध्ये आल्यानंतर ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचा बार पार्सल पॅक करुन कुरियर मार्फत मुंबई येथे पाठविण्यासाठी त्यांच्याकडे दिले. याबाबत दुसऱ्या दिवशी सकाळी फोन करून कुरीअरची माहिती घेतली असता त्याने रात्री चार अनोळखी लोकांनी मारहाण करुन त्याचेकडील सोन्याचे कुरीअर असलेली सॅक जबरीने चोरी करून घेवुन गेले असल्याचे सागितले.

यामुळे तात्काळ सातारा शहर पोलीस ठाणे येथे येऊन माहिती दिली असता सातारा शहरामधील संतोषी ऑरनामेन्टस, ५०१ पाटी, सातारा या शॉपचे मालक शशिकांत जाधव यांचेदेखील ८५ ग्रॅम सोन्याची गोळी मुद्देमाल तसेच त्रिमुर्ती गोल्ड शॉपचे मालक उत्तम साळुंखे यांचे ८० ग्रॅम वजनाचे सोन्याचा मुद्देमाल हा चोरी झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.यामध्ये एकूण ३२ लाख ५ हजार पाचशे रु. किमतीच्या सोन्याच्या गोळ्या व बार जबरी चोरी केल्याची घटना घडली असल्याने चार अनोळखी इसमाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. याबाबत पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी घटनेची सखोल चौकशी करून गुन्ह्यातील आरोपींना तात्काळ जेरबंद करण्याच्या सूचना दिल्या.

# तीस वर्षांपासून फरार आरोपीस सीबीआयकडून अटक

मुंबई,ता.२८-

**केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) जवळपास तीन दशकांपासून फरार असलेल्या अनंत तांबिटकर या आरोपीला अटक केली.**

सीबीआयने १९९२ मध्ये स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपूर (एसबीबीजे) मधील आर्थिक फसवणूकीप्रकरणी गुन्हा नोंदवला होता.तपासाअंती १९९६ मध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले आणि सुनावणीनंतर न्यायालयाने नऊ जणांना दोषी ठरवले होते.

या प्रकरणी बनावट आर्थिक व्यवहार आणि अन्य गुन्हेगारी कृत्यांमध्ये सामील असलेला एक आरोपी अनंत तांबिटकर आरोपपत्र दाखल झाल्यानंतर फरार झाला आणि त्याला फरार गुन्हेगार घोषित करण्यात आले होते.


तांत्रिक गुप्त माहितीच्या आधारे त्याचा मुंबईतील ठावठिकाणा कळाला. त्यानंतर दि. २६ रोजी सीबीआयने त्याला अटक केली.अटक करुन कायदेशीर प्रक्रियेनंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली.

# उंदरवाडीच्या उजव्या कालव्यात आठ गव्यांचा कळप पडला

बिद्री,ता.२८ (प्रतिनिधी)-

**उंदरवाडी (ता.कागल) येथे पाण्याच्या शोधात आलेल्या आठ गव्यांचा अख्खा कळपच कालव्यात पडला.सर्व गव्यांना ग्रामस्थांनी तसेच वनरक्षक शरद कांबळे, राधानगरीच्या रेस्क्यू टीमने घटनास्थळी भेट देत बाहेर काढले. दमलेल्या एक वर्ष वयाच्या गव्याच्या पिल्लाला कालव्यातून बाहेर काढून जीवदान देत त्याला परत कळपात सोडले. ही घटना शनिवारी सकाळी घडली.**

उंदरवाडी दरम्यान जंगलात असलेल्या बादा नावाच्या शेतातून पाणी पिण्यासाठी आलेले सात गवे व एक पिल्लू कालव्यामध्ये पडले.कालव्याला प्लास्टर असल्याने त्यांना



(कालव्यातून बाहेर पडताना गवा)

बाहेर पडता येत नसल्याने ते सर्व गवे पाण्यातून वाहत उंदरवाडीच्या कालव्यापर्यंत आले.

सकाळी ग्रामस्थांच्या ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी तात्काळ वनरक्षक शरद कांबळे यांच्याशी संपर्क साधला.कांबळे यांनी राधानगरी रेस्क्यू टीमचे साईनाथ पुंगावकर, अनिरुद्ध साबळे, शैलेश पाटील यांना घटनास्थळी बोलावून घेतले.त्यांनी सर्व गव्यांना हुसकावत पाण्यातून बाहेर काढले. याच कळपातील एक वर्ष वयाचे गव्याचे पिल्लू मात्र कालव्यातून वाहतच राहिले. ते दमलेले असल्यामुळे त्याला बाहेर पडता आले नाही.परिस्थितीचा अंदाज घेत उंदरवाडीच्या रोहित फासके, प्रतिक पाटील, शंकर पाटील, मेजर स्वप्निल शिंदे व इतरांनी गव्याच्या पिल्लाला कालव्यातून वाहत्या पाण्यामधून बाहेर काढून त्याला जीवदान दिले. नंतर त्याला गव्यांच्या कळपात सुरक्षितपणे सोडून दिले.

# फटाका कारखान्यात स्फोट

(पान १ वरून)

दृश्य अत्यंत हृदयद्रावक होते. मृतांमध्ये बहुसंख्य महिला कामगारांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे.प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोटाची तीव्रता इतकी होती की,काही मृतदेह शेजारच्या शेतात जाऊन पडले. स्फोटानंतर अनेक तास कारखान्यातून लहानमोठे स्फोट होत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने मदतकार्य राबवण्याचे आणि जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार देण्याचे आदेश दिले.चंद्राबाबू नायडू यांनी सोशल मिडीया प्लॅटफॉर्म एक्स वर शोक व्यक्त करत या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी पीडित कुटुंबांना तातडीने मदत देण्याचे आश्वासन दिले आहे.

दरम्यान, या दुर्घटनेमागील नेमके कारण काय याची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. संबंधित कारखान्याकडे वैध परवाना होता का, तसेच सुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले होते का, याचा तपास प्रशासन करत आहे.

# मोदींच्या इस्राएल दौऱ्यावर काँग्रेसची आगपाखड

नवी दिल्ली,ता.२८-

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इस्रायल दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने शनिवारी पुन्हा एकदा आगपाखड केली आहे. मोदींचा इस्रायल दौरा लाजिरवाणा असून अयोग्य वेळी करण्यात आल्याची टीका काँग्रेसने केली.या भेटीमुळे लष्करी तणाव वाढविण्यासाठी राजकीय पाठबळ दिल्याची धारणा निर्माण होते, जी नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेबाबत भारताच्या ऐतिहासिक बांधिलकीच्या पूर्णतः विरोधात असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे.**

सलमान खुर्शीद यांनी केलेल्या निवेदनानुसार पश्चिम आशियात वाढलेला तणाव, संघर्षाची सुरुवात आणि व्यापक युध्दाच्या स्पष्ट धोक्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांचा इस्रायल दौरा झाल्याबद्दल काँग्रेस 'गंभीर चिंतेत' असल्याचे म्हटले आहे. पंतप्रधानांचा हा दौरा अयोग्य वेळी झाला असून त्यामुळे पक्षपाती कल आणि आक्रमक कारवायांना मौन पाठिंबा दिल्याची छाप निर्माण होते.याचे गंभीर धोरणात्मक परिणाम होऊ शकतात.राष्ट्रीय निवडणुकांपूर्वी विद्यमान सरकारला पाठिंबा दिल्याचा संदेशही या भेटीतून जाऊ शकतो. पंतप्रधानांची ही भेट लष्करी तणाव वाढविण्यासाठी राजकीय पाठबळ दिल्याची धारणा निर्माण करते. नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था आणि संयुक्त राष्ट्रांच्या तत्त्वांप्रती भारताची ऐतिहासिक बांधिलकी याच्या पूर्णतः विरोधात हा संदेश जातो. विशेषतः कोणत्याही देशाच्या प्रादेशिक अखंडतेविरुध्द किंवा राजकीय स्वातंत्र्याविरुद्ध बळाचा वापर करण्यास असलेली मनाई आणि वादांचे शांततामय मार्गाने निराकरण करण्याच्या तत्त्वांच्या संदर्भात हे चिंताजनक असल्याचे खुर्शीद यांनी स्पष्ट केले. तसेच भारताचे परराष्ट्र धोरण 'वसुधैव कुटुंबकम्', महात्मा गांधी यांच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानावर आणि भारतीय राज्यघटनेतील कलम ५१ मध्ये अधोरेखित आंतरराष्ट्रीय कायदे व करारांचे पालन करण्याच्या निर्देशांवर आधारित असल्याचे खुर्शीद यांनी सांगितले.काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनीही पंतप्रधानांच्या इस्रायल भेटीवर टीका केली. जयराम रमेश म्हणाले की, मोदी यांच्या इस्रायल भेटीचा उत्सव साजरा केल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत इस्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे इराणवर हल्ले सुरू केले.


**|| सहावे पुण्यस्मरण ||**



स्व. श्री. गजानन रामचंद्र जाधव

आपल्या तत्वांशी एकनिष्ठ होतात तुम्ही
अथक प्रयत्नांनी माणसं घडवली तुम्ही
सर्वांच्या हृदयावर राज्य केले तुम्ही
म्हणूनच देवाला सुद्धा आवडला तुम्ही
तुमच्या पुण्यतिथीनिमित्त
विनम्र अभिवादन!

श्रीमती उज्वला गजानन जाधव
अमोल गजानन जाधव
महेश गजानन जाधव
केतन राजेंद्र पारळे

जाधव परिवार,इचलकरंजी.
गांधी कॅम्प युवक मंडळ,इचलकरंजी.


**|| आठवे पुण्यस्मरण ||**



कालकथित ताराबाई महादेव कांबळे
देहरुपाने अदृश्य असलेल्या परंतू
नयनदर्पणी सतत राहणाऱ्या
तुझ्या आठव्या स्मृतीस
आमची भावपूर्ण श्रद्धांजली!

शिवाजी महादेव कांबळे
मुकुंद शिवाजी कांबळे
प्रशांत शिवाजी कांबळे
कांबळे परिवार, इचलकरंजी.

**|| भावपूर्ण श्रद्धांजली ||**



कै. उत्तम लक्ष्मण माळकर

आमचे बंधू श्री. उत्तम लक्ष्मण माळकर यांचे गुरुवार, दि. २६/०२/२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

दड्डीकर, कोरे, विभूते, बोरगावे,
म्हेत्रे, बोरगावी, उबारे, धावडे आणि परिवार

माती सावडणे कार्यक्रम - आज रविवार, दि. १/३/२०२६ रोजी सकाळी ८ वा. लिंगायत रुद्रभूमी व उत्तरकार्य,फोटोपूजन सकाळी ११ वा. राहते घरी आहे.

# जुगार अड्ड्यावर छाप्यात ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

## आठजणांना अटक

कोल्हापूर, ता.२८ (प्रतिनिधी) –

**राधानगरी तालुक्यातील टिटवे गावाच्या हद्दीत शेतात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने रात्री छापा टाकत आठ जणांना अटक केली. या कारवाईत ९ दुचाकी, ५ मोबाईल हॅण्डसेट, ६७ हजार रुपयांची रोकड तसेच जुगार साहित्य असा सुमारे ८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

टिटवेत एका शेतात जुगार सुरू असल्याची माहिती एलसीबीचे पोलीस अंमलदार संजय देसाई व राजू कोरे यांना मिळाली होती.पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईचे नियोजन करण्यात आले.

पोलिसांची चाहूल लागताच जुगार खेळणाऱ्या संशयितांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी वेगाने हालचाल करत पाठलाग करून सर्वांना ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान घटनास्थळावरून रोख रक्कम, मोबाईल हॅण्डसेट, दुचाकी व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले.अटक करण्यात आलेल्यांमध्ये चंद्रकांत यशवंत पाटील (वय ६०, रा.आदमापूर), शंकर तिमाणा पोवार (वय ४०, रा. तुरंबे), नवनाथ तानाजी वाईंगडे (वय २९, रा. सरवडे), शुभम कृष्णात चव्हाण (वय २९, रा. चंद्रे ), तुळशीदास यशवंत कांबळे (वय ३७, रा. बेले), विनोद बबन पाटील (वय २८, रा. आदमापूर), अशोक बसाप्पा पोवार (रा. तुरंबे) आणि प्रविण गोजारे (रा. मडीलगे ) यांचा समावेश आहे.

# वकिलास घरात घुसून पक्षकारांकडून धक्काबुक्की

सांगली, ता. २८(प्रतिनिधी)–

**गव्हर्मेंट कॉलनीत राहणाऱ्या वकिलास वकीलपत्र नको म्हणून एनओसीसाठी घरात घुसून पक्षकारांनी शिवीगाळ, धक्काबुक्की करून दमदाटी केल्याचा प्रकार घडला. याबाबत उमेश श्रीकांत सहस्त्रबुद्धे (वय ५३ रा. सांगली) यांनी विश्रामबाग पोलिसात फिर्याद दिली आहे.**

याप्रकरणी पोलिसांनी पक्षकार अशोक शंकर निकम-पाटील (वय ६४ रा. शामरावनगर), भालचंद्र शंकर निकम-पाटील (वय ६२ रा. खणभाग), गोरखनाथ शंकर निकम-पाटील (वय ६०) आणि अनोळखी अशा चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार , वकील उमेश सहस्त्रबुद्धे हे कुटुंबीयांसह विश्रामबाग परिसरातील गव्हर्मेंट कॉलनीत राहतात. गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास सहस्त्रबुद्धे हे घरी होते. यावेळी संशयित चौघेजण त्यांच्या घरासमोर आले. त्यांना बाहेर बोलावून घेतले. आमच्या दाव्यात विनायक पाटील यांना घेण्याची इच्छा नाही. विनायक हा तुमच्या जवळचा आहे त्यामुळे आमच्या दाव्यात तुमचे वकीलपत्र नको असे म्हणून तत्काळ एनओसी द्यावी म्हणून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्याच्याशी झटापट करत तुला दाखवतो अशी धमकी दिली. त्यावेळी सहस्त्रबुद्धे यांनी त्यांना तुम्हाला एनओसी देतो बाहेर थांबा असे म्हणून ते आत गेले. यावेळी संशयित चौघेजण त्यांच्या घरामध्ये जबरदस्तीने घुसले. त्यांना वकीलपत्राच्या एनओसी फाइलवर सही करून देत बाहेर जाण्यास सांगितले असता, त्यांनी पुन्हा शिवीगाळ केली. घडलेल्या या प्रकारानंतर सहस्त्रबुद्धे यांनी विश्रामबाग पोलिसात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून संशयित चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

# सांगलीत युवकाचा खून

सांगली, ता.२८ (प्रतिनिधी )–

**कामासाठी आलेल्या राजस्थानी युवकाचा फावड्याच्या दांडक्याने मारहाण करून खून करण्यात आला. गोपालसिंह बेगाराम भदाला (३५, रा. गोविंद पुरा, रिंगर, जि. शिखर, राजस्थान) असे त्याचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी हल्ला झाला. शनिवारी सकाळी उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.**

दरम्यान, याप्रकरणी त्याचा मित्र प्रेमकुमार पवनकुमार बराला (रा. जेतुसर, श्री माधवपूर, जि. शिखर, राज्य राजस्थान) याच्याविरोधात संजयनगर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. सुभाष चंद्र निठारवाल (वय ३१) याने फिर्याद दिली.लक्ष्मीनगर येथील मारूती मंदिराच्या पाठीमागील भाड्याच्या घरात ही घटना घडली.

गोपालसिंह भदाला हा फरशी फिंटीग व ठेकेदार म्हणून काम करत होता. त्याचा विवाह झाला असून पत्नी मूळ गावी असते. तो लक्ष्मीनगर येथील मारूती मंदिराजवळ संदीप पवार यांच्या भाड्याच्या खोलीत वास्तव्यास होता. काही दिवसांपुर्वी त्याचा मित्र प्रेमकुमार याने प्रेमविवाह केला होता. तो राजस्थान येथून पत्नीला घेऊन पसार झाला होता. दरम्यानच्या काळात गोपालसिंह याच्याकडे तो कामासाठी पत्नीसह आला. त्याच्या खोलीजवळच तो वास्तव्यास होता. शुक्रवारी नेहमीप्रमाणे तो कामाला गेला होता. त्यावेळी गोपालसिंह याने प्रेमकुमारच्या पत्नीवर वाईट नजर टाकल्याचा संशय आला. त्यामुळे प्रेमकुमार याने गोपालसिंह याच्या भावास फोन करून माहिती दिली. गोपालसिंह याचा भाऊ खरसूंडी येथे कामास आहे. त्यानंतर दुपारी चारच्या सुमारास प्रेमकुमार घरी आला. त्याने गोपालसिंह याच्यासोबत वाद घातला. त्यानंतर फावड्याच्या दांडक्याने डोक्यावर हल्ला केला. रक्ताच्या थारोळ्यात तो पडला. त्यानंतर दोघेजण पसार झाले.दरम्यान, गोपालसिंह याला तातडीने शासकीय रुग्णालयात उपाचारासाठी दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

# कबनूर घटनेच्या निषेधार्थ इचलकरंजीत जनआक्रोश मोर्चा

## हिंदूंनी एकजुट ठेवून जिहादी विचारांचा बिमोड करावा– आम. संग्राम जगताप

इचलकरंजी,ता.२८–

**छ.शिवाजी महाराज आणि छ. संभाजी महाराज यांनी आपल्याला विचारांची दिशा दिली आहे. त्यांच्या विचारांचा अवमान कोण करत असेल तर त्याला जशास तसे उत्तर देण्याची तयारी आपल्याला ठेवावी लागेल. या संदर्भात आम्ही राज्य शासनाकडे देखील पाठपुरावा करीत आहोत. हिंदू समाजाने आपली एकजुट कायम ठेवून जिहादी विचारांचा बिमोड करावा, असे आवाहन आम. संग्राम जगताप यांनी केले.**

गेल्या आठवड्यात कबनूर येथे एका महिलेने महापुरुषांबद्दल अवमानकारक व आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ तसेच हिंदूच्यावरील पोलिस प्रशासनाकडून दाखल केलले गुन्हे मागे घ्यावेत तसेच महापुरुषांच्या विटंबनेच्या विरोधात शासनाने कडक कायदा करावा. या मागण्यांसाठी इचलकरंजीत शनिवारी हिंदू जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. आम. राहुल आवाडे, आम. संग्राम जगताप, आरपीआय पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष नानासाहेब वाघमारे, गजानन महाजन गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन या मोर्चाला सुरुवात करण्यात आली. मुख्य मार्गावरुन जाताना कॉ. मलाबादे चौकात धर्मवीर छ. संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महात्मा गांधी पुतळा याठिकाणी मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. आम. जगताप यांनी, प्रशासनाने कागद, वेळ आणि शाई याचा वापर जिहाद कमी करण्यासाठी करावा. आम्ही कोणत्याही प्रकाराचे राजकारण न करता शिवरायांचे मावळे एकत्र आल्याचे सांगितले.



कबनूर येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ इचलकरंजी येथे काढण्यात आलेल्या जनआक्रोश मोर्चाचे छायाचित्र. (छाया. – मयूर चिंदे)

कबनूर येथील घटनेचा निषेध करत आम. राहुल आवाडे यांनी, यापूर्वीसुध्दा शहापूरमध्ये अल्पवयीन मुलीसोबत असभ्य वर्तनाची घटना घडली होती. त्यावेळी आम्ही लढा उभारला होता. कबनूर येथील घटनेनंतर हिंदुत्वादी कार्यकर्त्यांवरच गुन्हे दाखल का होतात असा सवाल करत पोलिस प्रशासनाचा निषेध नोंदविला. यापुढे छत्रपतींची बदनामी खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. गजानन महाजन गुरुजी यांनी, आपली संस्कृती जगाला वंदनीय असून ती कायम ठेवली पाहिजे. त्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करुया, असे सांगितले.आरपीआयचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष नानासाहेब वाघमारे यांनी, जिहादी विचारसरणीच्या प्रवृत्तीचा तीव्र शब्दात समाचार घेतला. शिवशक्ती आणि भीमशक्ती एकत्र आली असून छत्रपतींबरोबरच घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणाऱ्या प्रवृत्तीचा बंदोबस्त करावा लागेल, असे त्यांनी सांगितले. मोर्चाची सांगता झाल्यानंतर अप्पर तहसिलदार महेश खिलारी व पोलिस प्रशासनाला निवेदन दिले. प्रेरणा मंत्राने सभेची सुरुवात करण्यात आली. मोर्चात हिंदुत्ववादी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### मोठा पोलिस बंदोबस्त

**मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मुख्य मार्गावरील सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले होते.तर मोर्चावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.मोर्चानंतर मुख्य रस्त्यावर व्यवहार पूर्ववत सुरू करण्यात आले.**



# ‘पंचगंगे’ला केंदाळचा विळखा

- जलचर मृत्यूमुखी पडण्याची भिती
- महापालिकेने लक्ष्य देण्याची गरज

इचलकरंजी,ता.२८ –

**येथील पंचगंगा नदीमध्ये केंदाळ मोठ्या प्रमाणात साचू लागले आहे त्यामुळे नदीतील जलचर प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे. तसेच पाणी दूषित झाल्यास त्याचा परिणाम इचलकरंजी शहराच्या पाणी पुरवठ्यावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तेव्हा साचलेले केंदाळ तातडीने काढण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने तातडीची पावले उचलावीत अशी मागणी होत आहे.**

इचलकरंजी शहराला मजरेवाडी येथून कृष्णा नळ पाणीपुरवठा योजना तसेच पंचगंगेतून पाणी उपसा करून शहरास पाणी पुरवठा केला जातो. देशातील दूषित नद्यांमध्ये पंचगंगा नदीचा समावेश आहे. त्यामुळे पंचगंगेतून पाणीपुरवठा करताना प्रशासनाला खबरदारीचे उपाय घ्यावे लागतात. त्यामध्ये दरवर्षी कोल्हापूर येथील पंचगंगा नदीतून मोठ्या प्रमाणात केंदाळ वाहत तेरवाड बंधाऱ्यापर्यंत साचत जाते. याचा विपरीत परिणाम नदीतील जलचर प्राण्यावर होतो. केंदाळमुळे पाण्यातील ऑक्सिजन नष्ट झाल्याने मोठ्या प्रमाणात जलचर मृत्यूमुखी पडतात. केंदाळचा त्रास कमी करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाच्यावतीने नदीत तारेचे कुंपण लावून केंदाळ अडवण्यात येते. त्यानंतर त्या ठिकाणी कर्मचारी लावून केंदाळ काढले जाते. मात्र, नदीमध्ये लावण्यात आलेले तार अज्ञातानी काढून टाकल्याने कोल्हापूर कडून आलेले केंदाळ नदीतील बंधाऱ्या जवळ साचत चालले आहे. त्यामुळे त्याचा परिणाम पाण्यातील जलचर प्राण्यावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच पाणीही दूषित होण्याची शक्यता आहे. तेव्हा महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून जलपर्णी तातडीने काढून घ्यावीत अशी मागणी नागरिकांच्यातून जोर धरू लागली आहे.

# बाळूमामांच्या नावानं चांगभलं...

## मूळक्षेत्र मेतकेत २ लाखावर भाविकांची उपस्थिती : २०० पोती भंडाऱ्यांची उधळण

मुरगूड,ता.२८ (प्रतिनिधी) –

**अखंड महाराष्ट्रासह कर्नाटक आणि गोवा, आंध्र प्रदेशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या मूळक्षेत्र मेतके (ता.कागल) येथे सद्गुरू बाळूमामा देवाचा भंडारा सोहळा अमाप उत्साहात झाला. सुमारे दोनशेहून अधिक भंडाऱ्याच्या पोत्याची उधळण करत झालेल्या पालखी सबिना सीमाभागातून दोन लाखांहून अधिक भाविकांनी उपस्थिती लावली. यामुळे मेतके गावातील वातावरण भक्तीमय बनले होते. मेतके परिसर भंडाऱ्यात न्हावून निघाला.**


मूळक्षेत्र मेतके येथे बाळूमामा भंडारा उत्सवाला मंदिर परिसर लाखो भाविकांनी गजबजून गेला होता.(छाया : साताप्पा चव्हाण, बेनिक्रे)

सद्गुरु बाळूमामांच्या नावानं चांगभलं....श्री हालसिध्दनाथ महाराज की जय...असा अखंड नामघोष ढोल,कैताळाचा निनाद,पालखी सोहळा पाहून हजारो भाविक आत्मतृप्त झाले.भंडाऱ्याच्या उधळणीत भाविक न्हावून गेले होते. तर मंदिर परिसरासह संपूर्ण गाव पिवळा धमक झाला होता. ९४ वर्षांपूर्वी माघ पौर्णिमेला बाळूमामांनी ४० गावांना निमंत्रण देवून भंडारा उत्सवाला सुरुवात केल्याने या भंडारा उत्सवाला अधिक महत्त्व आहे. तोच भंडारा आजही भाविक श्रद्धापुर्वक साजरा करतात. काकड आरती,प्रवचन, कीर्तन,ज्ञानेश्वरी पारायण,भजन व वालंग(ढोल वादन), महिला भजनी मंडळाचे सादरीकरण तसेच यंदा माऊलींचा अश्वरिंगण सोहळा यामुळे सात दिवसापासून चिकोत्रा नदीतीरावर भावभक्तीला उधाण आले होते.

शुक्रवारी सायंकाळी गावच्या मुख्य चौकात बिरदेव व बाळूमामा यांच्या पालखीच्या गाठीभेटी झाल्या. तसेच सीमाभागातील वालंग समाजही ढोल कैताळांसह दाखल झाला.यावेळी देवाचा सबिना तसेच धनगरी ढोलाचा वालंग व हेडाम खेळण्यात आले.यावेळी सद्गुरू बाळूमामा ट्रस्टचे कार्याध्यक्ष पापा पाटील-कौलवकर,अध्यक्ष आर.डी. पाटील, दयानंद पाटील, पद्मजा तिवले,बाबासाहेब पाटील, बळीराम मगर, देवाप्पा पुजारी आदी उपस्थित होते.

शनिवारी सकाळी ज्ञानेश्वरी पारायणची सांगता झाली. तर, काल्याचे कीर्तन होवून महानैवेद्य देण्यात आला. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप झाले.लाखो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.सायंकाळी दिंडी सोहळा होवून भंडारा उत्सवाची सांगता झाली.

# धनादेश न वठले प्रकरणी सहा महिने सश्रम कारावास

इचलकरंजी,ता.२८–

**येथील सुरेश टेक्सटाईल्स करिता व. मु. धारक राजेंद्रप्रसाद रामस्वरूप तोतला(रा.व्यंकटेश प्लाझा तांबे माळ) यांनी प्रगती विरेंद्र देसाई(रा. कुडचे मळा) यांचे विरुध्द चलनक्षम दस्तऐवज कायद्यानुसार दाखल केलेल्या फिर्यादीत व न्यायदंडाधिकारी यांनी आरोपी प्रगती विरेंद्र देसाई यांस सहा महिने नुकसानभरपाई म्हणून तीन लाख रूपये फिर्यादीस देणेचा आदेश दिला आहे.**

फिर्यादी यांचा सुरेश टेक्सटाईल्स या नावाने सूत मालाचा व्यवसाय असून आरोपी यांनी फिर्यादीकडून वेळोवेळी सूतमाल उधारीने घेतलेले असून आरोपी ४.२०,४८८/- इतके देणे लागत होता. सदरील रकमेच्या फेडीसाठी आरोपीने फिर्यादीस २ चेक दिले रूपये २,०९,७९०/- चा चेक बँकेत भरला असता तो न वठता परत आलेने त्याबाबत फिर्यादी सुरेश टेक्सटाईल करिता व मु.धारक राजेंद्रप्रसाद रामस्वरूप तोतला यांनी प्रगती विरेंद्र देसाई यांचेविरुद येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात चलनक्षम दस्तऐवज कायद्यानुसार फिर्याद दाखल केली होती. सदरील कामी फिर्यादीने दिलेल्या जबाबानुसार व बँकेच्या साक्षीवरून तसेच आरोपीने चेक हा कायदेशीर फेडीपोटी दिला असा फिर्यादी तर्फे ॲड. नितीनकुमार लड्ढा यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य मानून आरोपी प्रगती विरेंद्र देसाई यास वरीलप्रमाणे शिक्षा सुनावली.सदर कामी फिर्यादीतर्फे ॲड. नितीनकुमार लड्ढा ॲड. श्रुतीका भण्साली, ॲड. नमया पारक व ॲड. शरद सुखटणकर यांनी काम पाहिले.

# गोठवण्यासाठी दिलेला सोन्याचा हार विक्री

## सराफावर फसवणुकीचा गुन्हा

कोल्हापूर, ता,२८(प्रतिनिधी)–

**गोठवण्यासाठी दिलेला दीड तोळ्याचा सोन्याचा हार परस्पर विक्री केल्याचा प्रकार फुलेवाडी परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी सराफ ऋषीराज संभाजी महेकर (वय २५, रा. फुलेवाडी, पाचवा बसस्टॉप) याच्याविरुद्ध जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्मिता तुषार हिरवे (वय ४०, रा. श्रीकृष्ण पार्क, फुलेवाडी) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.**

स्मिता हिरवे यांनी ४ जून २०२५ रोजी फुलेवाडी येथील ‘ऋषीराज ज्वेलर्स’ या दुकानात आपला दीड तोळ्याचा सोन्याचा हार गोठवण्यासाठी दिला होता. काही दिवसांत हार परत देण्याचे आश्वासन संशयित महेकर याने दिले होते. मात्र, त्यानंतर हिरवे यांनी वारंवार हाराची मागणी करूनही त्याने आज-उद्या देतो असे सांगत टाळाटाळ केली.

दरम्यान, बराच काळ उलटूनही हार परत न मिळाल्याने हिरवे यांनी संशय व्यक्त करत जुना राजवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत महेकर याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता आर्थिक अडचणीमुळे संबंधित हार परस्पर विकल्याची कबुली त्याने दिल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला असून पोलीस निरीक्षक किरण लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सुतार अधिक तपास करत आहेत.

# युवकावर कुऱ्हाडीने हल्ला

सांगली, ता. २८(प्रतिनिधी)–

कॉलेजवर जाऊन एका युवतीशी बोलल्याच्या रागातून तिघांनी युवकास लाथाबुक्क्यांनी, कुऱ्हाडीने मारहाण केली.

याबाबत अधिक माहिती अशी की,प्रथमेश तानाजी दळवी (वय २६, रा. कासारमळा, दुधगाव) याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून कुऱ्हाडीने त्याच्या पाठीवर हल्ला केल्याची घटना घडली आहे. याबाबत संशयित संजय निळुघडे, आदित्य निळुघडे व एक अनोळखी अशा तिघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# महिलेच्या गळ्यातील सोन्याची माळ लंपास

सांगली, ता. २८(प्रतिनिधी)–

**शहरातील विजयनगर परिसरातील शाहूनगर येथे रस्त्याकडेला उभ्या असलेल्या महिलेच्या गळ्यातील दागिने दुचाकीवरून आलेल्या दोघांनी हिसडा मारून तोडून पळविले. याप्रकरणी सुमन भानुदास बंडगर (वय ५८, रा. महाराष्ट्र हौसिंग सोसायटी) यांनी संजयनगर पोलिसात फिर्याद दिली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विश्रामबाग परिसरात सोनसाखळी चोरट्यांनी दहशत निर्माण केली आहे. त्यानंतर त्यांनी संजयनगर परिसराकडे मोर्चा वळवला आहे. सुमन बंडगर या आपल्या कुटुंबियांसह शाहूनगर परिसरात राहतात. रात्री सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास बंडगर या त्यांच्या घरासमोरच रस्त्यावर उभ्या होत्या.

काही वेळाने त्या घराकडे जात असताना दुचाकीवरून हेल्मेट घातलेले २५ ते ३० वयोगटातील युवक त्यांच्या जवळ आले. त्यांनी बंडगर यांच्या गळ्यातील ५६ हजार रुपये किमतीची सोन्याची करमणी माळ हिसडा मारून लंपास केली. अचानक घडलेल्या घटनेनंतर त्या घाबरल्या. आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला. परंतु अंधारात चोरटे पळून गेले. सुमन बंडगर यांनी याबाबत संजयनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

THE MODERN EDUCATION SOCIETY'S
THE MODERN HIGH SCHOOL, ICHALKARANJI.

REQUIRED TEACHERS FOR A.Y. : 2026-27

PRE-PRIMARY TEACHERS
- MTTC (Montessori Teacher Training Course)

PRIMARY TEACHERS
- Engslish / Hindi / Marathi / Science / Mathematics

SECONDARY TEACHERS
- Engslish / Hindi / Marathi / Physic / Chemistry / Biology / Mathematics / Social Science

CO-CURRICULAR FACULTY
Computer ▪ Physical Education ▪ Music ▪ Art & Craft

Fluent English Communication is Must, Freshers Can Also Apply. Please submit Resume/Biodata at the School Office or Wahtsapp the Resume on - +91 86682 69639 / +91 93563 27175

हार्दिक शुभेच्छा!


मा. श्री. उत्तम रावसाहेब पाटील (आण्णा)

आमचे मार्गदर्शक, अरिहंत शुगर इंडस्ट्रीजचे चेअरमन, अरिहंत हॉस्पिटल आणि अरिहंत स्पिनिंग मिल्सचे चेअरमन
मा. श्री. उत्तम रावसाहेब पाटील (आण्णा)
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

किरणकुमार शा. पाटील ✻ केवल कि. पाटील
समस्त पाटील परिवार, भोज / इचलकरंजी.

# रस्ता कामामुळे दुकान गाळेधारक विस्थापित होणार

## मुरगूडमधील दुकानगाळेधारकांचे पुनर्वसन करण्याची मागणी

मुरगूड,ता.२८(प्रतिनिधी)–

**गडहिंग्लज –मुरगूड या राज्य मार्गाचे कॉंक्रीटीकरणाचे काम शहरातून सुरु करण्यात आल्याने दुकानदार गाळेधारकांत कमालीचा असंतोष पसरला आहे. ते विस्थापित होणार असल्याने त्यांचे प्रथम पुनर्वसन करण्याची मागणी होत आहे.**



गडहिंग्लज ते कागलपर्यंतच्या राज्यमार्ग रस्त्याच्या रुंदीकरणाचे व कॉंक्रीटीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकाम महामंडळामार्फत खासगी ठेकेदारांकरवी सुरु करण्यात आले आहे. कागल तालुक्यातील दौलतवाडी गावापर्यंत कॉंक्रीटीकरणाचे काम होत आले आहे. आता मुरगूड शहराच्या हद्दीतून गेलेल्या या रस्ता कामाला सुरुवात झाली आहे. या रस्ता कामामुळे मुरगूड एसटी बसस्थानक परिसरातील दुकाळ गाळेधारकांना आपली दुकाने काढून घेण्याची चार दिवसांची मुदत दिली आहे.पण ज्या दुकानावर रोजीरोटी आहे,त्या दुकानदारांना विस्थापित होण्याची वेळ आली आहे. आता ऐनवेळी आपली दुकाने कोठे हलवायची? हा त्यांच्यासमोरील प्रश्न आहे. प्रथम या दुकानदारांचे पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी होत आहे. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असताना नगरपालिका या दुकान गाळेधारकांकडून कर आकारणी करीत होती . मात्र कर उत्पन्न मिळविणाऱ्या पालिकेकडून या दुकानदारांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी घेतली जात नाही. सध्या तर हा रस्ता राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत झाल्याने याचा जाब कोणाकडे विचारावा या विवंचनेत संबंधित दुकानदार आहेत. बसस्थानक ते मुरगूड नाका क्रं. १ पर्यंत (मुरगूड -निपाणी राज्यमार्गापर्यंत) रस्ता कामाला सुरुवात झाली आहे. जेसीबीच्या सहाय्याने खुदाई करण्यात येत आहे. तसेच रस्त्यावरील दुकानांच्या पायऱ्या उखडण्यात आल्या आहेत. दुकानगाळेही हटविण्यात येणार असल्याने रस्ता कामात तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. रुंदीकरण किती व कसे केले जाणार हा प्रश्न महत्वाचा आहे. ५० ते ७० दुकानदारांच्या व्यवसायावर यामुळे कुऱ्हाड कोसळणार आहे.

शहरातील वर्दळीच्या मार्गाचे रुंदीकरण व कॉंक्रीटीकरण काम सुरु करण्यात आल्याने या मार्गावरील वाहतूकीला अडथळा आला आहे. आता मुख्य बाजारपेठेतून वाहतूक सुरु होणार असल्याने त्या मार्गावरीलही ताण वाढणार आहे तसेच मंगळवारचा आठवडा बाजार या मार्गावरील मुख्य बाजारपेठेत भरत असल्याने त्या दिवशी वाहतूकीचा प्रश्न गंभीर बनणार आहे . त्यासाठी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागणार आहे . पालिकेने यासंबंधी उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

# कृष्णा-दूधगंगा संगमावरील ऐतिहासिक घाटाचे उत्खनन सुरू

सै.टाकळी,ता.२८(प्रतिनिधी)–

**शिरोळ तालुक्यातील दानवाड येथे कृष्णा आणि दूधगंगा नद्यांच्या पवित्र संगम परिसरात एका भव्य ऐतिहासिक वारशाचा उलगडा होत आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या उत्खननात प्राचीन दगडी पायऱ्या आणि घाटाचे अवशेष सापडल्याने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण असून, ग्रामस्थांच्या पुढाकाराने हे शोधकार्य आता अधिक वेगाने सुरू झाले आहे.**



### दानवाडच्या भूगर्भातून उलगडतोय प्राचीन इतिहास

बुधवारी ता. २५ फेब्रुवारी रोजी राधाकृष्ण मंदिर ते नदीकडे जाणाऱ्या मार्गावर स्वच्छतेचे काम सुरू असताना अचानक जमिनीखाली दगडी बांधकामे आढळून आली. प्राथमिक तपासणीत हा एक विस्तीर्ण प्राचीन घाट असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेची वार्ता वाऱ्यासारखी पसरताच सकाळपासून जेसीबीच्या साहाय्याने माती हटवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले.विशेष म्हणजे,कोणत्याही शासकीय मदतीची वाट न पाहता स्थानिक तरुण आणि ग्रामस्थांनी एकत्र येत या ऐतिहासिक ठेव्याला पुनरुज्जीवित करण्याचा विडा उचलला आहे. गाळाखाली गाडला गेलेला हा घाट अत्यंत सुबक आणि मजबूत दगडी रचनेचा असून, तो प्राचीन काळातील प्रगत स्थापत्यशास्त्राचा नमुना मानला जात आहे.

आजच्या उत्खनन प्रसंगी गावातील प्रमुख नागरिक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुनिल बेरड, संतोष बेरड,विरु धनगर, शिवाजी साळुंखे, वर्धमान तिप्पनावर, संजय तिप्पनावर सावकार, सचिन सांगलीकर, बाजार समिती चेअरमन मारुती गस्ती,आण्णाप्पा शिरडोणे,बाबासो कुन्नुरे, शिवानंद माळी,अमोल बेरड, सतिश बेरड जितेंद्र बेरड आदींनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कामाची पाहणी केली व पुढील नियोजनावर चर्चा केली.




गारगोटी येथे निघालेल्या शिक्षण हक्क यात्रेत सहभागी शिक्षक,विद्यार्थी व पालक.

# पटसंख्येनुसार शाळा बंद करण्याच्या धोरणास विरोध

गारगोटी,ता.२८(प्रतिनिधी)–

**दहा व वीस पटसंख्या असलेल्या मराठी शाळा बंद करण्याच्या शासनाच्या धोरणाच्या विरोधात 'शाळा वाचवा शिक्षण वाचवा' अभियानांतर्गत चंदगड ते कोल्हापूर अशा शिक्षण हक्क संघर्ष यात्रेचे गारगोटीत आगमन झाले.यावेळी विद्यार्थी, शिक्षक, पालक या सर्वांच्यावतीने यात्रेने जाऊन प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.**

आज सकाळी दहा वाजता गारगोटीतील ऐतिहासिक पागा शाळेसमोर कडगाव (ता. भुदरगड ) येथून ही शिक्षण संघर्ष यात्रा आली. म्हणाले,शासनाच्या या धोरणामुळे बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहणार तर आहेच त्याचबरोबर मुलींना यापुढे शिक्षण मिळणार नाही.बिद्री साखर कारखान्याचे संचालक राहुल देसाई म्हणाले, भुदरगड तालुका हा शिक्षणाची पंढरी आहे, भुदरगड तालुक्यातील शिष्यवृत्ती पॅटर्न संपूर्ण राज्यभर गाजतोय मग तालुक्यात दर्जेदार शिक्षण असतांना शासनाच्या नवीन धोरणामुळे तालुक्यातील ७० शाळा बंद होणार आहेत.हे चुकीचे आहे. यासाठी लढा उभारला गेलाय त्याला आमचा पाठिंबा आहे. यावेळी कॉ. सम्राट मोरे, कृष्णा भारतीय, संपत देसाई यांची

### गारगोटीतील शिक्षण हक्क संघर्ष यात्रेतर्फे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

तिथून ही यात्रा जोतिबा मंदिर, उप जिल्हा रुग्णालय, बाजारपेठ मार्गे क्रांती ज्योती जवळ आली आणि या यात्रेचे सभेत रूपांतर झाले.

यावेळी झालेल्या सभेत अनेक वक्त्यांनी शासनाच्या शाळा बंद करण्याच्या धोरणाच्या विरोधात कठोर शब्दांत टिका केली. यावेळी बोलतांना कॉ.उदय नारकर म्हणाले,संच मान्यतेचा आधार घेऊन दहा व वीस पट संख्या असणाऱ्या शाळा शासन बंद करतेय. भविष्यात ५० पट संख्या असणाऱ्या शाळा वाचणार काय? हा प्रश्न आहे. तर शिवसेना जिल्हा प्रमुख विजय देवणे म्हणाले, बहुजन समाजाचे शिक्षण बंद करण्याचा सरकारचा डाव आहे.शिवसेना जिल्हाप्रमुख सुनिल शिंत्रे भाषणे झाली.

यावेळी सरपंच प्रकाश वास्कर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश पाटील,तालुका प्रमुख अविनाश शिंदे, बजरंग कुरळे, शाश्वत विकास चळवळीचे अध्यक्ष डॉ.अर्जुन कुंभार, शहाजी देसाई, राजेंद्र यादव, सचिन भांदिगरे, प्राचार्य डी. एस. देसाई, एम. एस. मोरूस्कर, आनंदराव जाधव, भरत रसाळ यांच्यासह अनेक शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेनंतर ही शिक्षण हक्क यात्रा प्रांत कार्यालयात गेली व तिथे प्रांतधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. त्यानंतर ही यात्रा दुपारी राधानगरीकडे रवाना झाली.

# जयसिंगपुरात २४ तास पाणी योजना राबविण्यात येणार

जयसिंगपूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**२४ तास पाणीपुरवठा योजना, शहर मलनिःसारण प्रकल्प, प्रमुख चौक व पुतळ्यांचे सुशोभीकरण, छ. राजर्षी शाहू स्टेडियमवर धर्मवीर आनंद दिघे पॅव्हेलियनसह स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारणी, रेल्वे ब्रिज व प्रशासकीय इमारत बांधकाम अशा महत्त्वाकांक्षी उपक्रमांना प्राधान्य देत जयसिंगपूर नगरपरिषदेचे सन २०२६–२७ साठी २७९.९८ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक बहुमताने मंजूर करण्यात आले.**



**कामगारांसाठी मानधनाचा निधी**

नगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर यांनी स्वतःचे मानधन व भत्ते नगरपरिषदेच्या कामगार कल्याण निधीत जमा करण्याचा निर्णय जाहीर केला. या निधीतून कामगारांच्या आरोग्य, कल्याण व इतर अत्यावश्यक गरजांसाठी खर्च करण्याची सूचना प्रशासनाला देण्यात आली.या निर्णयाचे सभेत सर्व सदस्यांनी स्वागत करत नगराध्यक्षांचे अभिनंदन केले.

### पालिकेचे २७९ कोटींचे अंदाजपत्रक बहुमताने मंजूर

नगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अर्थसंकल्पीय सभेत सन २०२५–२६ चे सुधारित व २०२६–२७ चे अंदाजित अंदाजपत्रक सादर करण्यात आले. महसुली उत्पन्न ४३.५७ कोटी रुपयांचे प्रस्तावित असून कर महसूल ९.९० कोटी, महसुली अनुदाने व अर्थसहाय्य १९.७८ कोटी, फी व दंड ६.४१ कोटी, व्याज उत्पन्न ४.९० कोटी अशी तरतूद करण्यात आली आहे. विशिष्ट योजनांसाठी १७९.३५ कोटींची अनुदाने व अंशदाने तसेच ४.६९ कोटी ठेवींसह एकूण १८७.५० कोटींची भांडवली जमा दाखविण्यात आली.खर्चाच्या बाजूला आस्थापना १६.६६ कोटी, प्रशासन १०.८६ कोटी, मालमत्ता दुरुस्ती व परिरक्षण ६.७७ कोटी, विविध कार्यक्रम अंमलबजावणीसाठी ४.६३ कोटी, राखीव निधी ६२.५० लाख अशी तरतूद असून एकूण महसुली खर्च ४२.६१ कोटी आहे. स्थिर व जंगम मालमत्ता निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च नियोजित करण्यात आला असून १५.१२ लाखांचे शिल्लकी अंदाजपत्रक सादर झाले.

नगरसेवक अर्जुन देशमुख यांनी २००१–०२ मध्ये केवळ ४.५ कोटींचे असलेले अंदाजपत्रक आज २७९.९८ कोटींवर पोहोचल्याचे नमूद करून नगराध्यक्षांचे विशेष कौतुक केले. शहराच्या सर्व भागांचा समतोल विकास साधण्यावर भर देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.या कामांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल सभेत आभार व्यक्त करण्यात आले. घरफाळा व पाणीपट्टी वसुलीस सर्व नगरसेवकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर यांनी केले. विकासाभिमुख तरतुदींमुळे शहराच्या पायाभूत सुविधांना गती मिळेल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या सभेस नगरसेवक गिरमल कोळी,तेजश्री पाटील यड्रावकर, रुपाली बंडगर, सचिन चौगुले, मिनल नांद्रेकर,सचिन निटवे, शकुंतला मछले, लक्ष्मण गोसावी, सुमैय्या कडबी,बजरंग खामकर, महेश कलकुटगी, स्वाती मादनाईक, उज्वला वाघवेकर, पराग पाटील, अशोक मळगे, तबसुम फरास, अनुराधा आडके, गिता भोसले, अर्चना अडगाणे, लता गाडेकर, संतोष जाधव, रंगराव पोवार, पंकज गुरव, संजय पाटील कोथळीकर, अनिता कोळेकर, गुंडाप्पा पवार उपस्थित होते.

# स्मार्ट मीटर सक्तीचे करु नये

## कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सची महावितरणकडे मागणी

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) कडून संपूर्ण महाराष्ट्रात स्मार्ट मीटर जोडणीचे काम सुरु आहे. सदर स्मार्ट मीटर विरोधात वीज ग्राहकांमध्ये प्रचंड असंतोष असून स्मार्ट मीटर बसविणेची सक्ती ग्राहकांना करु नये अशी मागणी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या शिष्टमंडळाने महावितरणचे कार्यकारी अभियंता अशोक जाधव यांच्याकडे निवेदनाव्दारे केली.**



महावितरणचे कार्यकारी अभियंता अशोक जाधव यांना निवेदन देताना मान्यवर.

सदर स्मार्ट मीटर जोडणेपूर्वी संबंधित अर्जावर जुन्या मीटरचा क्रमांक, शेवटचे रिडींग, बदलत असलेल्या नवीन स्मार्ट मीटरचा क्रमांक आणि सुरुवातीचे रिडींग, वीज ग्राहकाचे नाव, सही, मोबाईल नं. व इतर माहिती नोंदवून घ्यावी मगच स्मार्ट मीटर जोडावे. तसेच महावितरणचा बिलिंग विभाग व वसुली विभाग यांच्यामध्ये समन्वय नाही. त्याचा ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागतो. बिल चुकीचे आलेनंतर अर्ज दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधित विभाग वाट न पाहता कनेक्शन काढून टाकण्यास उत्सुक असतात त्यावर आळा बसावा.

याप्रसंगी अजित कोठारी,अमर क्षीरसागर, कोल्हापूर सोलर असोसिएशनचे अध्यक्ष अतुल होनोले यांनी मुद्दे मांडले. यावेळी शहर विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक जाधव यांनी बिल चुकलेल्या ग्राहकांच्या शंका दूर करण्यासाठी पुढील आठवड्यात विशेष शिबिर आयोजित करु असे सांगितले. यावेळी प्रशांत शिंदे,राहुल नष्टे, संपत पाटील, अभिजीत विचारे, धनाजी एकल, धैर्यशील जाधव, प्रथमेश सूर्यवंशी उपस्थित होते.



# मराठी भाषा जपा,वाढवा आणि अभिमानाने जगा-जिल्हाधिकारी

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**मराठी ही केवळ संवादाचे साधन नाही, ती आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे, मराठी भाषा जपा, वाढवा आणि अभिमानाने जगा, अशा प्रेरणादायी शब्दांत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी उपस्थितांना मराठी संवर्धनाचा संदेश दिला.**

जिल्हा मराठी भाषा समिती, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर व जिल्हा मराठी अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठी भाषा गौरव दिन २०२६' व भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त तालुकास्तरीय स्पर्धांच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचा हा भव्य कार्यक्रम शिवाजी पार्क येथील मुख्याध्यापक संघामध्ये उत्साहात पार पडला, यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रघुनाथ कडाकणे,विविध शाळांचे विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

# कोल्हापूर-दिल्ली थेट विमानसेवा सुरू करण्याची मागणी

## विमानतळ सल्लागार समितीची बैठक संपन्न ;दर्जेदार सुविधांबाबत चर्चा

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर येथील विमानतळाच्या सर्वांगीण विकासासाठी विमानतळ सल्लागार समितीची महत्त्वपूर्ण बैठक न्यू पॅलेस येथे पार पडली. समितीचे अध्यक्ष तथा खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पोलीस अधीक्षक योगेश कुमार, करवीर प्रांताधिकारी मोसमी चौगुले तसेच सचिव अनिल शिंदे यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते.**



न्यू पॅलेस येथील विमानतळ सल्लागार समितीच्या बैठकीप्रसंगी उपस्थित खास. श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, खास. धनंजय महाडिक, खास. धैर्यशील माने, जिल्हाधिकारी अमोल येडगे.

बैठकीत कोल्हापूर विमानतळाचा विस्तार, प्रवासी सुविधांमध्ये वाढ आणि भविष्यातील हवाई सेवा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.सध्या सुरू असलेल्या चांदी व औद्योगिक साहित्याच्या कार्गो सेवेचा विस्तार करून त्यामध्ये स्थानिक फुले, फळे आणि भाजीपाला वाहतुकीचा समावेश करण्यासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात येणार आहेत. दिल्लीसह शिर्डी, नागपूर, विशाखापट्टणम, चेन्नई आणि इंदूर या शहरांसाठी विमानसेवा सुरू करण्याची मागणी बैठकीत करण्यात आली.कोल्हापूरच्या औद्योगिक, व्यापारी आणि पर्यटन विकासात विमानतळाची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सेवा आणि सुविधा उभारण्यावर एकमत झाले.

एअरबस सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली ट्रायल लँडिंग प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.मोठ्या विमानांच्या उड्डाणासाठी धावपट्टी विस्ताराचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. या कामासाठी आवश्यक भूसंपादन पूर्ण झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. प्रवाशांच्या सोयीसाठी विमानतळावर दर्जेदार टॅक्सी सेवा, अल्पोपहार केंद्र, स्वच्छ प्रतीक्षालय तसेच पर्यटकांसाठी माहिती केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. तिकीट दर सर्वसामान्यांना परवडतील अशा पातळीवर ठेवण्यासाठी विमान कंपन्यांशी समन्वय साधण्याचे ठरले.

विमानतळाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या ऑडिटमधील त्रुटी दूर करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. विमानतळाचा उपयोग स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

# कबनूर,कुंभोज घटनेतून प्रशासन बोध घेणार?

रुकडी,ता.२८(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र ही संतांची आणि महापुरुषांची भूमी आहे.ज्या महापुरुषांनी आपल्या विचारांनी समाज जोडण्याचे काम केले, आज त्याच महापुरुषांच्या प्रतिमा आणि पुतळे काही समाजकंटकांकडून समाज तोडण्यासाठी वापरले जात असल्याची दुर्दैवी बाब समोर येत आहे. कबनूर, कुंभोज यांसारख्या गावांमधील अलीकडच्या घटना पाहता, प्रशासन यातून काही बोध घेणार की केवळ तमाशा बघणार, असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.**

### डिजिटल बोर्ड

गावची यात्रा, उरुस, वाढदिवस किंवा जयंती उत्सव आले की सार्वजनिक ठिकाणी डिजिटल बोर्ड (फ्लेक्स) लावण्याची जणू स्पर्धाच लागते. या बोर्डवर ग्रामदेवता आणि महापुरुषांचे फोटो मोठ्या अभिमानाने लावले जातात. मात्र, हेच बोर्ड आता सामाजिक सलोखा बिघडवण्याचे शस्त्र बनले आहेत. रात्रीच्या अंधारात बोर्ड फाडणे, शाई फेकणे किंवा विद्रुपीकरण करणे असे प्रकार करून जाणीवपूर्वक दोन समाजात भिंत उभी केली जात आहे.

### प्रशासनाचा इव्हेंट मॅनेजमेंटवर भर?

एखादी घटना घडल्यानंतर शेकडो पोलिसांचा फौजफाटा तैनात करणे, जमावबंदी लागू करणे (कलम १४४),इंटरनेट बंद करणे या गोष्टींवर प्रशासन कोट्यवधी रुपये खर्च करते. मात्र, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून स्थानिक प्रशासनाला सोबत घेऊन काही ठोस पावले का उचलली जात नाहीत? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### जबाबदारी निश्चितीचा अभाव

बोर्ड लावण्यापूर्वीच संबंधित व्यक्ती किंवा मंडळाकडून लेखी हमीपत्र आणि सुरक्षिततेची जबाबदारी का घेतली जात नाही?

### सीसीटीव्हीकडे दुर्लक्ष

संवेदनशील भागात सीसीटीव्ही लावण्याबाबत ग्रामपंचायतींना सक्त आदेश का दिले जात नाहीत?

## सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्हीकडे दुर्लक्ष

## समाजकंटकांवर कडक कारवाईची गरज

### राजकीय मौन

समाजात निर्माण होणारी ही तेढ जर कुणाच्या राजकीय फायद्यासाठी असेल, तर स्थानिक पुढारी गप्प राहून केवळ तमाशा बघत आहेत, ही लोकशाहीची मोठी शोकांतिका आहे.

### मुठभर लोकांच्या कृत्यामुळे समाज वेठीस

काही मोजक्या विकृत मानसिकतेच्या लोकांमुळे संपूर्ण गावाला आणि समाजाला वेठीस धरले जाते. पोलीस तपासाचा फेरा, न्यायालयाच्या चकरा आणि भीतीचे वातावरण यामुळे सामान्य माणसाचे जगणे कठीण झाले आहे. महापुरुषांच्या नावाचा वापर करून स्वतःची राजकीय पोळी भाजणाऱ्यांनी आता तरी थांबायला हवे, अशी मागणी जोर धरत आहे.

### सावधान! आज शेजारचं गाव जळतंय... उद्या तुमचंही असू शकतं!

मित्रांनो, सोशल मीडियावर किंवा बातम्यांमध्ये जेव्हा आपण कबनूर, कुंभोज किंवा इतर कोणत्याही गावात झालेली दंगल, दगडफेक किंवा तणावाची बातमी वाचतो, तेव्हा आपण ती फक्त एक बातमी म्हणून वाचून सोडून देतो. आपल्याला वाटतं, हे तिथे झालंय, आपल्या गावात सगळं शांत आहे.

### वेळ आता कृतीची आहे...

केवळ निषेध नोंदवून किंवा पोलीस बंदोबस्त वाढवून हे प्रश्न सुटणारे नाहीत. बोर्ड लावणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे हाच एकमेव पर्याय आहे. अन्यथा, अशा डिजिटल ठिणग्या सामाजिक शांततेची राखरांगोळी केल्याशिवाय राहणार नाहीत.

# निपाणी मतदार संघात विकासकामांचा सपाटा सुरु ठेवला

## आम.शशिकला जोल्ले; कारदगा येथे विविध विकासकामांचे उद्घाटन

बारवाड,ता.२८(वार्ताहर)-

**निपाणी मतदार संघ म्हणजे माझं माहेर आहे.या माहेरातच माझ्या माहेरच्या माणसांनी मला तीन वेळा मतदानरुपी ओटी भरून निवडून दिले तर मंत्रिपदाचा मानही मिळवून दिला.त्यामुळे मी माझ्या माहेराला कधीच विसरणार नाही.म्हणूनच मी विकास कामांचा सपाटा सुरू ठेवला आहे,असे उदगार आम.शशिकला जोल्ले यांनी कारदगा येथे बोलताना काढले.**

कारदगा येथे ५६ लाख ७५ हजार रुपये निधीतून ग्रामदैवत बंगालीबाबा देवस्थान ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकपर्यंत निर्माण करण्यात आलेल्या स्ट्रीट लाईटचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा तसेच २२ लाख रु.निधीतून कन्नड शाळा खोली व हायटेक शौचालय बांधकाम शुभारंभ,२५ लाख रु.निधीतून लोके पाणंद पूल व रस्ता कामाचा शुभारंभ,चौंडेश्वरी मंदिर मंडप बांधकामास ५ लाख रुपये मंजुरीचे पत्र वितरण आणि वृद्ध,विधवा पेन्शनपत्र वितरण अशा संयुक्त कार्यक्रम प्रसंगी बोलताना आम.शशिकला जोल्ले यांनी वरील उदगार काढले.


कारदगाः येथे स्ट्रीटलाईट व विविध विकास कामांच्या उद्घाटनप्रसंगी आम.शशिकला जोल्ले,हालशुगर चेअरमन एम.पी.पाटील व इतर.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या,जिल्हा बँकेचे अध्यक्ष आण्णासाहेब जोल्ले यांच्या मार्गदर्शनाने कै.एस.के.माळी यांचे स्वप्न स्ट्रीट लाईटच्या माध्यमातून पूर्ण केले आहे.तसेच विविध कामांचा लोकार्पण व उद्घाटन समारंभ पार पडला याचे समाधान वाटत आहे.आम्ही आतापर्यंत जोल्ले उद्योग समूह,शासकीय योजनेतून विकासकामे राबवली आहेत.त्याचबरोबर आता हालसिद्धनाथ कारखान्यामार्फत शेतकरी,सभासद व सेवक वर्गाच्या हितासाठीही योजना राबवत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी नितेश खोत, हालशुगर चेअरमन एम.पी.पाटील, संचालक देवाप देवकते, भाजप ग्रामीण अध्यक्ष बाळासाहेब कदम, यशवंत गावडे आदींनी आपल्या मनोगतातून जिल्हा बँक अध्यक्ष आण्णासाहेब जोल्ले व आम.शशिकला जोल्ले यांच्या कार्याबद्दल प्रशंसा व्यक्त केली.प्रारंभी स्ट्रीट लाईटचे उद्घाटन व विविध विकास कामांचा शुभारंभ आम.शशिकला जोल्ले यांच्या हस्ते हालशुगर चेअरमन एम.पी.पाटील, भाजप ग्रामीण अध्यक्ष बाळासाहेब कदम, हालशुगर संचालक शरद जंगटे, देवाप देवकते, रामगोंडा पाटील, अरविंद खराडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्यानंतर स्वागत व प्रास्ताविक अरविंद खराडे यांनी केले.यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी हालशुगर व्हा.चेअरमन पवन पाटील, समीत सासणे, प्रकाश शिंदे, सुहास गुगे, राजू भदरगडे, सिध्दू नराटे, श्रीकांत बन्ने, युनूस मुल्लानी, अत्ताउल्ला पटेल, दादासो नरगट्टे, मलिक सदगुरू, सुकुमार माळी,रवी ऐवाळे, वनिता सप्तसागरे, वैशाली खराडे, मंगल कुंभार, शकुंतला माने यांच्यासह कारदगा, बारवाड,मांगूर,ढोणेवाडी, माणकापूर, बोरगाव, भोज आदी परिसरातील महिला, पुरुष,भाजप कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश काशिद यांनी तर आभार अरविंद कांबळे यांनी मानले.

### राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत आदित्य बेडक्याळे प्रथम

कागवाड,ता.२८(वार्ताहर)-



**कर्नाटक कुस्ती संघाच्यावतीने नंजनगुड (कर्नाटक) येथे नुकतेच घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत ८६ किलो वजन गटात कागवाडचा कुस्ती पैलवान आदित्य अविनाश बेडक्याळे यांनी प्रथम क्रमांक पटकावून नंजनगुड केसरीचा मानकरी ठरला आहे.**

या स्पर्धेत त्याला चांदीची गदा व रोख रक्कम देऊन कुस्ती संघाच्यावतीने गौरविण्यात आले. सध्या तो धारवाडच्या साई अकॅडमी येथे राहून कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहे.कोल्हापूर जिल्ह्यातील शरद सहकारी साखर कारखाना,नरंदे यांच्या प्रेरणा, प्रोत्साहनाच्या आर्थिक पाठबळावर त्याने यश संपादन केले आहे. त्याला शिवमोगाचे कुस्ती गुरु (वस्ताद) शंकरप्पा बंडाजी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### निपाणीत आज धम्म परिषदेचे आयोजन

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)-

**मराठा मंडळ निपाणी येथे आज रविवार ता.१ मार्च रोजी धम्म परिषदेचे आयोजन केले आहे. कार्यक्रमास प्रमुख वक्ते आंबेडकरी विचाराचे गाढे अभ्यासक जगदीश ओहाळ, ज्येष्ठ विचारवंत डॉ.अच्युत माने हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या परिषदेचे अध्यक्षस्थान भारतीय बौद्ध महासभा उत्तर कर्नाटकाचे अध्यक्ष मनोहर मोरे भूषविणार आहेत.**

ध्वजारोहण शंभो कल्लोळकर माजी आयएएस अधिकारी यांच्या हस्ते होईल.परिषदेला भटकळचे प्रांताधिकारी प्रवीण कारंडे, लेखक परशुराम कर्निंग,भारतीय बौद्ध महासभचे दक्षिण कर्नाटक अध्यक्ष सिद्धराजू, मल्लिकार्जुन भालके यांच्यासह कर्नाटकातील सर्व जिल्हाध्यक्ष व अनेक पदाधिकारी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.या धम्म परिषदेत भंते नवापाल भालकी व भंते ज्ञानज्योती बेळगाव हे धम्म देशना देणार आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून भव्य धम्म परिषदेचे आयोजन केले आहे. या धम्म परिषदेची संपूर्ण तयारी झाली असून या धम्म परिषदेसाठी निपाणी व परिसरातील आंबेडकर चळवळीचे कार्यकर्ते व धम्म बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शताब्दी महोत्सव कमिटी व धम्म परिषदेचे अध्यक्ष सुधाकर माने यांनी केले आहे.


गारगोटी येथे मराठी भाषा दिनानिमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले.

### जावडेकर महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

गारगोटी,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथील आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

मराठी भाषेचे महत्त्व विशद करणारी भाषणे, खाद्यसंस्कृती रांगोळी, मेहंदी, पाककला स्पर्धा, आर्ट क्राफ्ट प्रदर्शन भरविले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मराठी भाषेबद्दलचा अभिमान व्यक्त केला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.पी.एस.देसाई या होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रा.डॉ.पी.बी.दराडे, प्रा.डॉ.आर.के. शेळके, प्रा.एस.आर.बाड उपस्थित होते. सूत्रसंचालन शरयू वास्कर यांनी केले.

## जनवाडात जनावरांच्या प्रदर्शनात लाखोंची उलाढाल

कारदगा,ता.२८(प्रतिनिधी)-

**जनवाड (ता.चिकोडी) येथील श्री महादेव स्वामी धर्मरमठाच्या वार्षिक यात्रेमध्ये भरविण्यात आलेल्या जनावरांच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तर खरेदी विक्रीस मंदी जाणवली असली तरी देखील प्रदर्शनात लाखो रुपयांची उलाढाल झाली.**

यांत्रिकीकरणातही बैलांचे अस्तित्व टिकून असल्याचे पहाण्यात आले.विविध जातींचे जातीवंत पाडी व बैले अनेकांचे लक्ष वेधून घेतली. या बैलांना लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीसाठीही शेतकरी व जनावर मालकांनी गर्दी केली होती.प्रतिवर्षी जनवाड येथे जनावरांचे प्रदर्शन भरविले जाते.यंत्रांच्या अतिक्रमामुळे बैलाजोगी केली जाणारी शेती मधील मशागतीची कामे मंदावली जात आहेत.बैलांची जागा हळूहळू यंत्रानी काबीज केल्याने बैलांची संख्याही कमी होत चालली आहे.गावात पन्नास साठ बैलांच्या जोड्या असणाऱ्या आता पाच,दहावर येवून ठेपल्या आहेत.बैलांचे महत्त्व ओळखून व येणाऱ्या पिढीला बैलांची माहिती मिळावी या हेतूने महादेव स्वामी धर्मर मठाच्या पुढाकाराने विविध जातीवंत यामध्ये बिन



दाती, दोन चार दाती, पाडी, बडाव खिलारी, खानदेशी,जर्शी, जातीची बैले पाडी, गाय यांचे प्रदर्शन मोठ्या प्रमाणात भरविले जाते.या प्रदर्शनासाठी सांगली,कोल्हापूर इचलकरंजी,मिरज, मूरगूड, निपाणी, चिकोडी, कागवाड, राधानगरी, रायबाग, संकेश्वर आदी भागातील शेतकरी व व्यापारी यांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.जनावर प्रदर्शनांमधून जातिवंत जातीची बैले व पाडी ५० हजार रुपये पासून ते लाखाच्यावर खरेदी विक्री झाली.जनावरांना लागणाऱ्या दोऱ्या, वेसन, सापती, दावी, मुसकी, रंगीबेरंगी साहित्य, गोंडे, घुंगरू, चाबूक, काठी, चामडी व इतर साहित्य खरेदीसाठी शेतकरी वर्गानी एकच गर्दी केली होती. जनावरांना वैरण पाण्याची व्यवस्था यात्रा कमिटीच्यावतीने करण्यात आली होती.

## धुलीवंदन, रंगपंचमी शांततेत साजरी करा

### पो.निरी.शिवशरण अवजी यांचे शांतता सभेत आवाहन

संकेश्वर,ता.२८(प्रतिनिधी)-

**संकेश्वरात येत्या रविवार ता.८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी १ वाजेपर्यंत धुलीवंदन-रंगपंचमी पारंपरिक पद्धतीने,शांततेने साजरी करावी, असे संकेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवशरण अवजी यांनी शांतता कमिटीच्या सभेत बोलताना सांगितले.**

ते पुढे म्हणाले,संकेश्वर शांतताप्रिय गाव म्हणून ओळखले जात असले तरी अलीकडे घडलेल्या कांही घटनांनी संकेश्वरच्या नावाला गालबोट लागले आहे.रंगोत्सवात कोणत्याही घटना घडू नये याची खबरदारी सर्वांनी घ्यावयाची आहे. यावेळी


संकेश्वरः शांतता सभेत बोलताना शिवशरण अवजी.

हुक्केरी ग्रामीण विद्युत सहकारी संघाचे संचालक गजानन क्वळी, माजी नगरसेवक डॉ.जयप्रकाश करजगी, दिलीप होसमनी, रोहण नेसरी, महेश हट्टीहोळी, साकीबअली कमते यांनी मनोगत व्यक्त केले.पालिका मुख्याधिकारी प्रकाश मठद यांनी रंगोत्सवात लोकांना पाण्याची कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे सांगितले.

यावेळी संकेश्वर घटक कॉंग्रेसचे अध्यक्ष संतोष मुडशी, मुख्तार नदाफ, हुक्केरी विद्युत संघाचे संचालक शिवानंद मुडशी, चिदानंद कर्देण्णावर, सुभाष कासारकर, सचिन भोपळे, विनोद नाईक, प्रशांत कोळी, हाजी दस्तगीर तेरणी,संतोष सत्यनाईक यांच्यासह युवक उपस्थित होते. आभार पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल नाईक यांनी मानले.

### ढोणेवाडीत आजपासून आत्मा मालिक वार्षिक सत्संग महोत्सव

ढोणेवाडी,ता.२८(प्रतिनिधी)

**आत्मा मालिक ध्यानपीठ, संकपाळ मळा, ढोणेवाडी (ता.निपाणी) येथे विश्वात्मक गुरुदेव सद्गुरु आत्मा मालिक माऊलींच्या आशीर्वादाने व श्री संत साधनानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ता.१ ते ५ मार्च अखेर,आत्मा मालिक वार्षिक सत्संग महोत्सव व ध्यान नाम आत्मचिंतन कार्यक्रम संत महांतांच्या उपस्थित आयोजित करण्यात आला आहे.**

ता.५रोजी संतवाणी कार्यक्रम होणार आहे.तरी सदर कार्यक्रमाचा आत्मप्रेमी ,वारकरी, सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा,असे आवाहन संत साधनानंद महाराज व अध्यक्ष सर्व विश्वस्त, आत्मा मालिक ध्यानपीठ, संकपाळ मळा, ढोणेवाडी यांनी केले आहे.

### निपाणी वाचनालयातील स्टोअर रुममध्ये विद्युत व्यवस्था नसल्याने गैरसोय

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथील निपाणी नगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालयाच्या स्टोअर रूममध्ये गेल्या अनेक दिवसापासून विद्युत व्यवस्था नसल्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांना मोबाईल बॅटरीच्या उजेडामध्ये काम करावे लागत आहे.त्यामुळे निपाणी पालिकेचा दिव्याखाली अंधार अशी परिस्थिती झाल्याचे चित्र दिसून येत आहे.**



याबाबत येथील कर्मचारी पांडुरंग घस्ते यांच्याकडे चौकशी केली असता गेले महिनाभर स्टोअर रूममध्ये लाईट नसल्याचे सांगितले. या संदर्भात नगरपालिकेकडे त्यांनी तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष झाले आहे.सदर वाचनालयात अनेक वाचक व विद्यार्थी वृत्तपत्र व पुस्तके वाचण्यासाठी दररोज येत असतात. अशा स्थितीत टोअर रूममध्ये विद्युत व्यवस्था नसल्याने कर्मचाऱ्याना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे पालिका प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

### देशासाठी सैन्यात करिअरच्या अनेक संधी-राहूल कानडे

चिकोडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**देशासाठी सैन्यात करिअर करण्याच्या अनेक संधी आहेत.प्रत्येक युवकांनी ध्येय, सकारात्मक दृष्टिकोन व सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या बळावर या संधीचा लाभ घेत पुढे यावे,असे प्रतिपादन संरक्षण दलाचे प्रशिक्षक राहुल कानडे यांनी व्यक्त केले.**

ते केएलई संस्थेच्या बसवप्रभू कोरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या एनसीसी विभागातर्फे सैन्यातील करियर संधी या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानावरुन डॉ. बी.जी. कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.सुधीर कोठीवाले यांनी प्रास्ताविक केले.यावेळी डॉ. विनायक मंजलापुर,सदाशिव हादीमणी आदी उपस्थित होते.

## मराठी भाषा सामाजिक संस्कृतीसह इतिहासाची शान

### डॉ.सतीश जाधव

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)-

**मराठी ही केवळ बोलण्याची भाषा नाही, तर आपल्या सामाजिक संस्कृतीची, इतिहासाची शान आहे. मराठी भाषेला संत साहित्य, शाहिरी, पोवाडे तसेच आधुनिक साहित्याची समृद्ध परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज यांसारख्या संतांनी मराठीला आध्यात्मिक उंची दिली तर कवी कुसुमाग्रज आणि वि.स.खांडेकर यांसारख्या साहित्यिकांनी तिला लोकांच्या मनाशी जोडले, असे मत डॉ.सतीश जाधव यांनी व्यक्त केले.**

केएलई संस्थेचे जीआय बागेवाडी महाविद्यालयात मराठी


निपाणी येथील कार्यक्रमात बोलताना डॉ.सतीश जाधव, व्यासपीठावर प्राचार्य एम.एम.हूरळी,डॉ.एस.एम.रायमाने, प्रा.संगीता गुरवानगोळ, डॉ.अतुल कांबळे व इतर प्रमुख मान्यवर.

विभागाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिन आणि कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीचे औचित्य साधून लेखकांच्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे आणि लेखक या नात्याने धारवाड विद्यापीठातील मानसशास्त्र विषयाचे प्रा.डॉ. सतीश जाधव बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एम.एम हूरळी म्हणाले, युवकांनी इतर ठिकाणी वेळ वाया न घालवता ग्रंथालयाचा उपयोग करून मराठी भाषा असो किंवा कोणतीही भाषा असो वाचनात आपला वेळ घालवावा,असे आवाहन केले.मराठी विभागप्रमुख डॉ.श्रीपती रायमाने यांनी प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.व्यासपीठावर आयक्यूएसी समन्वयक डॉ.अतुल कुमार कांबळे,संगीता गुरवानगोळ, डॉ.बसवराज जनगोडा, डॉ.एम. डी.गुरव,प्रा.शंकरमूर्ती के.एन, नागराज बेळगावकर, डॉ.आनंद केंचेंकनवर,प्रा.सागर मिरजे, प्रा.रुपा आकिवेटे, प्रा.मोनिका आर, डॉ.सुनिता हुन्नरगी यांच्यासह प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.रेवती गिरीमल या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले.सोनाली पाटील यांनी स्वागत केले.गायत्री मधाळे हिने सूत्रसंचालन केले तर वैष्णवी माळी यांनी आभार मानले.

### निधन वार्ता

#### यशवंत कट्टीकर

एकसंबा,ता.२८(वार्ताहर)-



मलिकवाड येथील रहिवासी यशवंत बाळू कट्टीकर (वय ७५) यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून,भाऊ असा परिवार आहे.

#### इंदुबाई निऊंगरे

साके,ता.२८(वार्ताहर)-



साके (ता.कागल) येथील इंदुबाई मारुती निऊंगरे (वय ५६) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात पती, मुलगी,दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे.


कागल पोलिसांना निवेदन देताना सागर कोंडेकर व इतर कार्यकर्ते.

### कागल सीमातपासणी नाका कंपनीवरती मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

कागल,ता.२८(प्रतिनिधी)-

**असुरक्षित वाहतूक व्यवस्थेतून अनेक जीवांच्या जीवाशी खेळणारा कागलचा सीमा तपासणी नाका आहे. नाक्यावरील व्यवस्थापन करणाऱ्या कंपनीवरती सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा,अशी मागणी कोल्हापूर जिल्हा किसान कॉंग्रेसच्यावतीने कागल पोलिसांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

महाराष्ट्र -कर्नाटक सीमेवरती कागल शहरा नजीक महामार्गावर वाहन तपासणी नाका आहे. हा नाका सुरू झाल्यापासून या ठिकाणी वाहतूक सुरक्षेचे बारा वाजले आहेत.सर्व नियम धाब्यावर बसविले आहेत.ता.२३ फेब्रुवारी रोजी रामदास रंगराव पाटील,(राहणार-सोनगे,ता-कागल), ता.२५ फेब्रुवारी रोजी शब्बीर हजरत देसाई(रा. हेरले,ता.हातकणंगले) हे येथील असुरक्षित वाहतुकीस बळी पडले आहेत.असुरक्षित वाहतूक व्यवस्थेतून मृत्यूची मालिकाच सुरू झाली आहे. हा तपासणी नाका चालवणाऱ्या अदानी समूह कंपनीच्या व्यवस्थापन विरोधात सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा,अशी मागणी कोल्हापूर जिल्हा किसान कॉंग्रेसच्यावतीने कागल पोलिसांकडे केली आहे. याबाबतचे निवेदन महिला पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया भिसे यांनी स्वीकारले . यावेळी सागर कोंडेकर, रणजीत पाटील,शरद वासकर, बाळासो झगडे,शंकर वासकर,वैभव सनगर, अमर चौगुले आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## शाहू कारखाना एआयद्वारे ऊस उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देणार

### समरजितसिंह घाटगे; ना.चिखलीत कुत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान संचचे उद्घाटन

ना.चिखली,ता.२८(वार्ताहर)-

**उसाचे दिवसेंदिवस घटत चाललेले उत्पादन ही साखर उद्योगासाठी चिंतेची बाब असून उत्पादनवाढ हाच त्यावरचा प्रभावी उपाय आहे.कारखान्याचे संस्थापक स्वर्गीय विक्रमसिंहराजे घाटगे यांनी शाहू कारखान्यात ऊस उत्पादन वाढीसाठी स्वतंत्र ऊस विकास कार्यक्रम सुरू करून कमी उत्पादन असणाऱ्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.**

त्याच विचारांची परंपरा पुढे नेत आता प्रयोगातून उपयुक्त ठरलेल्या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यास कारखाना प्रोत्साहन देत आहे.यामध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन शाहू उद्योग समूहाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांनी केले.


ना.चिखलीः राजेंद्र नुल्ले या शेतकऱ्याच्या प्रक्षेत्रावर उभारलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान संचचे उद्घाटन करताना समरजितसिंह घाटगे,अमरसिंह घोरपडे,जितेंद्र चव्हाण व इतर मान्यवर.

नानीबाई चिखली (ता.कागल) येथील श्री छत्रपती शाहू सहकारी साखर कारखान्याच्या पुढाकाराने राजेंद्र नुल्ले यांच्या प्रक्षेत्रावर कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान संच उभारण्यात आला.या संचचे उद्घाटन समरजितसिंह घाटगे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी ते बोलत होते.

स्वर्गीय राजेसाहेब नेहमी सांगत असत की, कारखान्याने कितीही चांगला दर दिला तरी उसाचे उत्पादन वाढल्याशिवाय शेती परवडणार नाही. त्यामुळे ऊस उत्पादन वाढीसाठी कारखान्याच्या विविध योजनांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.एआय तंत्रज्ञान वापरणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शाहू साखर कारखाना ठामपणे उभा राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.यावेळी शाहू कृषीचे संचालक राजेंद्र नुल्ले यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी व्हा. चेअरमन अमरसिंह घोरपडे, कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण,राजे बँकेचे व्हा.चेअरमन रवींद्र घोरपडे, संचालक संजय चौगुले, प्रकाश पाटील, कार्यकारी संचालक अरुण पाटील, शाहू कृषीचे संचालक जगदीश मोरे, कार्यकारी संचालक सदानंद घोरपडे, पंचायत समिती सदस्या सुवर्णा जाधव, सर्जेराव तुकान,तुकाराम संकपाळ, आण्णासाहेब गळतगे आदी उपस्थित होते.शेती अधिकारी दिलीप जाधव यांनी स्वागत केले.ऊस विकास अधिकारी सुजयकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले.बाळकृष्ण काईगडे यांनी आभार मानले.

#### ठिबक सिंचनसाठी प्रोत्साहनपर महत्वकांक्षी योजना

शाहू साखर कारखान्यामार्फत शेतकऱ्यांना ठिबक सिंचन बसवण्यासाठी प्रोत्साहनपर महत्वकांक्षी योजना समरजितसिंह घाटगे यांनी जाहीर केली. या योजनेनुसार ठिबक सिंचनसाठी एकरी अंदाजे येणाऱ्या साठ हजार रुपये रकमेपैकी दहा हजार रक्कम शेतकऱ्याने भरायची आहे,तर उर्वरित रक्कम राजे बँकेमार्फत सवलतीच्या व्याजदरात शेतकऱ्यांना विना जामीनदार देण्यात येणार आहे.तसेच कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांप्रमाणे कार्यक्षेत्राबाहेरील सातत्याने ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांनाही खते, बियाणे, औषधे व इतर अनुषंगिक निविष्ठा उधारीवर उपलब्ध करून दिल्या जातील, अशीही घोषणा समरजितसिंह घाटगे यांनी केली.

### भारतमाता हायस्कूलमध्ये मराठी राजभाषा दिन संपन्न

बिद्री,ता.२८(प्रतिनिधी)-

**मराठी भाषा ही आपल्यासाठी संस्काराचे बोल आहेत.मराठी भाषा कधी प्रेमळ वाटते तर कधी समाजाच्या भल्यासाठी ती कठोरही बनते. तिच्या शब्दांची शक्ती प्रचंड आहे,असे प्रतिपादन कथानथनकार महादेव कांबळे यांनी केले.**

बिद्री (ता.कागल) येथील भारतमाता हायस्कूलमध्ये ज्ञानपीठ विजेते कविवर्य कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर यांच्या जन्मदिनी आयोजित केलेल्या मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.पी.पाटील हे होते.कार्यक्रमास एम.जी.फराकटे, सी.डी कुंभार, टी.आर.पाटील, सौ.एस.एस. फराकटे, व्ही.आर. कुंभार,एस.एस.माजगावकर, एस.एम. पाटील, सौ.जी.यु.महिंद, सौ.के.पी. पाटील, व्ही.डी.वारके, सतिश चव्हाण, अनिल कांबळे, राजेंद्र वारके यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**विकणे- १)** १८' X २.५' फुट लोखंडी जिना (१ महिना वापरलेला), २) ३'X७' फुट स्टील रोलिंग शटर. संपर्क- ९८९०६९१२१३, इचलकरंजी.

**शिरढोण ता. शिरोळ,** मोरे पाणंद रोडटच २ एकर बागायत शेती योग्य किंमत आलेस विकणे आहे. संपर्क- ९२०९२३२१०१.

**आळते येथील** कुंथुगिरीजवळ फार्म हाऊससाठी उपयुक्त ६५ गुंठे शेतजमीन विकणे आहे. संपर्क- ९५६११४४१२५, ८६००५७७१३७.

**घर विकणे आहे-**दत्त नगर ग.नं.१३, कबनूर.. जागा. २०X६० मो. ९१५८३०९९९७, ९९७५९९८४७९.

**लालमाती नदीची** मळीची सुपिक कसदार लालमाती बागेसाठी व लॉनसाठी डंपरने ट्रॅक्टरने व पोत्याने घरपोच मिळेल. संपर्क- ८७८८२०४५१३.

**शहापूर कृष्णानगर** भागात २४०० स्क्वे. फूट जागेवर ३ मजली आरसीसी इमारत (चालू भाडे ५०००० रूपये) गहाणवट किंवा विक्री करणे आहे. संपर्क- ९४२३८६११९२

**टाटा झिप विकणे आहे.** २०१२ मॉडेल फूल कंडिशन संपर्क- ७७४५०५१२००, ९४२०३५२७२९

**अहमदाबाद ४० ड्रमचे** वायडिंग मशिन चालू स्थितीत विकणे आहे. संपर्क-७७४५०५१२००, ९४२०३५२७२९

**विकणे आहे.** सिध्दिविनायक मंदिरजवळ, जवाहरनगर, ३२०० स्क्वे. फूट जागेमध्ये डबल मंजिल बांधकाम आरसीसी पूर्ण सर्व सोयीनियुक्त, पाणी. ९७६४७८१५८३, ९८५०६१७१५१

**कारखाना (शेड) विकणे आहे.** पत्ता- २ नं. गल्ली, शाहूनगर, चंदूर (१) ६०X ५० फूट आकारातले २४ पॉवरलूम बसतील. (२) कांडी मशिनसाठी वेगळी खोली. (३) प्रशस्त ऑफिस १९ एचपी लाईटसह पाण्याची सोय, सर्व सोयीनियुक्त. संपर्क- ९१७२५७३१८२

**त्वरीत विकणे-** चंदूर, शाहूनगरमध्ये मेन रोडपासून हाकेच्या अंतरावर ८०० ते १००० चौ. फूट चे एनए प्लॉट विकणे. संपर्क- ८१४९९६५६९९, ९८९०२७४१७६

**१) जे.के. नगरच्या उत्तरेस** तारदाळ हद्दीमध्ये दोन रस्ते असलेला २९००० (एकोणतीस हजार) चौ. फूट कलेक्टर औद्योगिक एनए असलेला क्लिअर टायटल प्लॉट विकणे आहे. २) महासत्ता चौक ते ओढ्यातून जाणारा टाकवडे रस्ता, नक्षत्र प्लॉटिंगशेजारी रहिवाशी प्रांत एनए ७०X ६२=४२०० चौ. फूट प्लॉट विकणे आहे. संपर्क- ७०६६८६१४७४

**जुने पॉवरलूम** विकत घेऊ. संपर्क- ९४२३२८७०३६

**विकणे आहे.** मारूती Alto 800- 2016 सिंगल ओनर, व्हाईट कलर, व्हेरी गुड कंडिशन लेस ड्रिव्हन संपर्क-साई ऑटो लिडस. ९८२२००९७८८, ९६३७९५१७५६

**हॉटेलचे साहित्य विकणे.** शेगडी, कढई, भांडी व फ्रिज व इतर मटेरियल. संपर्क-९३२४१५८५४७, ९८५०९४७३७९

**सांगली रोड** मैल खड्ड्याला लागून २ रस्त्याचा प्लॉट विकणे आहे. ४९६० फूट. संपर्क- ९८५०१४९५३५, ९३७३३५७७३३

**चालू स्थितीत** इचलकरंजी पासून जवळच बांबू हाऊस गार्डनसह सर्व सोयीनियुक्त रिसॉर्ट, स्विमींग पूलसह विकणे आहे. १५,००० स्क्वे. फूट, लॉजिंग रेस्टारंट. संपर्क- ९३२२५९७६७५

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

**महासत्ता चौकमध्ये** १ बीएचके, २ बीएचके फ्लॅट व ऑफिससाठी बुकिंग सुरू आहे. स्वामी समर्थ मंदिराजवळ, पॅराडाईज कॉलनी, इचलकरंजी. ९८२२१८७१९९

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क- ८३१७२९१००८

## * नोकरी विषयक *

**Urgent Vacancy** At Gmt Corporation Pvt.Ltd., Yadrav 1) Final Inspection-DME/Be Mechanical 2) Documentation/Production Engineer- Dme/Be Mechanical. Contact - 9922939844.

**MG कार वॉश-** टू व्हिलर व फोर व्हिलर कार वॉशसाठी गरीब व गरजू कामगार कायम स्वरूपी पाहिजे. संपर्क-८८८८८१५७५६

**Require-** 1) Development Incharge. 2) Production Incharge. 3) Quality Head. 4) Supervisor. 5) CNC/VMC Operator. 6) Machine Shop Incharge. 7) Molder. 8) Driver. Contact. 9022761277

**आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये** कामासाठी गरजू मुलगा व मुलगी पाहिजे. अट - शिक्षण - १२ वी, टू व्हीलर चालवता येणे आवश्यक वयोमर्यादा - १८ ते ३० वर्षे. संपर्क - ९५६१३९९७५५

**कामगार पाहिजे-** इलेक्ट्रीकल दुकानामध्ये काऊंटर सेल्समन कामाकरीता मुलगा/मुलगी अथवा शिकाऊ/अनुभवी वायरमन पाहिजे आहे. समक्ष भेटा- ९५२७००६०६०.

**पाहिजेत- डिस्पॅच** खात्यामध्ये अनुभवी/ शिकाऊ स्टाफ भरणे आहे. बेसिक कॉम्प्युटरचे ज्ञान हवे. कामचे ठिकाण इचलकरंजी व जयसिंगपूर फक्त पुरूष. संपर्क- ७७६८००८६०१.

**मार्केटींगसाठी** असिस्टंट पाहिजे (फ्रेशर) कोणत्याही शाखेचा पदवीधर. कॉम्प्युटरचे बेसिक शिक्षण अनिवार्य. बाहेरगावी जाण्याची व राहण्याची तयारी. संपर्क- श्रीम इंडस्ट्रीज, शहापूर- इचलकरंजी. मो. ९७६५०५७३५३.

**लेडीज रिसेप्शनिस्ट पाहिजे-** कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. साफल्य हॉस्पिटल, महासत्ता चौक, इचलकरंजी. मो. ९२८४७५७८९९, ८८३०५४५९८२.

**हुशार व अनुभवी** वेटर पाहिजेत (फुल टाईम) रहाणेची जेवणाची सोय. संपर्क- हॉस्टेल प्रतिनिधी, दत्तनगर, इचलकरंजी. ९४०३४८००००.

**कामगार पाहिजेत-** कामाची वेळ- सकाळी ६ ते २, संपर्क- सलगर चहा, रिलायन्स मॉलजवळ, इचलकरंजी. मो. ९२८४७६२७८०.

**इलेक्ट्रीकल शॉपमध्ये** कौंटर सेल व मार्केटींगसाठी मुले हवी आहेत. संपर्क- जी.पी. ब्रदर्स मेन रोड, इचलकरंजी. मो. ९५४५८४१३१४.

**देशी दारू दुकान व** बिअर कौंटरला कामगार पाहिजेत. संपर्क- ८६८०८०६८६८.

**अजय पेंटस्** जनता चौक, कल्पना टॉकीजजवळ, इचलकरंजी रंगाचे दुकानात कामगार पाहिजे. संपर्क- ९४०४७१२५६०, ८००७००३२४३.

**सीएनसी/व्हीएमसी प्रोडक्शन** सुपरवायझर पाहिजे- (दिवस/रात्र) पत्ता- श्री लक्ष्मी इंडस्ट्रीज, हातकणंगले, कंपनी- सिग्रेट इंटरनॅशनल. संपर्क- ९८५००५७५६३.

**११ वी, १२ वी गणित** विषय शिकवण्यासाठी बीएससी, एम.एसी, बी.ई. , बि.टेक, महिला शिक्षिका पाहिजेत. संपर्क- ९८८१५२५६४४.

**Immediate Required-** Experienced HR Post-1. Contact-8149286168

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

**पाहिजेत-नामांकीत** ॲडव्हर्टटाझिंग कंपनीमध्ये सुपरवायझर पाहिजेत. फिरण्याची आवड असणाऱ्यांना प्राधान्य. संपर्क- ९८२२६६९५४८.

**कामगार पाहिजे-** दुकानात कामासाठी प्रामाणिक कामगार पाहिजे. आकर्षक पगार. संपर्क- ९८५०३५९९५०.

**अकौंटंट पाहिजे-** दुकानात अकौंटींग कामासाठी अनुभवी अकौंटंट पाहिजे. संपर्क- ९८२२०२३६९९.

**दाताच्या दवाखान्यासाठी १२ वी** पास व कॉम्प्युटरचे ज्ञान असलेली फुल टाईम लेडीज रिसेप्शनिस्ट व असिस्टंट पाहिजे. तीन बत्ती चौकजवळ, इचलकरंजी. मो. ८९९९३०७३८१.

**इंचट होम इंडिया** पार्वती को.ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट, यड्राव येथे अकौंटंट पाहिजे. संपर्क- ९३२५३०५५३१.

**कामगार पाहिजे-** समृध्दी क्लिनिंग वेअर ॲण्ड ऑफ प्रोडक्ट सेल्समनसाठी कामगार पाहिजे. संपर्क- ८२७५२७१९९५.

**ब्रॅन्डेड मेन्स वेअर** शोरूममध्ये अनुभवी ४-५ सेल्समन पाहिजेत. आकर्षक पगार व कमिशन मिळेल. संपर्क-९६११८९५९८८

**टेलिकॉलिंगसाठी** लेडीज हव्या आहेत. शिक्षण- १० वी पुढे. वय- १८ ते ४०, महालक्ष्मी वधु-वर, सांगली रोड, इचलकरंजी. ८८३०२४०४२६

**गारमेंटमध्ये** ऑफिस कामासाठी दिवाणजी पाहिजे. कृष्णा गारमेंट, पत्ता- विक्रमनगर, इचलकरंजी. मो. ९९६०००९०३८

**ड्रायव्हर पाहिजे.** TR लायसन्ससह मुंबई-बेंगलोर लाईनसाठी अशोक लेलँड बडा दोस्त टेम्पोवर पगार- १५०००/- इचलकरंजी. संपर्क- ९८२२५३४४५३

### पाहिजेत

**फौंड्रीमशिन आणि स्टील फर्निचर मॅन्युफॅक्चरिंग कंपनीसाठी**

- मार्केटिंग असिस्टंट (फिल्ड वर्क)- २ जागा Dip./BSC
- बॅक ऑफिस (मार्केटिंग + HR)- २ जागा (विवाहीत स्त्री/पुरूष)
- प्रोडक्शन असिस्टंट-२ जागा Dip./BE Mech.
- इलेक्ट्रीशियन-२ जागा Dip./BE. Ele.
- PLC प्रोग्रॅमर - २ जागा
- फिटर - ४ जागा • वेल्डर - ४ जागा • हेल्पर - ८ जागा.
- लेसर कटिंग मशिन सुपरवायझर - २ जागा.
- शिटमेटल कॉन्ट्रॅक्टर / कामगार - ४ जागा.
- फॅब्रिकेशन कामगार - ४ जागा.

**अर्जासह प्रत्यक्ष भेटा**

**गणेश क्वॉलिटी मशिन्स प्रा. लि.**

कॅसल स्टोरेज सिस्टिम्स LLP, शहापूर, इचलकरंजी.
मो. नं. ९७३०८४७९४३, ९०४९४२५६७३
Email-account@ganeshfoundryequipment.com

**कापड दुकानासाठी** लेडीज स्टाफ पाहिजे. फुल टाईम व पार्ट टाईम. हॉटेल मिनाक्षी एनएक्स, हॉटेल ताराजवळ, इचलकरंजी. ९४०३८६०१७६.

**नमन एंटरप्रायजेस** डिस्ट्रीब्युटरसाठी अकौंटींगसाठी लेडीज पाहिजे. फ्रेशर चालतील. सांगली नाका, एसआयटी कॉलेजशेजारी, इचलकरंजी. मो. ८४४६३०५९४१.

**पाहिजेत-**१) व्हीएमसी ऑपरेटर- २, २) व्हीएमसी प्रोग्रॅमर-१, ३) सीएनसी प्रोग्रॅमर-१, ४) हेल्पर-२, ५) अकौंटंट- (बी.कॉम)-१, फुल टाईम/ पार्ट टाईम. आकर्षक पगार. संपर्क- ८३२९१०४२२३, ९८३४१८१०१६,

**हेल्पर कामासाठी** कामगार पाहिजे. वेळ- सकाळी ८ ते ५. संपर्क- यशवंत कॉलनीजवळ, इचलकरंजी. मो. ९७६७०५९४५४.

**कामगार पाहिजेत-** होलसेल औषध दुकानात, गोडाऊन व पॅकींग कामासाठी जेंटस् कामगार तसेच दुकानातील कामासाठी लेडीज कामगार तसेच अनुभवी सेल्समन पाहिजेत. पत्ता प्रो. सुशिल लाईफ केअर एल.एल.पी., पंचवटी टॉकीजजवळ, टेकईट मॉल शेजारी, इचलकरंजी. मो. ९४२३२७५२७६, ९०११३७३४७५.

**ई-सेवा/नेटकॅफेमध्ये** हुशार कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. पगार ८०००-१००००, श्रीकृष्णा सायबर कॅफे, गोविंदराव हायस्कूलजवळ, मेन रोड, इचलकरंजी. ९६२३१७०८३९.

**कामगार पाहिजेत.** किराणा दुकानात कामासाठी पार्टटाईम/ फूलटाईम जेंटस पाहिजेत. संपर्क- मोरे किराणा स्टोअर्स, मोठे तळे, इचलकरंजी. फोन-९९२१६०३६००

**होलसेल कापड** दुकानात कामासाठी मुले/मुली पाहिजेत. सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९८२३४२५७८५.

**पाणी बॉटल फॅक्टरीमध्ये** पाणी बॉक्स डिलेव्हरीसाठी चार चाकी टेम्पोवर ड्रायव्हर पाहिजे. आकर्षक पगार. संपर्क- ९०२८४४५५६०, ८६२३०६४४५५.

**पाहिजे-** ऑफिस कामासाठी टेलिकॉलर किंवा एमआर इंटन पाहिजे. संपर्क- ९३२२४९६३५.

**पेट्रोल पंपावर** पेट्रोल व डिझेल सोडण्यासाठी लेडीज/ जेंटस् कामगार पाहिजे. संपर्क- ९३५६६७०७४६, ९५४५४८४३१७.

**मार्ट-ओ** (Maha Bazzar) येथे स्टाफ कामगार भरती. पगार- १५०००/- रू. पर्यंत. पूर्ण कुटूंबासाठी मेडिकल इन्शूरन्स सुविधा. मार्ट-ओ महाबझार, फॅक्टरी रोड, कबनूर. ९०११००८५५५, ९०११०८८८९९.

**कॅफेमध्ये कामासाठी** शिकावू/ अनुभवी मुलगा पाहिजे. संपर्क- ८०८७६६३७५५

**Required -** 1) Electrical ITI - 2N0S 2) Welde / Fitter - 2Nog. 3) Refrigeration IFI - 1Nos. Experience - O to 2 years Contact Ate. - 9673021732. Location- Ichalkararyi

**जेवण आणि नाष्टासाठी** आचारी पाहिजे. (जोडी चालेल) हेल्पर पाहिजेत. संपर्क-८३९०९२८०५०, ८६६८८९२९२९

**लेडीज टेलिकॉलर नेमणे आहे.** सानी सॉफ्ट इन्फोटेक प्रा. लि. इचलकरंजी. संपर्क- ९९२२०९९९४७

**सेल्समन/कामगार** शिकाऊ/ अनुभवी पाहिजेत. मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स सम्राट अशोकनगर, आवळे मैदानशेजारी, इचलकरंजी. ९८९०५४७०७८

**रूमबॉय पाहिजे.** इचलकरंजीमधील लॉजमध्ये रूम सर्व्हीस करणेसाठी दिवसपाळी/रात्रपाळीमध्ये सुशिक्षित मुले पाहिजेत. संपर्क- ८६६८२१९७६३, ९८६०५७०४०४

**पाहिजेत.** १) ड्रायव्हर ट्रान्सपोर्ट लायसन आवश्यक. आकर्षक पगार+अलाऊन्स+साप्ताहिक सुट्टी+ इतर लाभ. २) खाजगी कार ड्रायव्हर LMV लायसन आवश्यक. ३) सफाई कामगार- आकर्षक पगार+पीएफ+ईएसआयसी व इतर लाभ. संपर्क-८५५२०३४००९

**बेकरीमध्ये कामासाठी** महिला कामगार पाहिजे. संपर्क- अय्यंगार बेकरी, सांगली नाका, इचलकरंजी. वेळ- ८ ते ५, संपर्क- ८४२१६५१२३८

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. दु. ३ ते रात्री ११. कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. फोन-८३२९०२८१४४

**टुरिझम ऑफिससाठी** कॉम्प्युटर अनुभव असलेली लेडीज टेलिफोन ऑपरेटर पाहिजे. संपर्क- ९९६०७०११८८

**अकौटंट, परचेस मॅनेजर,** स्टोअर किपर वेल्डर व फिटर पाहिजेत. संपर्क-गवळी फॅब्रिकेटर्स, कबनूर. ९०२८३६६२४१, ७०२०५०५९२३

**आपले सरकार** सेवा केंद्रमध्ये काम करण्यासाठी Computer Operating व इतर Data Feeding करिता अनुभवी व सक्षम पुरूष किंवा महिला यांची आवश्यकता आहे. संपर्क-गजानन CSC सेंटर, जनता बँक, गावभाग शाखेसमोर, इचलकरंजी. संपर्क- ८७९३८१२६३३, ९७३००८५९३१

**इचलकरंजीमध्ये** कापडाच्या दुकानात सेल्समन हवा आहे. विक्रीवाढ व स्टोअरचे दैंनदिन कामकाज सांभाळण्याचा अनुभव आवश्यक. आकर्षक पगार आणि कमिशन. संपर्क-८३९०५३४१४३

**बादशहा बजाज शोरूममध्ये** जनरल मॅनेजर, सेल्स एक्झीक्युटिव्ह व कमांड एरिया मॅनेजर नेमणे आहे. आकर्षक पगार, इचलकरंजी. कुरूंदवाड, जयसिंगपूर. संपर्क- ८६०५८८२२००, ९८५००६७९८८

**मॅकॅनिकल कंपनीमध्ये पाहिजेत.** VMC ऑपरेटर-७, CNC ऑपरेटर-५, शिकाऊ/फ्रेशर ऑपरेटर/इन्स्पेक्टर-४, VMC प्रोग्रॅमर/सेटर-३, ग्राईडींग ऑपरेटर-२. पगार-१३०००/ १८००० च्या पुढे. इचलकरंजी. ८९५६१६९६९६, ९१७५९६७७६७

**कबनूर येथे** ओल्ड बॉम्बे शाखेसाठी २ मुले पाहिजेत. वेळ- ११ ते ११. पगार-१० हजार पासून पुढे. संपर्क-७५०७३०८७८७

**सांगली रोड येथे** लेडीज बुटिकमध्ये शिवण कामाचा अनुभव असलेली महिला कामगार पाहिजे. विविध प्रकारचे लेडीज ड्रेस, ब्लाऊज, घागरा इ. सर्व प्रकारचे काम येणाऱ्यांना प्राधान्य. संपर्क- ग्रेशियस गारमेंट. मो. ८५५४००७१४४

**पार्वती इस्टेटजवळ-** एअरजेट खातेमध्ये अनुभवी दिवाणजी पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक, इचलकरंजी. संपर्क-बालाजी इम्पेक्स, जुनी इंडस्ट्रियल इस्टेट, हॉटेल कॅबसन्सजवळ, गणपती मंदिरजवळ, धारवट सायझिंगसमोर, इचलकरंजी. संपर्क वेळ-दु. ४ ते सायं. ६. संपर्क-७५८८५५२२९३

**टर्नर/फिटर-** इंजिनिअरींग वर्कशॉपमध्ये अनुभवी टर्नर/फिटर पाहिजेत. जुना कोल्हापूर नाका, कबनूर रोड. ७०५७२९५२९७

**काजवे दातांचा दवाखान्यामध्ये** रिसेप्शनिस्ट पाहिजेत. जवाहरनगर. संपर्क-९६६५०४६१३९

**वॉचमन पाहिजे.** गाड्या पार्किंग करीता वॉचमन पाहिजे. संध्याकाळी ७ ते रात्री ११, व्यंकटराव हायस्कूलसमोर, इचलकरंजी. समक्ष येऊन भेटावे. ८०८७००८७८४

**नामांकित कंपनीमध्ये भरती सुरू.** १) DME पदवीधर फॉलोअप इंजिनियर (मेकॅनिकल) अनुभव-१ ते २ वर्षे. Autocad व Ms. Office चे ज्ञान आवश्यक. २) Fitter शिक्षण-आयटीआय. अनुभव-१ ते २ वर्षे. संपर्क- ९५४५४७१२००

**टर्नर, ग्रायडिंग ऑपरेटर** जेंटस/ लेडीज हेल्पर पाहिजेत. संपर्क- केदार प्रिसीजन कंपोनंटस, आंबेडकर पुतळ्याजवळ, इचलकरंजी. ९११२२७३१७१, ९४२२४२८१९६

**पाहिजेत.** एका नामांकित शैक्षणिक संस्थेत खालील पदे भरणे आहेत. शिक्षक- (भूगोल-२, हिंदी-२, इंग्रजी-२. BA/MA/B.Ed. फ्लोअर इन्चार्ज (मुले/मुली)-६ (१२ वी/ पदवीधर). हॉस्टेल रेक्टर (पुरूष/ स्त्री)-०२. (१२ वी/पदवीधर) संपर्क-८७९६२५२००६

**ड्रायव्हर पाहिजे.** खाजगी ४ व्हिलर गाडीसाठी अनुभवी निर्व्यसनी, लायसनधारक, चांगला पगार. संपर्क-जे.आर. काबरा (CA) मोबाईल-९४२३८६००८३. जी.-७, मोहन आर्केड, सिटीइन हॉटेल के सामने, इचलकरंजी.

**बारसाठी अनुभवी वेटर** व साफसफाईवाला पाहिजे. समक्ष भेटा. ९७६७४९९५४०

**पाहिजे.** मंगळवार पेठ, इचलकरंजी येथे घरकामासाठी मावशी/ताई पाहिजे. संपर्क-८४४६९५८३८१

**फॅब्रिकेशन कामासाठी** व हॉस्पिटल फर्निचर बनवणेसाठी सीओटू, ऑरगन वेल्डर, हेल्पर भरती सुरू. संपर्क-९०२१२०२७३१

**सेल्समन कम ड्रायव्हर पाहिजे.** संपर्क- साद डिस्ट्रीब्युटर, इचलकरंजी. ७०२००१५७०२, ७५७५९३१०१०

**अर्जंट पाहिजेत.** फॉर्च्युन मॉलमध्ये कॅफे असोसिएटसाठी मुले/मुली-५, ड्रायव्हर-२, हाऊसकिपींगसाठी-१ पाहिजेत. संपर्क-८४८३८८७४२९

**सेल्सगर्ल पाहिजे.** टाईल्स शोरूममध्ये कामासाठी सेल्सगर्ल पाहिजे. आकर्षक पगार, बालाजी टाईल्स, इचलकरंजी. संपर्क- ७०२०६०८६५५, ७०८३४३११७७

**आमच्या कंपनीमध्ये** हेल्पर कामासाठी मुले पाहिजेत. आयटीआय फिटर, शिटमेटल झालेली मुले चालतील. संपर्क- ७०८३८४८९४६. पत्ता- विनायक हायस्कूलजवळ, शहापूर.

**कुरिअर ऑफिसकरीता** लेडीज किंवा जेंटस पाहिजेत. संपर्क- ९०२११४३९०९

**पाहिजेत.** पेपर कारखान्यात जेंटस हेल्पर-२ जागा पाहिजेत. संपर्क- ८०८७३६७४१८

**कामगार पाहिजे.** संपर्क-एम.एस. डाके. ९०११०१९२७७, ८९९९७२७२७०

**१२ वी टायपिंग** ३० व संगणक ज्ञान असणारी ऑफिस कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल मानसशेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०

**जेंटस कामगार पाहिजेत.** टू व्हीलर आवश्यक. संपर्क-९६३१३१६०३०

**सहारा वाईन शॉप** जयसिंगपूर येथे कामगार पाहिजेत. वेळ-११.३० ते ९.३०. संपर्क-८८८८७२८८३३, ९४२२०४९२३६

**कामगार पाहिजेत.** लेथ मशिनवर अनुभवी/फ्रेशर टर्नर पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क-एस.एम. इंजिनिअरींग, कोरोची, सागर पाटील फोन-८६२५८०२९२७

**गारमेंटसाठी** शर्ट ऑपरेटर अनुभवी महिला पाहिजेत. संपर्क- नवीन महानगरपालिका, जनता बँकेच्या मागे, इचलकरंजी. फोन- ८००७०२८१५०, ९०२९९४८६४१

**पार्वती इंडस्ट्रिज,** खंजिरे इंडस्ट्रिज व शहापूर, जेंटस-८ तास, १२ तास, लेडीज-सिक्युरिटी भरती ८ तास. संपर्क-९८५०९४५२२६, ९५११७५९६७६

## * आरोग्य विषयक *

**गुडघेदुखी आणि संधीवात-**मणका विकार (फूल बॉडी मसाज स्टीम १२०० रूपये ऐवजी ८०० रूपयेमध्ये फक्त महिलांसाठी) वैद्य कामिनी गजगेश्वर. ७२७८९९९१७१, इचलकरंजी. (वेळ-१० ते १ व ४ ते ७)

## * भाड्याने देणे/घेणे *

**कॉट बेसवर रूम** भाड्याने देणे- लाईट, पाणी, वायफाय सुविधेसह आरसीसी रूम. पत्ता- चावरे गल्ली, गावभाग इचलकरंजी. मो. ९८५००७३४६१

**कॉट बेसीसवर** हॉस्टेलच्या मुलांकरीता राहण्यासाठी सर्व सोयीनियुक्त रूम भाड्याने देणे आहे. पत्ता- गांधी कॅम्प, इचलकरंजी. संपर्क- ९८९०१५८९९३.

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. पत्ता- जवाहरनगर, इचलकरंजी. ८७९३८७८७९७, ९९२२४९९३११.

**दुकान गाळे ३९० स्क्वे.** फुटाचे २ व हॉल ६५० स्क्वे. फुटाचा भाड्याने देणे. पत्ता- जवाहरनगर, इचलकरंजी. संपर्क- ८७९३८७८७९७, ९९२२४९९३११.

**भाड्याने देणे-** दोन मजली स्वतंत्र घर आरसीसी दुकान गाळा फर्निचरसह भाड्याने देणे. डेक्कन मिलसामेर, भाजी मंडई, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ७०५८७६७५०५.

**गाळा भाड्याने देणे-** शोरूम/ ऑफिससाठी उपयुक्त ५००/१००० पार्किंग उपयुक्त, मेन रोडटच. संपर्क- ७२७६१२३७११, इचलकरंजी.

**१ बीएचके भाड्याने** देणे आहे- सरस्वती हायस्कूल भोने माळजवळ, दुधगंगा-वेदगंगा पतसंस्थेजवळ, इचलक्रंजी, मो. ९९२२०९९९०५.

**हॉल भाड्याने देणे** आहे. २५ X४५चा, १० एच.पी. लाईटसह, इंजिनिअरींग, गारमेंट, गोडावून, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९९२११७७०३६, ९६५७८३९९७२.

**शेड भाड्याने देणे-** वंदे मातरम मैदान नजीक, ६०० स्क्वे. फुट आरसीसी संपर्क- ८०८७४९१००८, इचलकरंजी.

**१ बीएचके रूम भाड्याने देणे आहे** - पत्ता- जनता बँक चौक, पल्लवी हॉटेल रोड, साखरपे हॉस्पिटल मागे, इचलकरंजी. मो. ९०२१३२१३३३.

**३ ते ४ विद्यार्थ्यांच्या** ग्रुपसाठी (मुले/मुली) प्रशस्त रूम्स् भाड्याने मिळेल. सांगली रोड, पाटील मळा, फॉर्च्युन प्लाझासमोर, बालाजी कॉलनी, गल्ली नं. २, संपर्क- ९६०४४७३६२३.

**भाड्याने देणे.** डॉ. राजकुमार केटकाळे नगर ग. नं. ३, दगडी पाण्याची टाकीजवळ, फॅक्टरी रोड, खुली जागा-३००० स्क्वे. फूट, कबनूर, गांधी विकास नगरजवळ, बरगेमळा शेजारी, खुली जागा १३००० स्क्वे. फूट समर्थ गॅस गोडाऊनजवळ, बाळासो पाटील नगर, कोल्हापूर रोड, कबनूर ६००० स्क्वे. फूट. संपर्क-९३७१९२०१०८

**भाड्याने देणे.** राम मंदिरशेजारी, भोने माळ/समर्थ गॅस ऑफिस इचलकरंजी आरसीसी बेसमेंट १३०० स्क्वे. फूट शोरूम गाळा ७०० स्क्वे. फूट हॉल १३०० स्क्वे. फूट ओपन प्लॉट-२३०० स्क्वे. फूट. संपर्क-९३७१९२०१०८

**भाड्याने देणे.** आरसीसी सिंगल व डबलरूम सर्व सोयीनियुक्त छोट्या कुटूंबासाठी नदीरोड, गावभाग, गुरूकृपा रेडिमेडस, इचलकरंजी. भोसले-९५१८५४३६९५, ९८६०२८१८४३

**कागल ५ स्टार** एमआयडीसीमध्ये २१ गुंठे शेड व मेनरोड टच जागा भाड्याने देणे. संपर्क- ८६५७५२५२१५

**बस स्टँडजवळ** गाळा गहाणवट/ भाड्याने ५५० क्लासेस, कुरियर, क्लिनिकसाठी योग्य मोहन आर्केड रोड, सिटीइन हॉटेलसमोर, इचलकरंजी. संपर्क- ९२२६७६५७८६

**दुकानगाळा भाड्याने देणे.** सर्व सोयीनियुक्त १४X २० उंची १४ फूट पोटमाळ्यासह सांगली रोड, अभय डेअरीसमोर, इचलकरंजी. श्री. महेश रणदिवे-९३७३०३०१५४, ९०९६७११०६९

**दुकानगाळा भाड्याने देणे.** २० वर्षापासून चालू असलेले स्टेशनरी व कटलरी फर्निचरसह सरस्वती मार्केट, इचलकरंजी. संपर्क- ९८८१८१४११४, ९८८१७७५२४२

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे. सांगली नाका, एसआयटी शरद कॉलेजच्यामागे, इचलकरंजी. संपर्क-९८८१७७५२४२

**१ बीएचके** सर्वसोयीनियुक्त ३ रूम भाड्याने देणे. साईनगर, ४ थी गल्ली, लिगाडे मळा, इचलकरंजी. संपर्क- ९१६८२३६२५३

**जयसिंगपूरमध्ये** राजयोग अपार्टमेंटमध्ये नविन २ बीएचके लक्झरियस फ्लॅट भाड्याने किंवा गहाणवट देणे आहे. ९६२३२७९५६६

**जनता बँक चौक परिसरात** ऑफिस किंवा इतर व्यवसायाकरिता गाळे भाड्याने देणे आहेत. संपर्क- ८८५७००९०५९, ८२०८३८४१३४

**भाड्याने देणे.** १५०० स्क्वे. फूट रोडटच १९ एचपी लाईटसह, सीएनसी, व्हीएमसी, गारमेंट, गोडाऊनसाठी डी-मार्टजवळ. संपर्क-७०५७५५२६१९, ९८२२१११२९०

**१ बीएचके फ्लॅट** छोट्या कुटूंबासाठी किंवा विद्यार्थ्यानींसाठी भाड्याने देणे. संपर्क- सांगली रोड, इचलकरंजी. फोन- ९०२८८७८०२०, ८४२१७४५९३४

**दुकानगाळा ३२५ स्क्वे. फूट** आरसीसी बंदिस्त भाड्याने देणे. (हॉटेल, खानावळ सोडून) भोनेमाळ, शर्मा दवाखानामागे, जुने अक्षय हॉटेल. संपर्क- ९०२८८३७८९१

**१ रूम व स्टोअर रूम** + किचन सर्व सोयीनीयुक्त भाड्याने देणे. संपर्क-८८०५५१४४४९, स्वप्निल अपार्टमेंट, ई-१२, हनुमान मंदिरजवळ, आवाडे कॉलनी.

**भाड्याने देणे आहे.** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त. पत्ता- मातृभूमी स्विटमार्ट रोड, इचलकरंजी. फोन- ७०३०५५७७८१, ७४९९५४९०२८

**सर्व सोयीनियुक्त** आरसीसी बंगला गहाणवट देणे आहे. वडगाव बाजारशेजारी, सहकारनगर, इचलकरंजी. फोन-९२०९८८११४४

**६००० स्क्वे. फूटची इमारत** भाड्याने देणे. ८ रूम्स, स्कूल/ क्लासेससाठी देणे. सांगली रोड, तोरणानगर, इचलकरंजी. फोन- ९४२०८६२७२७

**भाड्याने देणे आहे.** सर्व सोयीनियुक्त फर्निचरसह १ बीएचके. पत्ता- इंदिरा हौसिंग सोसायटी, मणेरे हायस्कूलमागे, इचलकरंजी. संपर्क- ९९२२०९९५८७

**२ बीएचकेफ्लॅट भाड्याने देणे.** फॉर्च्युन सफायर, फ्लॅट नं.१०३, कायझन होंडा शोरूमच्या बाजूस, एचडीएफसी बँकेजवळ, सांगली नाका, इचलकरंजी. फोन- ९८८११३३५५५

**२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त (शाकाहारी) भाड्याने देणे. रूगे मळा, विवेकानंद कॉलनी, इचलकरंजी. फोन-९४२२४१२३१०

**जागा भाड्याने देणे.** ५५०० स्क्वे. फूट कंपौंडसह रिकामी जागा, ६०० स्क्वे. फूट शोरूम एकत्र मेन रोड, कबनूर. फोन-९७६३५६१६६६

**जागा भाड्याने देणे.** १ एकर रिकामी जागा रोडटच कोल्हापूर, सांगली रोड, हातकणंगले. संपर्क- ८९५६४३४३०२, ९१४५६१०८१०

**सर्व सोयीनियुक्त** प्रशस्त आणि सुसज्ज २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे/विकणे. श्रीकृष्ण रेसिडेन्सी, नवीन बाटा शोरूम, सांगली रोड, महासत्ता चौक, इचलकरंजी. ८८७९५०८५७२

**भाड्याने देणे-**४ बीएचके घर व १५०० फुटाचा हॉल, राणी बागेसमोर, एचडीएफसी बँक शेजारी, इचलकरंजी, मो. ९२५६५७२७२७.

## * व्यवसाय विषयक *

**तुमच्या शाळेची गुणवत्ता** डिजीटलमध्ये दाखवा AI-प्रमोशन पालकांपर्यंत पोहोच, ब्रॅंडींग तुमच्या व्यवसायाला AI-Powered क्रिएटिव्हिटीची ताकद द्या, व्हिडीओ, जाहिरात, सोशल मिडीया AI कंटेंट लोगो. S.B. AI CREATIONS संपर्क- ९३२५२९९५६०

**शेअर मार्केट बेसिक्स ते** ॲडव्हॉन्स माफक फीमध्ये परफेक्ट शिका, प्रॉफिट फर्स्ट, कल्पना टॉकीजसमोर. मो. ९६६५४०८८२८, ७७६८९५००२१

## बोअरवेल विषयक

**राज बोअरवेल-** आमचेकडे ४।।। इंची व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**चौगुले बोअरवेल्स-** जयसिंगपूर आमचेकडे घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क-९९६०१०५४२१

## * कर्ज विषयक *

**आठवडा हप्त्याने** किंवा एक महिन्यासाठी पंधरा हजारची गरज आहे. संपर्क ८३७९९६१३२०

## * शैक्षणिक विषयक *

**डिप्लोमा इन फॅशन** डिझायनिंग ३ व ६ महिने व १ वर्ष ड्रेस, ब्लाऊज मेकिंग कोर्स ज्योती फॅशन डिझायनिंग इन्स्टीट्युट, मो. ८३२९३९२९२३

## * बांधकाम विषयक *

**गुंठेवारी, बिगरशेती बांधकाम** परवानगी औद्योगिक रहिवाशी बिगरशेती कामे करून मिळेल. संपर्क-राजेश मालवणकर. ९८८१६४५१०३

## * यात्रा-सहल विषयक

**२२ मार्च जगन्नाथपुरी** गंगासागर कलकत्ता, गमा १७ दिवस, १० मे काशी, अयोध्या, वैष्णोदेवी, प्रयागराज, १८ दिवस, कोजागिरी ट्रॅव्हल्स. ९४२०५९२५२४, ९४०३९५३४१२

**माळी हॉलिडेज,** चारधाम, संपूर्ण उत्तर भारत, गुजरात, राजस्थान, उडपी, म्हैसूर, भारतातील इतर ग्रुप टूरसाठी. संपर्क-अविनाश- ९१५८३३०१०८

# डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**सांगली, ता. २८(प्रतिनिधी )-**

**इनाम धामणी ते आदिसागर हॉल या मार्गावर भरधाव डंपरने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिल्याने इनास पावलू बारदेस्कर (वय ५४ रा. नेमीनाथनगर) यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी जॉर्ज पिंटो (रा. नेमिनाथनगर) यांनी सांगली शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डंपर चालक सिकंदर दस्तगीर नदाफ (रा. हनुमाननगर, सांगली) याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.**

इनास बारदेस्कर हे कुटुंबीयांसह नेमिनाथनगर परिसरात राहतात. बारदेस्कर हे सकाळी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास दुचाकी (एमएच १० बीसी ३०२९) वरून इनामधामणी ते हॉटेल नंदनवनकडे जाणाऱ्या मार्गावरून निघाले होते. यावेळी एका मार्बल दुकानासमोर त्यांची दुचाकी आल्यानंतर समोरून येणाऱ्या डंपर (एमएच १० सीआर ३७३८) ने त्यांना धडक दिली. धडकेत बारदेस्कर हे गंभीर जखमी झाले. दुचाकीचे मोठे नुकसान झाले. बारदेस्कर यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा रक्तस्त्राव होऊन मृत्यू झाला.

# हिंदी सिनेमातील क्रौर्यालाही लाजवेल अशा पद्धतीने कोथळेला मारले

## ॲड. उज्वल निकम यांचा युक्तिवाद

सांगली,ता.२८(प्रतिनिधी)–

**हिंदी सिनेमातील क्रौर्यालाही लाजवेल, अशा पद्धतीने अनिकेत कोथळेला संशयितांनी मारले, असा युक्तिवाद विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी शनिवारी अनिकेत कोथळे खून प्रकरणात न्यायालयात केला. या खटल्याची सुनावणी जिल्हा न्यायाधीश एस. आर. पडवळ यांच्या कोर्टात चालू आहे. या सुनावणीवेळी सीआयडीचे अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद, जिल्हा पोलीस प्रमुख संदीप घुगे तसेच सीआयडीच्या पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती.**

विशेष सरकारी वकील उज्वल निकम युक्तिवादात म्हणाले, अनिल लाड याने वापरलेल्या गाडीचा नंबर सांगितला. याशिवाय गाडीच्या मालकीबद्दल सांगितले होते. त्यामुळे त्यावेळची परिस्थिती दाखवते की गाडी त्याचीच होती. ६ नोव्हेंबर २०१७ रोजी सरकारी वकील चौरे यांना संशयित युवराज कामटे याने फोन केला होता. त्यावेळी कामटेने रिमांड वेळी त्याच्या हातून एका संशयित आरोपीचा मृत्यू झाल्याचे सांगितले होते. त्यावेळी कामटेने अनेक वेळा चौरे यांना फोन करून खुनाची कबुलीही दिली होती. धीरज पाटील यांनी कामटेचा मोबाईल जप्त केला होता, याबद्दल कामटेला विचारले असता सरतपासा वेळी त्याने उत्तर देणे टाळले होते. तसेच यासंदर्भात धीरज पाटील यांचा उलट तपास घेण्याचे ही टाळले. बचाव पक्षाने बाजू मांडताना कामटे या घटनेच्या वेळी सांगलीत हजर नव्हता तर त्यावेळी तो मिरजेतील सदभावना हॉल येथे अँकरिंगच्या एका कार्यक्रमासाठी गेला होता. शिवाय कामटेने कोथळेला अटक केली नव्हती अशा पद्धतीने बचाव देखील घेण्यात आला होता. याच्या पृष्ठ्यार्थ कामटेने काही फोटो हजर केले होते ज्यावर कोणत्याही प्रकारच्या तारखेचा उल्लेख नव्हता, शिवाय वारलेस मेसेज व ड्युटी बटवडा रजिस्टरचा कामटेने बचावासाठी आधार घेतला होता. मारुती लोंढे व अमोल भंडारे हे या केसमधील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत असे सांगून घटनेदिवशी मारुती लोंढे शेजारील रूम मध्ये हजर होते. ज्या पद्धतीने अनिकेत कोथळेला उलटे टांगून हातपाय बांधून तोंडाला बुरखा घालून मारहाण केली जात होती ते बघून लोंढे यांनी एवढे मारू नका असे कामटेला सांगितले होते पण कामटे म्हणाला, तुला काय करायचे तू गप्प बस असे म्हणून हिंदी सिनेमातील क्रौर्यालाही लाजवेल अशा पद्धतीने अनिकेत कोथळेला मारले. पोलीस स्टेशनमध्ये कामटेची एवढी दहशत होती की पीएसआय चव्हाण हे सगळे बघून पळून गेला होता, असे सांगितले. जिल्हा सरकारी वकील प्रमोद भोकरे, तपास अधिकारी मुकुंद कुलकर्णी, सीआयडीचे पोलीस उपअधीक्षक प्रमोद नलवडे, अमोल ठाकूर यांनी सरकार पक्षाला मदत केली.खटल्याची पुढील सुनावणी १३ मार्चला होणार आहे.

## जाहीर नोटीस

१. मिळकतीचे वर्णन – जिल्हा व तुकडी कोल्हापूर, तालूका हातकणंगले, कोरोची हद्दीतील क. ग.नं. ३२५ एकुण क्षेत्र १ हे. ८९ आर आकार रू १०. ३१ पैसे क्षेत्रा पैकी श्री . लोहार यांचे मालकीचे तुकडा नं. ३३ क्षेत्रफळ १८५.८७ चौ. मी. म्हणजे २००० चौ. फु. याचे ७/१२ प्रमाणे ० हे. ०१.८५ आर ची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा पुर्व – तुकडा नं. ३४ ची मिळकत, पश्चिम– तुकडा नं. ३२ ची मिळकत, दक्षिण– रस्ता, उत्तरेस– याच गट नंबरपैकी श्री. अनुसे व श्री. हराळे यांची मिळकत

२. वर वर्णन केलेली मिळकत हि श्री. महादेव दादु लोहार रा. गंगानगर, कबनूर यांचे मालकी व वहीवाटीची असुन त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन आमचे आशिलांना खरेदी देणेचे ठरविलेले आहे. सबब सदर मिळकती बाबत कुणाचाही कसलाही वाद, वारसा, वाटणी, बक्षीस, खरेदीकरार, अग्रहक्क, तारणगहाण, लिज, इनाम, न्यायालयीन वाद अथवा अन्य तत्सम हक्कसंबंध असलेस ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी स्वरूपात कळवावी. सदर मुदतीत कुणाचीही लेखी हरकत न आलेस मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे समजुन आमचे आशील खरेदीपत्र पुर्ण करतील व त्यानंतर कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणुन दिली नोटीस. ता.

२८/०२/२०२६

**ॲड. विवेक अशोक तांबे**

१२/२०६ स्टेशन रोड,
इचलकरंजी.
मो. ९८२२६६७९९९.

## जाहीर नोटीस

मौजे चंदुर येथील गट नं. ४०१/अ/३० पैकी प्लॉट नं. ३०– ए चे क्षेत्र १४१.४० चौ. फुट. यासी चतुः सिमा– पुर्वेस – रस्ता, पश्चिमेस – शिवदास जाधव यांची मिळकत, दक्षिणेस – प्लॉट नं. ३१, उत्तरेस – प्लॉट नं. २९. सदर मिळकत ही श्री. शिरीष दत्तात्रय ठिगळे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. २८/०२/२०२६.

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे शिवनाकवाडी येथील गट नं. ४७४/२/७ पैकी प्लॉट नं.७ चे क्षेत्र ११२.५१ चौ. मी ची बिगरशेती खुली जागा. यासी चतु:सिमा– पुर्वेस – रस्ता, पश्चिमेस – आरगे यांची मिळकत, दक्षिणेस – प्लॉट नं.८, उत्तरेस– प्लॉट नं.६.सदर मिळकत ही मूळची श्री. राहुल बाळु सावरतकर, जयश्री बाळु सावरतकर, पद्मा बाळु सावरतकर, लक्ष्मण बाळु सावरतकर रा. सर्व इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणत्याही बँकेचा बोजा, हक्क, दावा, पोटगी, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. २६/०२/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे शहापुर येथील गट नंबर ६२ पैकी प्लॉट नं. १४ क्षेत्र ३१७.१६ चौ.मी यासी चतु:सिमा–पुर्वेस– प्लॉट नं १३, पश्चिमेस – ४० फुट रस्ता, दक्षिणेस – २० फुट रस्ता, उत्तरेस – स्टार नगरची मिळकत. सदरची मिळकत ही सौ. रुकैया इरफान हजरत रा. इचलकरंजी यांच्या मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.२८/०२/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ३०० प्लॉट नंबर २५ चे क्षेत्र ११७५ चौरस फुट ची मिळकत यासि चतुः सिमा पुर्वेस – श्री बार्शीकर यांची मिळकत, पश्चिमेस – गट नंबर २९९ ची मिळकत. दक्षिणेस–याच गट नंबर पैकी मिळकत, उत्तरेस – १५ फुट रुंदीचा रस्ता. सदर ची मिळकत श्री. सलिम चाँदसाब शेख. रा.उदगांव यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. २२/०२/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन :– जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले मौजे कबनूर ग्रामपंचायत हद्दीतील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत,

| क.ग.नं. | मालकाचे नाव | क्षेत्र |
|---|---|---|
| ३४५ | इरगोंडा महादेव पाटील, रा. कबनूर | ० हे.४–१७ आर |
| ३४६ | विजय, नंदकुमार रावसो उर्फ आण्णासो पाटील व सुहास, शितल दादासो पाटील, रा. कबनूर | ० हे. १६ आर |
| ३४७ | पिरगोंडा, धुळगोंडा, महादेव राजगोंडा दादा पाटील, रा. कबनूर | ० हे. ०८ आर |
| ३४८ | सुहास, शितल दादासो पाटील, सुनिता संतोष नार्वेकर, विजय, नंदकुमार रावसो उर्फ आण्णासो पाटील, रा. कबनूर | ० हे. ०८ आर |
| | एकूण | ० हे.३६–१७ आर |

वर नमूद केलेप्रमाणे सलग मिळकती याचे एकूण क्षेत्र ० हे. ३६–१७ आर ची शेतजमीन मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस – श्री. दैवज्ञ सोनार यांची मिळकत, पश्चिमेस– श्री. मुंदडा व पाटणी यांची मिळकत, दक्षिणेस– क.ग.नं.३४५ पैकी अशोक महादेव पाटील यांचे हिस्सेची मिळकत, उत्तरेस– क.ग.नं.४३६ ची मिळकत. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही वर नमूद मालकांचे मालकीची असून ती त्यांनी विक्री करणेचे ठरवून संचकार दाखल भरीव रक्कम स्विकारुन तसा करार आमचे अशिलांचे लाभात करुन दिला आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदी व्यवहार पुरा करणेत येणार आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असलेचा निर्वाळा व कायदेशीर पणन योग्य हक्क असलेचा भरवसा मिळकत मालक यांनी दिला आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, कर्ज, करार, खरेदि, बक्षीस, इजमेंट वगैरे कसलाही बोजा अगर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत त्याबद्दल लेखी माहिती कागदपत्रासह पटवून द्यावी. येणेप्रमाणे न केलेस असा कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध वा तक्रार नाही अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून तक्रार चालणार नाही. म्हणून प्रसिध्द केली नोटीस. ता. २८/०२/२०२६

**ॲड. गिरीश एन. मुदगल**

१२/१७८, काँग्रेस कमिटीचे पाठीमागे, इचलकरंजी,
ता.हातकणंगले जि. कोल्हापूर. मो. ९३२५४९३९४६

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन – जि. व तु. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी इचलकरंजी येथील रि.स. नं.२०/ ८ क्षेत्र ० हे ०३ आर पैकी गुंठेवारी भुखंड क्र. १ पैकी क्षेत्र ० हे ०१.०१ आर ची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस– सदर मिळकतीची पुर्वेकडील मोजमाप ० असल्याने उत्तरेकडील पुर्वपश्चिम चालीचा रस्ता, पश्चिमेस– श्रीधर चव्हाण यांची मिळकत, दक्षिणेस व उत्तरेस– सरकारी रस्ता येणेप्रमाणे चतुःसिमेतील खुली जागा मिळकत त्यातील तंदगभुत वस्तुसह व इजमेंटरी हक्कासह सर्व.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. अब्दुलमजीद यासीन नाईक व अशोक बाबासो माने रा. इचलकरंजी यांच्या एकत्रीत मालकीची असून त्यांनी सदर मिळकत ही आमच्या अशिलांना निर्वेध, निष्कर्जी व निर्जोखमी असलेचे सांगून खरेदी देण्याचे ठरवून संचकार रक्कम स्विकारली आहे.

३) सबब सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध तारण, गहाण, दान, बोजा, हिस्सा, वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी कळवावा. मुदतीनंतर कोणाचीही, कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस. ता. २८/२/२०२६.

**ॲड. संजय र. गजबी**

**नोटरी (भारत सरकार)**
ऑफिस– ७/७१, लक्ष्मी मार्केट,
निवास– कमलकुंज, ८/ १५२०/१/१, मधुबन हौ.
सोसा. जवळ, इचलकरंजी.
मो. ९४२२०५१९८३.

## जाहीर नोटीसीस हरकत/खुलासा

तमाम लोकांना कळविणेत येते की,

दिनांक २५.०२.२०२६ इसवी रोजीच्या ''दैनिक महासत्ता'' च्या अंकात ''ॲड. विश्वास पां. चुडमुंगे'' यांनी दिलेल्या जाहीर नोटीसीला आमचे अशिल ''कमलकिशोर भंवरलाल दायमा रा. ८/३, स्वामी अपार्टमेंट, इचलकरंजी'' यांचेतर्फे हरकत/खुलासा–

१) मिळकतीचे वर्णन :– इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील सि.स.नं. १६४१८,१६४१८/१, १६४१८/२ याचा टि.पी. स्किम १, फायनल प्लॉट नं. ३२२/१०, क्षेत्र ८८.६३ चौ.मी.ची मिळकत व त्यावरील इचलकरंजी महानगरपालिका वॉर्ड नं. १२/९५२ ची बांधीव घर मिळकत.

२) वरील कलम १ मधील मिळकत ही ''संतोष नामदेव पांढरपट्टे'' यांचे मालकीची असून सदरील मिळकती संदर्भात ''संतोष नामदेव पांढरपट्टे'' व आमचे अशिल यांचे दरम्यान दिनांक २२.०४.२०२५ इसवी रोजी खरेदीपूर्व करारपत्र झालेले आहे व त्यानुसार आमचे अशिलांनी बरीच मोठी भरीव रक्कम ही संचकार म्हणून ''संतोष नामदेव पांढरपट्टे'' यांना दिलेली आहे व ती त्यांनी स्विकारलेली देखील आहे. सदरील करारातील महत्वाच्या अटी–

अ) मिळकती वरील ''शिवनेरी सहकारी बँक इचलकरंजी यांचा बोजा कमी करून त्याची सूचना आमचे अशिलास लेखी देणे.

ब) मिळकती वरील ''इचलकरंजी व्यापारी सहकारी पतसंस्था इचलकरंजी'' यांचेकडील घेतलेल्या कर्जाचा बोजा / कर्ज हे खरेदीपत्रापूर्वी कमी करणे व त्याची सूचना आमचे अशिलास लेखी देणे.

क) सदर वरील कलम १ मधील मिळकतीवरती शेजारील मालमत्ताधारकाने अतिक्रमण केलेले आहे तशी हरकत स्वतः संतोष नामदेव पांढरपट्टे यांनी दिनांक १४.०८.२०२५ इ. रोजी घेतलेली आहे, त्याची निर्गती करून देणे.

३) आमचे अशिल हे ''संतोष नामदेव पांढरपट्टे'' यांना करारपत्रानुसार उर्वरित रक्कम देवून वरील मिळकत खरेदी करून घेणेसाठी सुरूवातीपासून तयार होते व आजही आहेत पण वरील अटींची पूर्तता न करताच ''संतोष नामदेव पांढरपट्टे'' यांनी आमचे अशिलास दिनांक ०८.११.२०२५ इ. रोजी करारपत्र भंग / रद्दची खोटी नोटीस आमचे अशिलास पाठवली होती त्यास आमचे अशिलानी ''ॲड. संग्राम इनामदार'' यांचे मार्फत उत्तरही दिलेले आहे. आमचे अशिलाची रक्कम हडप करणेचे हेतूने ''संतोष नामदेव पांढरपट्टे'' यांनी व ''ॲड.विश्वास पां.चुडमुंगे'' यांचे अज्ञात अशिलांनी एकमेकांच्या संगनमताने ''दैनिक महासत्ता'' मध्ये ''खरेदीपूर्व जाहीर नोटीस'' या मथळ्याखाली खोटी व चुकीची नोटीस पाठवलेली आहे.

सबब,वरील मिळकत ही खरेदी करणेस आमचे अशिल सुरूवातीपासून तयार होते व आजही तयार असलेने वरील मिळकत ही कोणीही ''संतोष नामदेव पांढरपट्टे'' यांचेकडून खरेदी घेवू नये तसेच आमचे अशिल हे मिळकत खरेदी घेणेसाठी मा. सि.ज.सि.डि. इचलकरंजी येथील कोर्टात ''स्पेसिफीक परफॉरमन्स ऑफ कॉन्ट्रक्ट'' चा दावा दाखल करीत आहेत याची नोंद घ्यावी व तशी सूचना ॲड. विश्वास पां. चुडमुंगे यांनी आपले अशिलास द्यावी. सबब, या उपरही जर वरील मिळकतीचे खरेदीपत्र करणेसाठी प्रयत्न होतील तर आमचे अशिल संबंधितावरती कायदेशीर कारवाई करतील व तो व्यवहार आमचे अशिलावरती कोणत्याही प्रकारे बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी. केवळ कोणाची फसवणूक होवू नये म्हणून दिले जाहीर नोटीसीस हरकत/खुलासा सही

ता. २८.०२.२०२६

**ॲड. नितीनकुमार कल्याणमल लड्डा**

ऑ– जी – ५ जैनको टॉवर, आर. पी. रोड,
इचलकरंजी ४१६ ११५. मो. ९८९०१४१३०१.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत युवकाचा मृत्यू

भिलवडी,ता.२८(वार्ताहर )–

**माळवाडी (ता. पलूस) येथील ३७ वर्षीय युवकाचा अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. अजय अशोक कदम (वय ३७, रा. माळवाडी) असे मृताचे नाव आहे.**

अजय कदम हे त्यांच्या दुचाकी स्प्लेंडर ( एमएच १० सीएस ०१५०) वरून खंडोबाचीवाडीकडून माळवाडीकडे येत होते. यावेळी माळवाडीकडून भिलवडी स्टेशनकडे जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. हा अपघात माळवाडी भिलवडी स्टेशन रोडवरील हॉटेल स्वागत समोर घडला. धडक इतकी भीषण होती की, अजय कदम यांचा जागीच मृत्यू झाला.

भिलवडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भगवान पालवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच घटनास्थळावरील पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.माळवाडी, भिलवडी, औदुंबर फाटा, अंकलखोप पेट्रोल पंप या रस्त्यावर वारंवार अपघात होत असून हा राष्ट्रीय महामार्ग असल्याने वाहने सुसाट जातात.या मार्गावर भिलवडी स्टेशन ते अंकलखोप नागठाणे फाटा दरम्यान तीन महाविद्यालये आहेत. ते ही रस्त्या लगत आहेत. यामुळे शालेय विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून या रस्त्यावरून ये – जा करावी लागते.या रस्त्यावर वेग मर्यादा फलक व ठिक ठिकाणी रबरी स्पीड ब्रेकर व सीसीटीव्ही लावावेत आशी मागणी ग्रामस्थांनी केली असून बांधकाम विभाग याकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन :– मौजे तारदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील क.ग.नं. ३५८ क्षेत्र ० हे. ५७ आर पो.ख. ० हे. ०४ आर, आकार २ रु. ५५ पै. यापैकी श्री.राजेंद्रकुमार नेमिचंद जैन, रा.इचलकरंजी यांचे स्वतंत्र मालकी वहिवाटीची क्षेत्र ० हे. १९ आर याचे २०१३६–१४ चौ. फुट ची खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस– गट नं. ३५९ ची मिळकत, पश्चिमेस – श्री. अनिल नेमिचंद जैन यांचे हिस्सेची याच गट नंबरपैकी मिळकत, दक्षिणेस– गट नं. ३५५, उत्तरेस– ३३ फुट रस्ता.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही श्री. राजेंद्रकुमार नेमिचंद जैन, रा. इचलकरंजी यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी विक्री करणेचे ठरविले असून आमचे अशिलांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरविले आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येणार आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असलेचा निर्वाळा व कायदेशीर पणन योग्य हक्क असलेचा भरवसा मिळकत मालक यांनी दिला आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, कर्ज, करार, खरेदि, बक्षीस, इजमेंट वगैरे कसलाही बोजा अगर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत त्याबद्दल लेखी माहिती कागदपत्रासह पटवून द्यावी. येणेप्रमाणे न केलेस असा कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध वा तक्रार नाही अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून तक्रार चालणार नाही. म्हणून प्रसिध्द केली नोटीस. ता. २८/०२/२०२६

**ॲड. गिरीश एन. मुदगल**

१२/१७८, काँग्रेस कमिटीचे पाठीमागे, इचलकरंजी,
ता.हातकणंगले जि. कोल्हापूर. मो. ९३२५४९३९४६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ३२८ पैकी समजुतीच्या नकाशाप्रमाणे प्लॉट नं. २० क्षेत्र २५२८ चौ. फुट ची खुली जागा. यासी चतु:सिमा– पुर्वेस – रस्ता, पश्चिमेस – गट नं. ३२९, दक्षिणेस – प्लॉट नं. २१, उत्तरेस– प्लॉट नं.१९.सदर मिळकत ही मूळची सुनंदा भास्कर मुसळे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी श्रेणीक बाहुबली मुरगुंडे यांना करारपत्र करून दिले व त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. २८/०२/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: इचलकरंजी महानगरपालिका व आसपासच्या परिसरातील लोकांना माझे अशिल १) सौ.माधवी सचिन डोंगरे, रा. शाहूनगर, जयसिंगपूर ता. शिरोळ, जि. कोल्हापूर २) श्री. कुबेर नागाप्पा मगदूम, रा. वड्डी, ता. मिरज, जि.सांगली यांनी दिले माहितीवरुन दाखविले कागदपत्रावरुन व दिले अधिकारावरुन या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की,–

(१) मिळकतीचे वर्णन : जिल्हा तुकडी कोल्हापूर, तालुका व पोटतुकडी इचलकरंजी मे. सहदुय्यम निबंधकसो वर्ग– २ इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील व तालुका हातकणंगले पैकी मौजे शहापूर इचलकरंजी महानगरपालिकेत समाविष्ठ झालेल्या भागातील शेतजमीन तिचे वर्णन खालीलप्रमाणे–

| अ. नं. | क.ग.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | ३८ | ३.०३ | २.८० |

याचा नवीन न.भु.क्र.१८६२५, क्षेत्र ३०३०० चौ.मी. टेन्युअर आय या पुरे गट नंबरपैकी आमच्या अशिलांच्या हिस्सेचे एकूण क्षेत्र हे.०.४६.२५ आर, आकार रु.०.४३ पैसे ही जिरायत शेतजमीन मिळकत याचे दोन वासले असून, वासला नं.१ पूर्व बाजूची साधारण त्रिकोणी आकाराची जमीन क्षेत्र हे. ०.१२.०० आर यांसी चतु:सिमा,–

पूर्वेस : म्हसोबा देवस्थानची खुली जागा.
पश्चिमेस : ४० फुटी रस्ता व त्या पलिकडे याच गटातील सहहिस्सेदार श्री.अशोक सत्याप्पा जाधव, वगैरे यांची मिळकत.
दक्षिणेस : रस्ता
उत्तरेस : सरकारी रस्ता व म्हसोबा देवस्थानची खुली जागा ची सर्व मिळकत.

(२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती मध्ये माझे अशिलांचा एकत्रित सामाईक हिस्सा व कब्जेवहिवाट आहे.

(३) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती बाबत माझे अशिल सौ. माधवी सचिन डोंगरे यांचेबरोबर दि.१५/०६/२०२१ रोजी करारपत्र रुपये १००/– च्या स्टॅम्पपेपरवर त्यांच्या हिश्याबाबत श्री.दशरथ येदू माने, रा.इचलकरंजी यांचे बरोबर झालेले होते. परंतु सदर करारपत्रात नमूद केलेप्रमाणे अट नं.६, ७, ९ व १० मधील अटी व शर्तीची पुर्तता करारपत्रात नमूद केलेप्रमाणे ३ महिन्याचे मुदतीत त्यांचेकडून झालेली नव्हती. त्यामुळे या संदर्भात श्री. दशरथ येदू माने यांना दि.२३/०६/२०२५ रोजी अँड.एस.व्ही.केळकर यांचे मार्फत रजि.पोष्टाने नोटीस पाठवलेली होती. सदर नोटीस श्री. दशरथ येदू माने यांचे व्हॉटस्अप नं.९२२६९२४००२ या नंबरवर देखील पाठवलेली होती. सदर नोटीसीव्दारा श्री. दशरथ येदू माने यांना स्पष्टपणे कळविलेले होते की. दि.१५/०६/२०२१ रोजी माझे अशिल सौ. माधवी सचिन डोंगरे यांचेबरोबर झालेले करारापत्र संपुष्टात आलेले आहे. त्यामुळे वर नोटीस कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीशी आपला कोणताही हक्क व हितसंबंध राहिलेला नाही असेही श्री. दशरथ येदू माने यांना वर नमूद नोटीसीव्दारा कळविलेले होते.

(४) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती बाबत माझे अशिल श्री. कुबेर नागाप्पा मगदूम यांचेबरोबर त्यांच्या हिश्याच्या अनुषंगाने दि.०९/०६/२०२१ रोजी करारपत्र रुपये १००/– च्या स्टॅम्पपेपरवर श्री.दशरथ येदू माने, रा. इचलकरंजी यांचे बरोबर झालेले होते. परंतु सदर करारपत्रात नमूद केलेल्या अटींची व शर्तीची पुर्तता सदर श्री.दशरथ येदू माने यांनी तीन महिन्याच्या मुदतीत केलेली नव्हती. त्यामुळे सदर श्री. दशरथ येदू माने यांना माझे अशिल श्री कुबेर नागाप्पा मगदूम यांनी ॲड. सचिन एन. हंडीफोड यांचे मार्फत दि.२३/०९/२०२२ रोजी नोटीस रजि.पोष्टाने पाठवलेली होती. सदर नोटीशीव्दारा श्री.दशरथ येदू माने यांना कळविण्यात आलेले होते की, वर कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत दि.०९/०६/२०२१ रोजी जे करारपत्र झालेले होते ते करारपत्र संपुष्टात आलेले आहे. त्यामुळे वर नोटीस कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीशी आपला कोणताही हक्क व हितसंबंध राहिलेला नाही असेही श्री.दशरथ येदू माने यांना वर नमूद दि. २३/०९/२०२२ रोजीच्या नोटीसी व्दारा कळविलेले होते.

(५) वर नमूद केलेप्रमाणे वस्तुस्थिती असताना सदर श्री.दशरथ येदू माने वर नोटीस कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकती बाबत काही लोकांशी व्यवहार करणेच्या प्रयत्नामध्ये आहेत असे खात्रीलायकरित्या समजून आलेले आहे. त्यामुळे या नोटीसीव्दारा सर्वांना सुचित करण्यात येते की, वर नोटीस कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीशी श्री. दशरथ येदू माने यांचा कोणताही कायदेशिर हक्क व हितसंबंध नाही. त्यामुळे कोणीही वर नोटीस कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार श्री.दशरथ येदू माने यांचे बरोबर करु नये. आपण व्यवहार केलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी व्यवहार करणाऱ्यावर राहील. व्यवहार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस सदर मिळकतीच्या अनुषंगाने कोणतेही कायदेशिर हक्क व हितसंबंध प्राप्त होणार नाहीत. श्री. दशरथ येदू माने यांचे बरोबर कोणीही वर कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकती बाबत व्यवहार केलेस त्या व्यक्ती विरुध्द फौजदारी स्वरुपाची केस दाखल करणेचा हक्क ही माझे अशिलांनी राखून ठेवलेला आहे.

म्हणून दिली जाहीर नोटीस.
मिरज,
दिनांक : २८/०२/२०२६ **अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**ॲड.एस.व्ही. केळकर**

'ॐकार' अपार्टमेंट, आशा टॉकीजजवळ, मिरज– ४१६ ४१०. मो. ९८९००२७०२१.



डॉ.रवींद्र ठाकूर यांचा सत्कार करताना सिद्धार्थ शिंदे शेजारी डॉ.रवींद्र मोरे व इतर प्रमुख मान्यवर.

## सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी मातृभाषा मराठी टिकली पाहिजे–डॉ.ठाकूर

इचलकरंजी,ता.२८–

**सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी मातृभाषा मराठी टिकली पाहिजे त्यासाठी शाश्वत प्रतिष्ठान सारख्या सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा तसेच भाषावाद निरर्थक असल्याचे सांगून मराठी भाषा रुजविण्यासाठी घरोघरी वाचन संस्कृती जोपासली पाहिजे,असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक व लेखक डॉ.रवींद्र ठाकूर यांनी केले.**

कोल्हापूर येथील शाश्वत प्रतिष्ठानच्यावतीने मराठी राजभाषा गौरव दिनाच्या निमित्ताने ज्येष्ठ समीक्षक तसेच साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक माजी मराठी विभाग प्रमुख शिवाजी विद्यापीठ डॉ. रवींद्र ठाकूर यांचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन समिती संचालक सिद्धार्थ शिंदे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेशन दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ रवींद्र मोरे हे होते.यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.गुरुदत्त म्हाडगुत, संचालक निखिल जाधव,ओंकार वनारसे,हिदायत मणेर, प्रशांत कुलकर्णी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



मराठी भाषा दिनानिमित्त मनसेच्यावतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

## आनंदीबाई कर्वे विद्यामंदिरात मनसेतर्फे मराठी भाषा दिन साजरा

इचलकरंजी ता.२८–

**महाराष्ट्र नवनिर्माण सेना इचलकरंजी विधानसभा मतदारसंघाच्या वतीने मराठी भाषा दिन उत्साहाने साजरा करण्यात आला.**

आनंदीबाई कर्वे विद्यामंदिर मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र निकम, वाहतूक सेनेचे तालुकाध्यक्ष अनिल झाडबुके व रोजगार विभागाचे तालुकाध्यक्ष रमेश पसलादे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.सदरचा कार्यक्रम प्रमुख पाहुणे,महाराष्ट्र कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष केप्पाणा हालगेकर, रामा बागलकोटी, बेगम नदाफ, सलमा शेख, सुवर्णा शिंदे, प्रियंका पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. महाराष्ट्रातील मराठी शाळा व मराठी भाषा राज ठाकरे व मनसेमुळेच जिवंत आहे. त्यामुळे सर्वच शाळांमध्ये मराठी भाषेचा चांगल्या प्रकारे वापर करून मराठी भाषा शिकवण्याचे काम मराठी शाळेतील शिक्षकांनी करावे,असे आवाहन मनसे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र निकम यांनी केले.यावेळी मुख्याध्यापक श्री.रामाने व त्यांचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.





दि न्यू हायस्कूलमध्ये कै.सिंधुताई जाधव यांना अभिवादन करताना उपस्थित प्रमुख मान्यवर.

## दि न्यू हायस्कूलमध्ये सिंधुताई जाधव यांची पुण्यतिथी साजरी

यड्राव,ता.२८–

**स्वा. वि. दा. सावरकर शिक्षण संस्था इचलकरंजी संचलित दि न्यू हायस्कूल, यड्राव या माध्यमिक विद्यालयात संस्थेच्या माजी कार्यवाह कै. सौ. सिंधुताई जाधव यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली .**

स्वागत व प्रास्ताविक विद्यालयाचे सहा.शिक्षक पी.जी. कांबळे यांनी केले.प्रसंगी संस्थेच्या माजी कार्यवाह कै. सौ. सिंधुताई जाधव यांच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर विद्यालयाचे सहा. शिक्षक एस.डी.पोवार यांनी जाधव यांच्या जीवनकार्याचा आढावा घेऊन विनम्र अभिवादन केले.यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष यु.बी.मोहिते यांनी संस्थेच्या उभारणीत कै.सौ. सिंधुताई जाधव यांचा मोठा वाटा होता.तळागाळातील उपेक्षित विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा पुरविण्याचे कार्य त्यांनी केले, असे मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.सुत्रसंचालन ए.एस.चव्हाण यांनी केले.आभार सौ. एस. एस.जाधव यांनी मानले.

# कृषी क्षेत्राच्या प्रगतीत महाराष्ट्र चेंबरचे योगदान महत्त्वपूर्ण

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे; महाराष्ट्र चेंबरच्या नूतनीकृत ‘एकनाथ ठाकूर अध्यक्षीय दालन’चे उद्घाटन

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)

**महाराष्ट्र चेंबरला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा असून शताब्दी वर्ष गाठणे ही अत्यंत अभिमानास्पद व ऐतिहासिक कामगिरी आहे.उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राच्या प्रगतीत चेंबरचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**

या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑनलाईन उपस्थित राहून मार्गदर्शन करताना वरील मत व्यक्त केले.महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरच्या नूतनीकृत एकनाथ ठाकूर अध्यक्षीय दालनचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात झाले. या सोहळ्याचे उद्घाटन राज्याचे गृह (ग्रामीण ), शालेय शिक्षण, सहकार, गृहनिर्माण आणि खाणकाम राज्यमंत्री पंकज भोईर यांनी केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले,अध्यक्ष रविंद्र माणगावे यांच्या ‘‘गाव तिथे उद्योजक’’ या संकल्पनेचे विशेष कौतुक करत प्रत्येक गावातून उद्योजक घडविण्याचा हा उपक्रम राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागात उद्योगनिर्मिती वाढल्यास स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल, असेही ते म्हणाले.



महाराष्ट्र चेंबरच्या नुतनीकृत दालनाच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री पंकज भोईर, रवींद्र माणगावे, हेमंत राठी व इतर मान्यवर.

या सोहळ्यास माजी अध्यक्ष व एम्पायर स्पायसेस अँड फूडचे मॅनेजिंग डायरेक्टर हेमंत राठी, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, ट्रस्ट बोर्ड चेअरमन आशिष पेडणेकर, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब, शंकर शिंदे, संगीता पाटील, प्रफुल्ल मालाणी, राज्य मुख्य समन्वयक वेदांशु पाटील, सुरेश घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना मंत्री डॉ. पंकज भोईर म्हणाले, ‘‘गाव तिथे उद्योजक’’ हा अध्यक्ष माणगावे यांच्या संकल्पनेतून साकारत असलेला स्तुत्य उपक्रम असून राज्याला अशा उपक्रमाची गरज आहे. यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक ते सहकार्य देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. प्रमुख पाहुणे एम्पायर स्पायसेस अँड फूडचे मॅनेजिंग डायरेक्टर हेमंत राठी रविंद्र माणगावे यांनी मार्गदर्शन केले.

विश्वस्त मंडळाच्या चेअरमन आशिष पेडणेकर यांनी सांगितले की, स्व. एकनाथ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आम्ही घडलो. माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा यांनी स्वागत केले तर सुरेश घोरपडे यांनी सूत्रसंचालन केले. सोहळ्याला महाराष्ट्र चेंबरच्या माजी अध्यक्षा सौ. मीनल मोहाडीकर, नाशिक इंडस्ट्रीज अँण्ड मॅनुफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष आशिष नहार, संजय शेटे, महाराष्ट्र चेंबरचे जीसी सदस्य, आणि सदस्य उपस्थित होते.

## नॅशनल हायस्कूलचे एनएमएमएस परिक्षेत यश

इचलकरंजी,ता.२८–

**येथील नॅशनल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी सन २०२५–२६ च्या एनएमएमएस परिक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील एकूण २४ विद्यार्थ्यांपैकी तब्बल १९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे.**

या सर्व विद्यार्थ्यांच्या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक इरफान अन्सारी व पर्यवेक्षक रफिक मुल्ला यांचे प्रेरणादायी नेतृत्व लाभले. तसेच मार्गदर्शक शिक्षक अमिन करमळकर, सुफियान पटेल, सना पटेल, सायमा पटेल यांचे विशेष



परिश्रम व सातत्यपूर्ण प्रयत्न या यशामागे महत्त्वाचे ठरले आहेत. यासोबतच वर्ग शिक्षिका दिलशान मुजावर यांचेही सहकार्य मिळाले.

यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष धोंडीलाल शिरगांवे, उपाध्यक्ष मिरासो समडोळे, अहमद मुजावर, रशीद गवंडी, नजीर खलिफा, मन्सूर मुजावर,शहाजहान शिरगांवे, लतीफ गैबान, मुबारक खान,कसीम शेख,डॉ.युसुफ हिरोली, सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. धोंडीलाल शिरगांवे यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे पुष्प गुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला.सुत्रसंचालन सहय्यक शिक्षिका सना पटेल यांनी केले.

## आदर्श विद्यामंदिरमध्ये मराठी राजभाषा दिन उत्साहात

इचलकरंजी,ता.२८–

**आदर्श शिक्षण मंडळ संचलित, सौ.हिराताई लोकरे बाल मंदिर, आदर्श विद्या मंदिर व रामभाऊ जगताप हायस्कूल या प्रशालेत मराठी राजभाषा दिन जल्लोषात साजरा झाला. मान्यवरांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन व कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.**

स्वागत व प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.गीता खोचरे यांनी केले.प्रमुख उपस्थिती लाभलेल्या सौ.मीनाक्षी तंगडी यांनी मी फुलपाखरू झाले तर... आणि आईचे डोळे या दोन कथांचे उत्कृष्टपणे अभिवाचन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून रमेश मर्दा,



आदर्श विद्यामंदिरमध्ये मराठी राजभाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी बनवलेल्या प्रदर्शनाची पाहणी करताना प्रमुख मान्यवर व शिक्षक वृंद.

डी.एम.बिरादार, गोवर्धन बोहरा, मनोहर जाधव उपस्थित होते.

यानंतर इयत्तेनुसार मराठी भाषेसंदर्भात ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.मराठी दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी बनवलेली मराठी शैक्षणिक साधनांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.यावेळी सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. गीता साळुंखे यांनी तर आभार अशोक शिंदे यांनी मानले.

## तात्यासाहेब मुसळे विद्यामंदिरमध्ये आंतरशालेय स्पर्धा संपन्न

इचलकरंजी,ता.२८–

**श्री चौंडेश्वरी शिक्षण प्रसारक संस्था यांच्यावतीने कै.तात्यासाहेब मुसळे यांच्या जयंतीनिमित्त मुसळे बाल विद्यामंदिरमध्ये विविध आंतरशालेय स्पर्धांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले होते.**

या स्पर्धेत इचलकरंजी शहरातील विविध शाळांमधून तब्बल ३३१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे आणि कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाल्या.याप्रसंगी संस्थेचे खजिनदार राजेंद्र सांगले, संचालक मिलिंद कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी



तात्यासाहेब मुसळे बाल विद्यामंदिरमध्ये आयोजित विविध आंतरशालेय स्पर्धांमध्ये सहभागी विद्यार्थी,विद्यार्थिनी.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वैशाली काडे यांनी प्रास्ताविक केले.

दुपारच्या सत्रात बालवाडी ते इयत्ता सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी चार गटांमध्ये गोष्ट सांगणे, कथाकथन व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये इचलकरंजी शहरातील विविध शाळांमधून १३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. परीक्षक म्हणून डी. बी. हजारे, टी.ए.माणगावे, गणपती उमराणे, राजेंद्र भिलवडे, युवराज आडके, माधवी व्हनबट्टे, रंजना घोरपडे व निशा दंडगे यांनी काम पाहिले.या संपूर्ण स्पर्धांचे नियोजन स्पर्धाप्रमुख वैशाली वरुटे व स्मिता माने यांनी केले.

हायस्कूल विभागाचे कलाशिक्षक श्री.परीट, श्री. भिलवडे, बालवाडी विभागप्रमुख खोत,मुल्लाणी मॅडम तसेच कलाशिक्षिका श्रुती मुरदंडे यांचे सहकार्य लाभले.या उपक्रमासाठी डी.एम.कस्तुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

## भारत भूषण विद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिन उत्साहात

बालिंगा,ता.२८(प्रतिनिधी)–


**शिंगणापूर येथील भारत भूषण विद्यालय येथे मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी भाषेचा गौरव, संवर्धन आणि प्रसार हा मुख्य उद्देश डोळ्यासमोर ठेवून विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमाची सुरुवात मराठी भाषेचे थोर साहित्यिक वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी कविता वाचन, भाषण स्पर्धा, कथाकथन आणि मराठी गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी ‘मराठी भाषा संवर्धन’ या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. सूत्रसंचालन सुरेंद्र तिके यांनी केले. यावेळी संस्थापक अध्यक्षा शाहिदा मुल्लानी, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीहरी
शुक्रवार, ता.२७/०२/२०२६ पासून
दुपारी १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
नशिली भाभी
प्रौढांसाठी
रोज १ खेळ- ७ वा.
रसियाँ
A A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. २८ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
ल्युसी क्युज लेडीज
फक्त प्रौढांसाठी
A A

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
शुक्रवार २७ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.

द केरला स्टोरी-२ (हिंदी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा
DOLBY DIGITAL
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा २ रा आठवडा
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.

पुन्हा एकदा साडे माडे तीन (मराठी)

गुरु
शुक्रवार ता.२७ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
१२.३० * ३.३० व ९.३० वाजता
सैराट नंतरचा सुपरहिट मराठी चित्रपट


रुबाब
(मराठी)
सायं.६.३० वा.
प्रत्येक राष्ट्रभक्ताने पहावाच असा अप्रतिम चित्रपट


शतक
(हिंदी चित्रपट)

कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
शुक्रवार ता. २७ पासून
रोज २ खेळ
१२ व ३ वा.
सध्याच्या वस्तूस्थितीला अनुसरून सत्य घटनेवर आधारीत थरारक कथा भाग १ पेक्षाही जबरदस्त स्टोरी भाग२


केरला स्टोरी भाग–२
(हिंदी चित्रपट)
रोज २ खेळ
६ व ९ वा.


तेरे नाम
(हिंदी चित्रपट)

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow


" द केरला स्टोरी 2 " - हिंदी ( U/A 16+ )
10:00 AM, 11:00 AM, 12:30 PM, 01:30 PM
03:30 PM, 04:30 PM, 06:30 PM, 07:30 PM
09:45 PM, 10:30 PM
" ओ' रोमियो " - हिंदी ( A )
11:30 AM, 06:15 PM
" तेरे नाम " - हिंदी ( U/A )
03:00 PM, 09:15 PM
आता कोणताही शो पहा 70/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11


द केरला स्टोरी २ (HIN) (U/A)
10.00am, 12.30, 03.00, 04.00, 05.30, 08.00, 09.30, 10.30pm
ओ रोमियो (HIN) (A)
10.00am, 12.45, 07.15, 10.30pm
अंग अंग सुनबाई! काय म्हणताय सूनबाई (MAR) (U/A)
04.15pm
क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम (MAR) (U/A)
01.15, 06.30pm
शतक (HIN) (U)
10.30am
आज पहा कोणताही शो फक्त 60 रु. मध्ये.
तसेच पेप्सी आणि पॉपकॉर्न वरती मिळवा 50% सूट..

# सातारा नगरपरिषदेचे ५९७ कोटींचे बजेट सादर

## विशेष सभेत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी; अर्थसंकल्पात विकास कामांसाठी भरीव तरतूद

सातारा,ता.२८(प्रतिनिधी)-

**आरोप प्रत्यारोपांच्या फैरींनी सातारा नगरपरिषदेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर झाला.नगरपरिषदेमध्ये विरोधकच नसल्याने महाविकास आघाडी सह सामाजिक व माहिती अधिकाऱ्यांनी सभागृहाच्या गॅलरीतूनच आपला विरोध दर्शवत सभागृह दणाणून सोडले. ५९७ कोटी ५० लाखांचा अर्थसंकल्प ३ लाख ३८ हजार ३४७ रूपयांच्या शिल्लकीसह उपनगराध्यक्ष ॲड दत्तात्रय बनकर यांनी गोंधळाच्या वातावरणात देखील नॉनस्टॉप सादर केला.**

सातारा शहरासह हद्दवाढ भागासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्प सादर करणारी विशेष सभा नगराध्यक्ष अमोल मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ॲड. दत्तात्रय बनकर यांनी अर्थसंकल्प सादर करण्यास सुरूवात केल्यानंतर महाविकास आघाडीचे सुनिल कोळेकर, मनीषा साळुंखे, सुषमा राजेभोसले यांनी विरोध दर्शवत आरोपांच्या फैरी झाडल्या. अंदाजपत्रकासंदर्भात दिलेले निवेदन वाचून दाखवा अशी मागणी केली.यात बरेच प्रकल्प अपूरे असून पुर्ण झालेले प्रकल्प हे प्रशासक अभिजीत बापट यांच्या कालावधीतील आहेत. त्यामुळे नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी फुकटचे श्रेय घेऊ नका,असा आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी केला. सौर ऊर्जा प्रकल्प, हद्दवाढ भागातील कामे अपूर्ण आहेत. छत्रपती संभाजी महाराज पुतळा व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा ही कामे तत्कालीन मुख्याधिकारी अभिजीत बापट यांनी केली असल्याचे सांगताना ॲड. बनकर यांच्यावर सुशांत मोरेंनी टिका केली.



सातारा नगरपरिषदेचा अर्थसंकल्प सादर करताना उपनगराध्यक्ष डी. जी. बनकर, यावेळी नगराध्यक्ष अमोल मोहिते,सर्व सभापती, नगरसेवक, मुख्याधिकारी विनोद जळक आदी मान्यवर.

सातारा शहराच्या विकासात्मक तरतूदीमध्ये मागासवर्ग,महिला बाल कल्याण,दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के निधीची तरतूद करण्यात आली आहे.घनकचरा व्यवस्थापन, पाणीपूरवठा व्यवस्था,आरोग्य, पर्यावरण, पथदिव्यांचे स्वयंचलन, खुल्या जागा व चौक सुशोभिकरण, माजी सैनिक कल्याणकारी योजना, रस्ते कॉंक्रिटिकरण व पार्कींग विकसित करणेच्या कामासांठी नगरपरिषदेने महत्वपूर्ण तरतुदी केल्याचे उपनगराध्यक्ष ॲड.बनकर यांनी सांगितले. तसेच २०२६-२७ मध्ये रिंगरोड व शहरातील रस्ते विकासप्रकल्प,पथदिव्यांचे स्वयंचलन, सी. सी. टी. व्ही कॅमेरे बसविणे, राजवाडा सेंट्रल पार्क व बहुमजली पार्किंग, उर्वरित शिवतीर्थ विकास व श्री.छ.शिवाजी महाराज यांच्या भव्य पुर्णाकृती पुतळा उभारणे, शाहुपूरी येथे व्यापारी केंद्र, भाजीमंडई व स्टेडियम उभारणी,अजिंक्यतारा किल्ला विकसीत करणे, कास धरण पर्यटनाच्या दृष्टीने सुशोभिकरण करणे,गणेश विसर्जनासाठी कायमस्वरूपती तलाव,शहरातील वाहतूक कोंडी कमी करणेसाठी वाहतूक आराखडा, अमृत २.० योजने अंतर्गत कास धरण ते सातारा गुरूत्व वाहीनीद्वारे पाणी पुरवठा करणे, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत ३०१ घरकुलांचा प्रकल्प पूर्णत्वास आणणे ही २०२६-२७ मध्ये प्रस्तावित कामे आहेत.

उपनगराध्यक्ष ॲड.बनकर हे अर्थसंकल्प सादर करताना गोंधळ केल्याबाबत गटनेते अविनाश कदम यांनी गोंधळ घालणाऱ्या विरोधकांना आपल्याला काही शंका, चुका, दुरूस्त्या व गैर वाटत असेल तर जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करू शकता असे सांगितले मात्र सभागृहात कामकाजाला अडथळा आणू नये असे सुचित केले.तर नगराध्यक्ष अमोल मोहिते यांनी देखील गोधळ करणाऱ्यांना दरडावत वेळप्रसंगी कारवाई करावी लागेल, असा इशारा दिला.बांधकाम सभापती बाळू खंदारे यांनी विरोधकांना त्यांच्या स्टाईलने समजावत तुमचंच मी बोलतोय,असे सांगितले. सभागृहात नगरसेवकांच्या हक्कांवर पीठासीन अधिकाऱ्यांनी गदा आणू नये त्यांना बोलू दिलं जावं, अशी विनंती देखील बाळू खंदारे यांनी केली.

स्वीकृत नगरसेवक शंकर माळवदे यांनी स्वीकृत नगरसेवकांना सभागृहात मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी ठराव करावा मागणी केली.नगरसेविका सौ मुक्ता वसंत लेवे यांनी स्थायी समितीच्या शिफारशीशिवाय सभागृहात सादर केलेले बजेट बेकायदेशीर असल्याचे बोलताना सांगितले. राजू गोरे यांनी भुयारी गटर योजनेच्या कामासाठी तरतूद करावी असे सांगितले. पक्षप्रतोद निशांत पाटील यांनी नगरसेवकांना १५ लाख रूपयांच्या निधीची तरतूद कमी असून ती २५ लाख करा, असे सांगितले.


## एसआयआरनंतर ५० लाख मतदार कमी होतील-सोमय्या

सांगली,ता.२८(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यातील ईश्वरपूर नगरपालिका आणि आटपाडी नगरपंचायतमधील मतदार यादीमध्ये अनेक त्रुटी असल्याचे समोर आले आहे. त्याबाबत सात दिवसांत चौकशी करुन कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आल्याचे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सांगलीतील पत्रकार बैठकीत सांगितले. मतदार यादी शुद्धीकरण (एसआयआर) प्रक्रियेनंतर राज्यातील सुमारे ५० लाख मतदार कमी होतील,असेही त्यांनी सांगितले.**

भाजप नेते सोमय्या हे सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी उरुण ईश्वरपूर आणि आटपाडी नगरपंचायतीला भेट दिली. त्यानंतर सांगलीत पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, राज्यात मोठ्या प्रमाणात मतदारयादीत घोळ आहे. मतदारयादीत नाव समाविष्ट करुन बांग्लादेशींनी घुसखोरी केली आहे. त्यामुळे राज्यातील मतदारयादीत एकही बांग्लादेशी नागरिक राहता कामा नये, अशी भूमिका आम्ही घेतली आहे. याशिवाय राज्यातील एकही नागरिक मतदार यादीपासून वंचित राहणार नाही.

मतदार यादीतील बोगस नावे शोधण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी स्वतंत्र समिती नियुक्त केली आहे.राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारने ३ लाख जन्म दाखले रद्द केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली.ती यादी निवडणूक आयोगाकडे देण्यात आली आहे. आणखी ४०हजार लोकांची चौकशी सुरू आहे.भारतात जन्म झाल्याचा पुरावा नाही अशी ३० ते ३५ लाख नावे आहेत. मतदार यादी शुद्धीकरण कार्यक्रमामध्ये मतदान अधिकारी घरोघरी जावून माहिती घेतील. २००२ आणि २०२६ मधील मतदार यादी मतदान अधिकाऱ्यांकडे राहिल. ते प्रत्यक्ष जावून पडताळणी करतील. पक्षाच्यावतीने १५ मार्चपर्यंत राज्यातील बारा ठिकाणी एसआयआरबाबत कार्यशाळा घेतली जाणार असल्याचेही भाजप नेते सोमय्या यांनी सांगितले. यावेळी माजी सभापती ब्रम्हानंद पडळकर, स्वरुपराव पाटील, विलास काळेबाग,केदार खाडिलकर, नगरसेविका स्वाती शिंदे, स्वाती खाडे आदी मान्यवर उपस्थित होते.



## कन्या महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

मिरज,ता.२८(प्रतिनिधी)-

**दि न्यू मिरज एज्युकेशन सोसायटीचे कन्या महाविद्यालय, मिरज येथील तीन विद्यार्थिनींची विविध राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धांसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे.**

प्राजक्ता शीतल आळते हिची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी,गौरी खरात हिची कृष्णा विद्यापीठ, रुद्रावरम येथे होणाऱ्या नेटबॉल स्पर्धेसाठी तर समीक्षा रवींद्र चौगुले हिची सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ हँडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या तिन्ही खेळाडूंना डॉ. बाबासाहेब सरगर व भाग्यश्री मंडले यांचे मार्गदर्शन लाभले.संस्थेचे पदाधिकारी व प्राचार्यांनी त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रहिमतपूर पालिकेचा १३४.५० कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

## कोणतीही करवाढ नाही; स्वच्छतेसह रस्ते विकासाला प्राधान्य

कोरेगाव,ता.२८(वार्ताहर)-

**रहिमतपूर येथील नगरपालिका सभागृहात २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा १३४ कोटी ५० लाख ९० हजार ९१६ रुपयांचा अर्थसंकल्प सर्वानुमते मंजूर करण्यात आला. नगराध्यक्षा वैशाली निलेश माने यांनी हा अर्थसंकल्प सादर केला. अखेर २५ लाख ९४ हजार ५६३ रुपयाची शिल्लक दर्शविण्यात आली आहे.**

सभेस उपनगराध्यक्ष केतन माने, मुख्याधिकारी विशाल भोसले तसेच सर्व विद्यमान नगरसेवक उपस्थित होते. प्रारंभी लेखापाल दिनेश राऊत यांनी उत्पन्न व खर्चाच्या ठळक बाबी सभागृहासमोर मांडल्या. करवाढ टाळून विकासावर भर देण्यात आला.

| महसुली भांडवली तरतूद |
|---|
| **प्रारंभी शिल्लक:** ३१ कोटी १६ लाख ५१ हजार ३५२ रुपये |
| **एकूण महसुली जमा :**१० कोटी ८३ लाख ७६ हजार ५०० रुपये |
| **भांडवली जमा:** ९२ कोटी ५० लाख ६३ हजार ०६४ रुपये |
| **एकूण जमा (शिल्लकसह):** १३४ कोटी ५० लाख ९० हजार ९१६ रुपये |
| **महसुली खर्च:** १० कोटी ८३ लाख ८ हजार ८६५ रुपये |
| **भांडवली खर्च:** १२३ कोटी ४१ लाख ८७ हजार ४८८ रुपये |
| **एकूण खर्च:** १३४ कोटी २४ लाख ९६ हजार ३५३ रुपये |

नगराध्यक्षा माने यांनी सांगितले की, कोणतेही करवाढ न करता शहराच्या सर्वांगिण विकासाला गतीक देण्यात येणार आहे स्वच्छता अभियान, घनकचरा, व्यवस्थापन, दलित वस्ती सुधारणा, रस्ते विकास, शौचालय व आरोग्य सुविधा यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी सोलर सिस्टिमचा पर्याय राबविण्याची सूचना नगरसेवक निलेश माने यांनी केली. ज्यांनी अद्याप कनेक्शन घेतले नाही त्यांना मागणीनुसार कनेक्शन देण्याचा निर्णय घेण्यात आला. सरासरी पाणीपट्टी आकारण्याबाबतही सूचना मांडण्यात आली.

नगरसेवक रंजीत माने यांनी सर्व लहान मोठ्या व्यवसायिकांचा नगरपालिकेत समावेश करून खोके भाडेपट्टी सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला यामुळे पालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

सभेस अखेरीस तांत्रिक त्रुटी असल्यास त्या दुरुस्त करण्याचे आश्वासन देत अर्थसंकल्प मंजूर करण्यात आले. शहराचा सर्वांगिण विकास हेच उद्दिष्ट असल्याचे नगराध्यक्षा माने यांनी स्पष्ट केले.

### महत्वाच्या योजनांसाठी निधीची तरतूद

वैशिष्ट्यपूर्ण योजनेस १५ कोटी, प्रधानमंत्री आवास योजनेचे एक कोटी,अण्णाभाऊ साठे नागरिक दलित वस्ती सुधारणे दीड कोटी, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे योजनेस एक कोटी, एसटीपी प्रकल्पास अडीच कोटी, विशेष रस्ता अनुदानास पाच कोटी.

## सोनवडे येथे पक्ष्यांसाठी पाणपोईचा उपक्रम

पाटण,ता.२८(प्रतिनिधी)-

**सोनवडे (ता.पाटण) येथील शिवाजी देसाई विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांसाठी पाणपोई हा उपक्रम हाती घेतला असून शाळेच्या परिसरातील आवारात झाडांखाली तसेच झाडांवर मातीच्या भांड्यांमध्ये स्वच्छ पाणी तसेच धान्य ठेवण्यात आले.**

तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या घरासमोरही पाण्याची भांडी ठेवून पक्ष्यांची तहान भागवण्याचा नवा संकल्प केला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले. या उपक्रमाचे ग्रामस्थांनीही कौतुक केले आहे.

## गिरणी कामगारांना घराच्या हक्कापासून वंचित ठेवले-देसाई

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**मुंबई कापड गिरणी कामगारांना हक्काच्या घरासाठी संघर्ष करावा लागत आहे तर दुसरीकडे उद्योजकांना मदतीचा हातभार देत आहेत, असे प्रतिपादन राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे खजिनदार निवृत्ती देसाई यांनी केले.**

कराड येथे आयोजित केलेल्या गिरणी कामगार प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे उपाध्यक्ष बजरंग चव्हाण, राजेंद्र साखरे, सुहास देसाई, बाळासाहेब धनवट,तानाजी पिसाळ,हनुमंतराव निकम, रवींद्र गुरव आदी कराड,सांगली,वाळवा,उंब्रज, पाटण विभागातून कार्यकर्ते उपस्थित होते. निवृत्ती देसाई यांनी सांगितले की, कापड गिरणी कामगार आता वृद्ध झाला आहे.त्यांच्या घरातील वारसांनी पुढे आले पाहिजे. मुंबईतील बंद व सरकारी कापड गिरण्यांच्या जागेवर म्हाडामार्फत ताबडतोब इमारती बांधून गिरणी कामगारांना घरे द्यावी. विविध मागण्यांसाठी आझाद मैदानावर १० मार्च रोजी निर्धार मोर्चा काढण्यात येणार आहे.

राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे उपाध्यक्ष बजरंग चव्हाण म्हणाले, या सरकारला सर्वसामान्य कामगारांचे काही देणे घेणे नाही. सर्वसामान्य कामगारांचे हक्क हिरावून घेतले जात आहेत. गिरण्यांच्या जागेवरील एक तृतीयांश भाग गिरणी कामगारांना हक्काने घर द्यावे यासाठीचा लढा अधिक तीव्र करूया असे आवाहन केले.राजेंद्र साखरे, सुहास देसाई यांनी स्वागत केले.बाळासाहेब पाटील यांनी आभार मानले.

## गांधी सेवाधाम विद्यालयात कविसंमेलन उत्साहात

चांदोली,ता.२८(वार्ताहर)-

**आरळा (ता.शिराळा) येथील गांधी सेवाधाम विद्यालयात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेले कविसंमेलन उत्साहात पार पडले.**



आरळा येथील गांधी सेवाधाम विद्यालयातील कवी संमेलनात कविता सादर करताना कवी.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.एस.घोरपडे, पर्यवेक्षक एच.ए.मुलाणी, कवि डॉ.विठ्ठल वडाम,संजय पोळ, भगवान पाटील, संजय नायकवडी, नथुराम कुंभार आदी मान्यवरांच्या हस्ते कवि कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानावरुन बोलताना ए. एस.घोरपडे म्हणाले की, कुसुमाग्रजांचे साहित्य अजरामर असुन मराठी भाषेला साहित्य क्षेत्रात फार मोठे स्थान आहे त्यामुळे मराठी भाषेचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे तसेच आजच्या पिढीने अत्याधुनिक युगात साहित्यिकांचे साहीत्य वाचण्यावर भर दिला पाहीजे.

यावेळी पार पडलेल्या कवीसंमेलनात डॉ.विठ्ठल वडाम, संजय पोळ,भगवान पाटील, संजय नायकवडी, नथुराम कुंभार,एस. एस. मोहिते, वेदांत कंदारे, स्वामीनी पाटील, आरोही पाटील, समीक्षा भाष्टे, तेजस्वीनी पाटील यांनी कविता सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या कार्यक्रमासाठी एस. एस. वाघमोडे, व्ही. आर. जोशी, ए. डी. भाष्टे, आर. एम.पाटील, ए.डी.परीट, आर. पी. आमले, सौ. जी. ए. पाटिल, सौ. एस.यु.कदम आदी शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते. सुत्रसंचालन ए. एस. पाटील यांनी तर आभार वाय. आर. पतके यांनी मानले.

## विद्यार्थ्यांच्या परीक्षाकाळात वीज तोडणी थांबवा-खास.शिंदे

पंढरपूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**दहावी व बारावीच्या परीक्षांचा कालावधी सुरू असताना घरगुती वीज ग्राहकांची कनेक्शन तोडणी केल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचा गंभीर मुद्दा समोर आला आहे.**



सोलापूर लोकसभा मतदार संघातील सोलापूर शहरासह पंढरपूर, अक्कलकोट, मोहोळ, मंगळवेढा, दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्यात थकीत वीज बिलामुळे वीज तोडणी सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या सोलापूर येथील अधीक्षक अभियंत्यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या भागातील बहुतांश नागरिक हे शेतकरी वर्गातील असून आर्थिक अडचणींमुळे एकरकमी वीज बिल भरणे त्यांना शक्य होत नाही.मात्र,थकीत वीज बिल हप्त्याने भरण्यास ग्रामस्थ पूर्णपणे तयार आहेत. परीक्षेच्या काळात वीज खंडित झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची आणि त्यांच्या भवितव्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी तातडीने योग्य उपाययोजना करण्यात याव्यात, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

त्यानुसार, सोलापूर लोकसभा मतदारसंघातील सर्व तालुक्यांत विद्यार्थ्यांच्या परीक्षा कालावधीत वीज तोडणी तात्काळ थांबवून थकीत वीज बिलासाठी सुलभ हप्त्यांची व्यवस्था करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी विनंती खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने करण्यात आली आहे.

# कराड पालिकेच्या अर्थसंकल्पात अनेक नव्या तरतुदींचा समावेश

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**शहरात अनेक नव्या सुधारणांसह नव्याने पाणी योजना सुरू करण्यासाठीची तरतूद पालिकेच्या अर्थसंकल्पात करण्यात आली. नगराध्यक्ष राजेंद्र यादव यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात अनेक नव्या गोष्टींचा समावेश आहे.**



शहरातील रस्ते, पाणी या मुलभूत सुविधांसह स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा, सौरउर्जेसह पालिका शाळांचा शैक्षणिक स्तर,शहरातील क्रीडाक्षेत्र, मोफत अंत्यसंस्कार, बेवारस मृतदेहांवरील अंत्यविधी, ई-गर्व्हन्स, वाढीव हद्दीतील विकासावर फोकस केला आहे. अर्थसंकल्पाच्या चर्चेवेळी चोवीस तास पाणी योजना नव्याने कार्यान्वित करण्यासाठीही प्रयत्न होणार आहेत, की यापूर्वी मीटर बसवताना घेतलेल्या रकमेचे काय केले? असा प्रश्न भाजपच्या शिवाजी पवार यांनी विचारला. यावर नगराध्यक्ष यादव म्हणाले, चोवीस तास पाणी योजना नव्याने सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.त्यासाठी नवे मीटर बसवले जाईल. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. यापूर्वी घेतलेल्या रकमेचे काय करायचे, त्यावर धोरणात्मक निर्णय घेऊ. जेवढा पाणी वापर, तेवढेच बिल येईल. पालिकांच्या शाळांचा दर्जा सुधारणांसाठी त्यांच्या इमारती, मैदानांसह त्यांच्या शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद केली आहे. त्यामागे पालिका शाळांचा दर्जा व विद्यार्थ्यांची पटसंख्या कशी वाढेल? त्यावर पालिका लक्ष केंद्रित करणार असल्याचे त्या विषयाच्या चर्चेवेळी नगराध्यक्ष यादव यांनी स्पष्ट केले.पालिकेची शाळा क्रमांक तीन ज्या पद्धतीने आहे. त्या धर्तीवर अन्य शाळांचा इमारत, शैक्षणिक दर्जासह अन्य बाबी होतील, त्यासाठी ४० लाखांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे.

## नाईक महाविद्यालयात मराठी दिन साजरा

शिराळा,ता.२८(प्रतिनिधी)-

**विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विभागाच्यावतीने विविध कार्यक्रम संपन्न झाले.**

प्रारंभी प्राचार्य डॉ.राजेंद्र बनसोडे यांच्या हस्ते 'वसंतदीप'या भिंत्त पत्रकाच्या उद्घाटनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषेविषयी अभिमान आणि जागर निर्माण व्हावा या उद्देशाने 'मराठी सही' हा विशेष उपक्रमही राबविण्यात आला. याप्रसंगी प्रा. प्रमोद पाटील यांनी 'जागर मराठीचा' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ.प्रकाश हुलेनवर यांनी केले. यावेळी उपप्राचार्य प्रा.राजसिंह पाटील, उपप्राचार्य भीमराव दशवंत तसेच डॉ.उज्वला बिर्जे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. शीतल धुमाळ यांनी केले.

# फलटणमध्ये सभापती व उपसभापती पदांच्या निवडी बिनविरोध

फलटण,ता.२८(वार्ताहर)-

**फलटण नगर परिषदेच्या सर्व विषय समित्यांचे सभापती व उपसभापती पदांच्या निवडी बिनविरोध पार पडल्या. या निवडींमुळे पालिकेवर भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या नेतृत्वाखालील खासदार गटाचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.**



फलटण : विषय समित्यांचे नूतन सभापती, उपसभापती व सदस्य.

फलटण नगरपरिषदेच्या स्थायी समिती आणि विविध विषय समित्यांचे सभापती गठीत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा राजकीयदृष्ट्या अत्यंत लक्षवेधी ठरली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि अपक्ष नगरसेवकांनी भारतीय जनता पार्टीस (खासदार गट) खुला पाठिंबा दिल्याने, पालिकेच्या सर्व विषय समित्यांचे सभापती व उपसभापती पदांच्या निवडी बिनविरोध पार पडल्या आहेत. ही विशेष सभा पीठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी निखील जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आणि लोकनियुक्त नगराध्यक्ष समशेरसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

फलटण नगरपरिषदेच्या सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी ज्येष्ठ नगरसेवक तथा माजी नगराध्यक्ष सोमाशेठ जाधव, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापतीपदी उपनगराध्यक्षा सौ. प्रियदर्शिनी रणजितसिंह भोसले (पदसिद्ध सभापती), स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समिती सभापतीपदी सचिन अहिवळे,पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण समिती सभापतीपदी राहुल निंबाळकर, नियोजन व विकास समिती सभापतीपदी संदिप चोरमले, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी सौ.मोहिनी मंगेश हेंद्रे व उपसभापतीपदी सौ. कांचन दत्तराज व्हटकर, मागासवर्गीय दुर्बल घटक कल्याणकारी समिती सभापतीपदी सौ. सुपर्णा सनीअहिवळे आणि नगरपालिकेचे सर्वाधिकार असणाऱ्या स्थायी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष समशेरसिंह नाईक निंबाळकर कामकाज पाहणार आहेत, तर सर्व विषय समित्यांचे नवनिर्वाचित सभापती हे या समितीचे पदसिद्ध सदस्य असतात याशिवाय, सभागृहातून भाजपचे गटनेते रोहित नागटिळे, नगरसेवक अशोकराव जाधव आणि शिवसेना गटनेते पांडुरंग गुंजवटे यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणून वर्णी लागली आहे.

# गृहखात्याचे सक्षमीकरण करताना....

**महाराष्ट्रातील आर्थिक व औद्योगिक प्रगतीमुळे देशात हा भाग अग्रणी असल्यामुळे देशविघातक अशा परकीय शक्ती इथल्याच काही असंतुष्ट लोकांना मदतीला घेऊन महाराष्ट्रातील शांतता व सुव्यवस्था खंडित करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे अनुभवास आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला वन ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवताना आपल्याला गृहखात्याच्या कार्यपद्धतीत काही सुधारणा कराव्या लागतील. त्याविषयी...**

● रविवार विशेष

येणाऱ्या काळात भारताला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्यात महाराष्ट्र हे सर्वात अग्रेसर राज्य ठेवायचे असेल तर राज्यातील कायदा व सुव्यवस्था अत्युत्तम असणे गरजेचे आहे. पुढील काही वर्षात महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात अन्य प्रांतातील व अन्य देशातीलही व्यक्ती,उद्योग, व्यवसाय, शिक्षणसंस्था मोठ्या प्रमाणात येणार हे नक्की. त्याचबरोबर मनुष्य निर्मित आपत्ती, आर्थिक विषमता, चंगळवाद, मूल्यांचा ऱ्हास यामुळे संघटित गुन्हेगारी, दहशतवाद, अंमली पदार्थांचा वापर, इंटरनेटचा वापर करून सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक, महिलांवरील अत्याचार, लहान मुलांचा गुन्हेगारीतील वाढता क्रम, वृद्धांकडे दुर्लक्ष, अपंगांच्या बाबतीत भेदभाव या समस्याही वाढत आहेत. कायदा राबवणाऱ्या यंत्रणातील भ्रष्टाचार, न्यायालयात होणारा विलंब व त्यामुळे गुन्हेगार मोकळे राहून धाडसाने गुन्हे करण्याची प्रवृत्ती, खंडणी मागणाऱ्या टोळ्या व त्यांना मिळणारा राजकीय पाठिंबा या पैसे गुंतवणूक करणाऱ्यांना बिचकवणाऱ्या आहेत.

महाराष्ट्रातील आर्थिक व औद्योगिक प्रगतीमुळे देशात हा भाग अग्रणी असल्यामुळे देशविघातक अशा परकीय शक्ती इथल्याच काही असंतुष्ट लोकांना मदतीला घेऊन महाराष्ट्रातील शांतता व सुव्यवस्था खंडित करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे अनुभवास आले आहे. पाकिस्तानी आय.एस.आय.च्या प्रेरणेने मुंबईसकट अनेक भागात दहशतवाद्यांनी बॉंबस्फोट केले व आजही अशी अनेक मोड्यूल्स भिवंडी, पुणे व इतर भागातून हुडकून काढण्यात सुरक्षा यंत्रणांना यश आले आहे.सीरिया व मध्यपूर्वेतील इतर भागातील मूलतत्त्ववादी, महाराष्ट्रातील तरुण मुले, मुली यांना हाताशी धरून पोलिसांवर हल्ले करतांना आढळतात. या त्यांच्या दहशतवादी कारवायांमध्ये अंमली पदार्थांची तस्करी, गैरकायदेशीर शस्त्रांचा व्यापार, हवाला रॅकेटस् व भ्रष्टाचारी व्यक्ती ही मुख्य हत्यारे आहेत.

सदर परिस्थितीस सक्षमतेने तोंड देण्यासाठी भ्रष्टाचारमुक्त व खंबीर नेतृत्त्व पोलीसांकडून अपेक्षित आहे. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे मनोधैर्य उंच राहण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांच्या नेमणुकांमध्ये राजकीय हस्तक्षेप होणार नाही यासाठी राजकीय नेतृत्त्वाने संयम बाळगणे आवश्यक आहे. मुंबईतील पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी राहण्यासाठी घर बांधण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प शासनाने जाहीर केला आहे तशीच व्यवस्था ठाणे, पुणे व अन्य शहरात राबवण्याची गरज आहे.

पोलीस प्रशासनानेही तातडीने लोकाभिमुख होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक पोलीस अधिकारी व कर्मचारी लोकांच्या तक्रारीबाबत संवेदनशील राहील याची खात्री करणे गरजेचे आहे. पोलीसांकडे केलेल्या प्रत्येक तक्रारीची विशेषतः महिलांनी केलेल्या तक्रारींची दखल घेऊन त्यामध्ये तातडीने कारवाई अपेक्षित आहे. त्यासाठी गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रारदाराने पोलिस-ठाण्यात य़ावे अशी अपेक्षा न करता नवीन तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन ई-एफआयआरबद्दल जागरुकता वाढवणे आवश्यक आहे. शहरांमध्ये लावलेल्या सीसीटीव्हींच्या माध्यमातून अन्य कोणाच्या तक्रारीशिवाय पोलीस नियंत्रण कक्षाने गुन्हेगारांवर



आपणहून कारवाई करणे अपेक्षित आहे. त्यासाठी एआयची मदत आज उपलब्ध आहे. पोलिस या तंत्रांचा फायदा करुन घेतात का याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. गुन्हा घडल्यानंतर गुन्ह्याचा तपास करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन आवश्यक असते. त्यासाठी क्षेत्रीय स्तरावर तज्ज्ञ व्यक्तींची समिती ठेऊन व्हिडिओ कॉलच्या मदतीने त्यांचे मार्गदर्शन घेणे जरुरीचे आहे. गुन्हे शाबीत होण्याचे प्रमाण २००८ साली ८ टक्के होते ते आता ५५ टक्के पर्यंत वाढले आहे, परंतु गंभीर गुन्ह्यात हे अजूनही १८ टक्के आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी फेशियल रिकग्निशन सिस्टीमचा वापर करून गुन्ह्याच्या जागी आरोपी हजर होते हे त्यांचे स्थिर फोटो व CCTV तील फोटो एकच आहेत हे प्रयोग शाळेत तपासुन न्यायालयात पुरावा म्हणून सादर केल्यास गुन्हे शाबीत होण्याच्या प्रमाणात नक्की वाढ होईल.

पोलीसांची गस्त घालायची पद्धत बदलून त्यात ड्रोनची मदत घेणे जरुरीचे आहे. गुन्हा घडल्यानंतर त्याचा तपास व प्रलंबित न्यायालयीन सुनावणीपेक्षा गुन्हे घडणारच नाहीत यासाठी जनप्रबोधनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पोलीस प्रशासनाकडे उपलब्ध निधीतील ५० टक्के निधी गुन्हे घडू नयेत या उद्देशाने सामाजिक प्रबोधन करण्यासाठी वापरणे अपेक्षित आहे. यासाठी समाजातील विविध विषयातील तज्ज्ञ, इलेक्ट्रॉनिक, प्रिंट, समाज माध्यमे, व रेडिओ यांची मदत घेऊन विविध स्तरांवर सातत्याने प्रबोधन करणे व बुद्धिभेद करणाऱ्या संदेशांचे निराकरण करणे आवश्यक आहे.

जनतेमध्ये पोलीसांविषयी विश्वास वाढविण्यासाठी जनतेच्या तक्रारी या नवीन तांत्रिक पद्धतीने म्हणजेच ॲपच्या माध्यमातून घेणे गरजेचे आहे. आधारकार्डाचा वापर करून ॲप मधून केलेली तक्रार ही ग्राह्य धरण्यात यावी व त्यावर तातडीने कारवाई व्हावी. अशाप्रकारचे कायद्यातील बदल होणे अपेक्षित आहेत. सार्वजनिक ठिकाणी होणारे सोन साखळी खेचण्याचे प्रकार, मोबाइल चोरीचे गुन्हे, घरफोड्या, आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हे, महिलांविरुद्धचे गुन्हे यामुळे आज जनता त्रस्त झाली आहे त्यासाठी पोलीसांनाही विशेष कौशल्य प्राप्त करून प्रभावी कारवाई होईल असे प्रशिक्षण देणे जरुरीचे आहे.

शासनाने सांगितलेले कायदा राबविण्याचे कायदेशीर काम स्वतःच्या जिवाची पर्वा न करता पोलीस कर्मचारी व अधिकारी रात्रंदिवस कार्यवाही करत असतात. हे कायदेशीर काम करत असतांना त्यांच्याशी सहकार्य करण्याऐवजी समाजातील काही पुरुष, महिला त्यांच्यावरच हल्ले करतात. त्यावेळेस शासनाने , न्यायालयाने व समाजाचे नेतृत्त्व करणाऱ्या सर्वांनीच त्याची गंभीरपणे दखल घेणे गरजेचे आहे व या समाजविघातक प्रवृत्तींचा निपटारा करणे आवश्यक आहे.

ठिकठिकाणी बसवलेल्या सीसीटीव्हीसारख्या तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन पोलीसांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या व्यक्तींवर कारवाई वाढविल्यास सदर व्यक्तींना हुज्जत घालायची संधी मिळणार नाही. उलट दिशेने येणारी वाहने, गाडी चालवताना मोबाईल वापरणे, अल्पवयीन मुलांनी गाडी चालवून अपघात करणे हे प्रकार सर्रास चालू आहेत. त्यासाठी जनप्रबोधनाबरोबर कडक आर्थिक दंड त्वरित वसूलीची व्यवस्था नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून राबवली गेली पाहिजे. रस्त्यावरील विक्रेत्यांना ठराविक ठिकाणे नक्की करून रस्त्यांचा गैरवापर टाळणे जरूरीचे आहे. राजकीय निदर्शने करणाऱ्यांना कोणत्याही वेळी रस्ते अडवायचे नाहीत यासाठी सहमती बनवून मोकळ्या मैदानांचा वापर करण्यास प्रोत्साहन द्यावे.

महिलांवरिल बलात्कार, ऑनर किलिंग, छेडछाड हा समाजाला कलंक आहे. अशा घटना समाजात असुरक्षेची भावना निर्माण करतात. बहुतेक सर्व गैर प्रकार करण्यात ओळखीच्या व्यक्ती, नातेवाईक, शेजारी हेच जास्तीतजास्त आरोपी म्हणून निष्पन्न झाले आहेत व ह्या व्यक्तींविरुद्ध तक्रार करायला पीडिता तयार होत नाहीत, पालक मुलीला तक्रार करू नये यासाठी दबाव आणतात, पीडिता हीच जणु काही दोषी आहे अशी वागणूक समाजातून दिली जाते. हे ओळखून अल्पवयीन मुलींनी ओळख असलेल्या किंवा विश्वासू वाटणाऱ्या कोणत्याही पुरुषांबरोबर एकट्याने राहताना जास्तीतजास्त खबरदारी घेणे व विवाहपूर्व शरीरसंबंध ठेवण्यास विरोध करणे आवश्यक आहे. या शिवाय जर कोणी अतिप्रसंग करायला लागलाच तर ११२ ह्या भारत सरकारने आपत्कालीन मदतीसाठी सुरू केलेल्या ॲपच्या माध्यमून तात्काळ पोलीस मदत मिळवावी. याशिवाय सायबर टोलमुक्त हेल्पलाईन १९३० वर संपर्क करावा. त्याशिवाय www. Cybercrime.gov.in या ई मेल आयडीवरती आपले नाव न लिहिताही तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

छेडछाडीच्या घटनांमध्ये पीडितेचा जबाब व अन्य पुरावा एकत्र करून पोलीसांनी चोवीस तासात दोषारोप पत्र पाठवणे बंधनकारक करणे आवश्यक आहे. वेळच्यावेळेसच टवाळखोरांना न्यायालयातून शिक्षा झाल्यास बलात्कारासारखे पुढील गंभीर गुन्हे कमी होण्यास मदत होते. महिला पोलिसांनी आपल्या हद्दीतील महिला बचतगट सदस्या, महिलांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांच्या मदतीने शाळा व महाविद्यालयातील मुलींसाठी ठिकठिकाणी प्रत्यक्ष अथवा झूम सारख्या ॲपची मदत घेऊन जनजागृती करणे, महिलांमध्ये व अल्पवयीन मुलींमध्ये पोलिसांबद्दल विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. अत्याचाराचे बळी असणाऱ्या पीडितांशी संवाद साधून त्यांना पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यास प्रोत्साहित करणे, न्यायालयात त्यांना खंबीर आधार देऊन सत्य सांगण्यास पाठिंबा देणे आवश्यक आहे, पोलीसांनीही महिला पोलीसमित्र ही संकल्पना राबवून, ज्या ठिकाणी पोलीस उपलब्ध नाहीत त्या ठिकाणी महिला पोलिस मित्रांच्या मदतीने अल्पवयीन मुलींशी संवाद स्थापन करणे जरुरीचे आहे. समाजानेही या पीडितेंच्या बाबतीत आपला दृष्टीकोन बदलून त्यांना सतत मानसिक आधार मिळेल याची खात्री करणे आवश्यक आहे. महिलांची, मुलींची सुरक्षा ही आपली स्वतःची सुरक्षा आहे हे समजून त्यासाठी समाजातील सर्व सूज्ञ व्यक्तींनी क्रियाशील राहणे गरजेचे आहे.

शहरांमधील वाढणारा एकटेपणा, शेजाऱ्याबद्दल पूर्ण उदासीनता, यामधून वरवर चांगल्या दिसणाऱ्या गृह संकुलात दहशतवादी येऊन राहिल्याचे महाराष्ट्राने अनुभवले आहे. एखादी व्यक्ती घरामध्ये बरेच दिवस मृत पडल्याचे अनेक दिवसांनी निष्पन्न होते. निराशेमुळे आत्महत्त्यांचे प्रमाण वाढत आहे. यासाठी गुन्हा घडल्यानंतर केवळ तपासाची भूमिका न घेता पोलीसांनी शहरातील विविध गट सातत्याने एकमेकांच्या संपर्कात राहतील व इतर लोकांच्या सुखदुःखामध्ये संवेदनशीलपणे भाग घेतील, यासाठी विविध कार्यक्रम कल्पकतेने राबवणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे समंजस नेतृत्त्व दाखवून समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था राहील ही जबाबदारी येणाऱ्या काळात पोलीसांना पार पाडावी लागणार आहे. त्यासाठी पोलीस प्रशिक्षणात मूलभूत बदल अपेक्षित आहे.

या सर्व जबाबदाऱ्या आमच्या आम्ही पार पाडू असे समजल्यास येणाऱ्या बोजाखाली पोलीस त्यांना नेमून दिलेले काम देखील नीट पार पाडणे अशक्य आहे. त्या शिवाय करोनासारख्या जागतिक महामारी सारख्या प्रसंगी पोलीसांची कसोटी लागत असते. अनेक कारणांमुळे समाजविघातक शक्ती पोलीसांवर हल्ले करत असतात. यावर प्रभावी उपाय म्हणजे जनतेतील सक्षम इच्छुक व निष्कलंक अशा सर्व गटातील, वयातील, धर्मातील स्त्री पुरुषांना पोलीस मित्र बनवून ही जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. गृहखात्याने त्यासाठी शासन निर्णय जारी करणे आवश्यक आहे.येणाऱ्या काळातील आव्हाने ही संधी समजून सक्षम, भ्रष्टाचारमुक्त नेतृत्त्व, नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार व लोकाभिमुख पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने अपेक्षित कायदा व सुव्यवस्थेची परिणामकारक परिस्थिती निर्माण करून महाराष्ट्राचे गृहखाते हे राज्याला आदर्श राज्य बनवेल याची खात्री आहे.


**- प्रवीण दीक्षित**

निवृत्त पोलीस महासंचालक

● लक्षवेधी

## बंडखोरीची डोकेदुखी

एप्रिल महिन्यात राज्यसभेच्या दहा राज्यांतील ३७ जागा रिक्त होत असून यासाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे. राज्यसभेतील संख्याबळ पाहिल्यास अलीकडच्या काळात भाजपच्या स्थितीत सातत्याने सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे. खरी समस्या तर काँग्रेस आणि विरोधी पक्षांची आहे. काही जागांवर काँग्रेसचा झेंडा पुन्हा फडकू शकतो, परंतु क्रॉस व्होटिंग म्हणजेच मतविभाजनामुळे काही जागा गमावण्याची नामुष्की काँग्रेसवर मागील काळातही ओढवली आहे. त्यामुळे देशातील सर्वात जुना पक्ष असलेल्या काँग्रेसला एखादी जागा जिंकण्यापेक्षा क्रॉस व्होटिंग कशी रोखली जाईल यावरच भर द्यावा लागणार आहे.



यावर्षी पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम, पुदुच्चेरीत विधानसभा निवडणुका होत आहेत. तत्पूर्वी राज्यसभेच्या निवडणुकीच्या माध्यमातून काँग्रेसला देशभरात ऐक्याचा संदेश द्यावा लागणार आहे आणि पक्षात सर्वकाही ठीक असल्याचे जनतेपर्यंत पोचवावे लागणार आहे. शिवाय ही निवडणूक विरोधी पक्षाच्या ऐक्याच्या दृष्टीने देखील महत्त्वाची आहे. राज्यसभा निवडणुकीत राजकीय पक्षांना त्यांचे सर्व आमदार, खासदारांना एकत्र ठेवण्याचे देखील आव्हान असते. मागील वेळी काँग्रेसला हरियानात मतविभाजनाचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि त्याच्या घटक पक्षांना सावधगिरी बाळगावी लागणार आहे. काही जागांचे निकाल निश्चित मानले जात आहेत, त्याचवेळी मतांची फाटाफूट रोखली नाही तर काही ठिकाणी पराजय निश्चितच आहे.

हरियानातील भाजपचे खासदार किरण चौधरी आणि रामचंद्र जांगरा यांचा कार्यकाळ नऊ एप्रिल रोजी संपत आहे. ९० सदस्यांच्या हरियाना विधानसभेत एक जागा भाजप आणि एक जागा काँग्रेसच्या खात्यात जावू शकते. परंतु इथे आतापासून राजकीय डावपेच सुरू झाले आहेत. ऑगस्ट २०२२ मध्ये मतविभाजनामुळे काँग्रेसचे अजय माकन यांचा पराभव झाला होता तर भाजप आणि जेजेपीच्या पाठिंब्यावर अपक्ष उमेदवार कार्तिकेय शर्मा यांचा विजय झाला होता. हरियानात राज्यसभेच्या एका जागेवरील विजयासाठी ३१ आमदारांचा पाठिंबा मिळणे गरजेचे आहे. भाजपकडे ४८ आणि काँग्रेसकडे ३७ आमदार आहेत.

६८ सदस्यीय हिमाचल प्रदेशच्या विधानसभेत राज्यसभेच्या एका जागेसाठी मतदान होणार आहे. ४० आमदार असतानाही काँग्रेसला सावध राहावे लागणार आहे. २०२४ मध्ये बहुमत असतानाही काँग्रेसचे वरिष्ठ नेते अभिषेक मनु सिंघवी पराभूत झाले होते. तेव्हा काँग्रेसचे काही आमदार आणि अपक्षांनी भाजपच्या उमेदवारांना मतदान केले होते. अजूनही भाजपकडे २८ आमदार आहेत. त्यामुळे काँग्रेसला सिंघवी यांच्यासारख्या निकालाची यावेळी पुनरावृत्ती तर होणार नाही ना? या विचाराने ग्रासले आहे.

बिहारमध्ये पाच जागांसाठी मतदान होणार आहे. २४३ जागांच्या विधानसभेतून एक जागा जिंकण्यासाठी ४१ आमदारांचे पाठबळ मिळणे गरजेचे आहे. एनडीएचे २०२ आमदार असल्याने चार जागा तर निश्चित आहेत. परंतु ३५ आमदार पाठिशी असलेली 'इंडिया' आघाडी ही स्वबळावर आतापर्यंत एकही जागा जिंकू शकली नाही. अशावेळी पाच आमदार असलेल्या एमआयएमची भूमिका ही मोलाची ठरते.

● यशोगाथा

## पैकीच्या पैकी यश

अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेच्या (जेईई मेन २०२६ - सत्र १) निकालात ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या निकालात अर्णवने ३०० पैकी ३०० असे पैकीच्या पैकी गुण मिळवत १०० 'पर्सेंटाइल'सह देशपातळीवर खळबळ माजवून दिली. अर्णवच्या या यशाने केवळ त्याचे कुटुंबच नव्हे, तर अवघ्या शिक्षण पंढरीला नवचैतन्य दिले आहे.



अर्णवची ही झेप अनेक अर्थांनी विशेष मानली जात आहे. त्याचे कौटुंबिक पार्श्वभूमी प्रामुख्याने मानव्यविद्या शाखेशी संबंधित आहे. त्याचे आई-वडील दोघेही शिक्षक असून भूगोल आणि राज्यशास्त्र यांसारख्या विषयांत त्यांचे प्रभुत्व आहे. घरात कला शाखेचे वातावरण असतानाही अर्णवने माध्यमिक शाळेत असल्यापासूनच अभियांत्रिकी क्षेत्रात जाण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. 'ॲलन कोटा' या संस्थेतून त्याने आपले प्रशिक्षण पूर्ण केले. एखाद्या विद्यार्थ्याने विज्ञानाची पार्श्वभूमी नसतानाही तांत्रिक विषयात एवढे मोठे यश संपादन करणे ही बाब कौतुकास्पद ठरली आहे.

स्पर्धा परीक्षेचा प्रचंड ताण आणि दिवसाचे अनेक तास चालणारी अभ्यासाची बैठक असतानाही अर्णवने आपले मानसिक संतुलन उत्तम राखले होते. यशाचे शिखर गाठूनही हा १४ वर्षीय मुलगा आजही जमिनीवर आहे. त्याच्या मानसिक आरोग्याबद्दल बोलताना त्याने एक महत्त्वाचे गुपित उलगडले. रोजच्या प्रशिक्षणातून आणि अभ्यासातून वेळ काढल्यानंतर तो रात्री आपल्या धाकट्या भावासोबत आवर्जून क्रिकेट खेळायचा. खेळाच्या या छंदानेच त्याला अभ्यासासाठी नवी ऊर्जा दिली आणि ताणापासून दूर ठेवले. अर्णवची ही यशोगाथा केवळ गुणांपुरती मर्यादित नसून, ती जिद्द, कौटुंबिक पाठिंबा आणि खेळाचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली आहे.

● विशेष

## कचऱ्याचे डोंगर आणि प्रशासकीय अनास्था

सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच घनकचरा व्यवस्थापनाबाबत व्यक्त केलेली चिंता ही केवळ पर्यावरणीय समस्या नसून ती सार्वजनिक आरोग्य आणि अर्थव्यवस्थेपुढील मोठे आव्हान आहे. आपण जेव्हा 'विकसित भारता'चे स्वप्न पाहतो, तेव्हा नागरी जीवनातील मूलभूत सुविधांची प्रभावी अंमलबजावणी ही एक अनिवार्य अट असते. मात्र, दुर्दैवाने आजही आपले देश कचऱ्याच्या डोंगराखाली दबलेला दिसत आहे. शहरांपासून ते ग्रामीण भागापर्यंत घनकचरा व्यवस्थापन ही एक गंभीर नागरी समस्या बनली असून, कचरा विलगीकरण आणि त्याच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीबाबतची उदासीनता भयावह आहे.



कचरा व्यवस्थापनाचे नवे नियम लागू होण्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने दशकानुदशके जुन्या नियमांच्या अंमलबजावणीतील ढिलाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयाच्या मते, वाढत्या कचऱ्याचा भार सामान्य नागरिकांच्या जीवनमानाच्या सुलभतेवर प्रतिकूल परिणाम करत आहे. 'अमृत' (अटल मिशन फॉर रिजुवेनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन) आणि 'स्मार्ट सिटी' सारख्या महत्त्वाकांक्षी योजना राबवूनही जमिनीवर त्याचे अपेक्षित परिणाम का दिसत नाहीत, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला आहे. म्हणूनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींची जबाबदारी निश्चित करणे आता अपरिहार्य झाले आहे.

**लोकप्रतिनिधी आणि लोकसहभागाची भूमिका**


केवळ सरकारी यंत्रणा कचऱ्याची समस्या सोडवू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, नगरसेवक आणि कॉर्पोरेटर यांनी आपापल्या प्रभागात नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत आणि कचरा विल्हेवाटीबाबत जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. जनजागृती हाच या समस्येवरील सर्वात मोठा उपाय आहे. कचऱ्याचे उगमस्थानीच विलगीकरण (ओला आणि सुका कचरा वेगळा करणे) जोपर्यंत लोकचळवळ बनत नाही,तोपर्यंत कचरा डेपोवरील भार कमी होणार नाही.

आता या विषयात केवळ समजूत काढून चालणार नाही, तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. सुरुवातीच्या टप्प्यात कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर दंड आकारणे हा पर्याय असू शकतो, परंतु वारंवार नियम मोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. 'शून्य सहिष्णुता' हे धोरण स्वीकारल्याशिवाय स्वच्छतेचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. त्याचप्रमाणे, आपल्या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून प्रशासकीय यंत्रणेला शिस्त लावणे गरजेचे आहे. स्थानिक प्रशासन आणि नागरिक कल्याण संस्था यांच्यातील उत्तम समन्वय या समस्येवर प्रभावी तोडगा काढू शकतो.

भारताची आर्थिक प्रगती होत असताना उपभोग वाढणार आणि त्यासोबतच कचऱ्याची निर्मितीही वाढणार, हे उघड आहे. केंद्र सरकारने शहरी पायाभूत सुविधांसाठी १ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा करून योग्य पाऊल उचलले आहे. मात्र, केवळ पैसा खर्च करून ही समस्या सुटणार नाही. धोरणकर्त्यांनी जोपर्यंत घनकचरा व्यवस्थापनाला सर्वोच्च प्राथमिकता दिली नाही,तोपर्यंत वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करताना शहरांची दमछाक होत राहील.

**- विलास कदम**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**रविवार ता.१.३.२०२६,** विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे उत्तरायणे, शिशिर ऋतो,फाल्गुन मासे, शुक्ल पक्षे, त्रयोदशी तिथी १९.११ नंतर चतुर्दशी तिथी, पुष्प नक्षत्र, ८.३५ नंतर आश्लेषा नक्षत्र कर्करास, शोभन योग १४.३४ नंतर, अतिगंड योग, कौलव करण ७.५५ नंतर, तैतिल करण १९.११ नंतर, गरज करण ३०.३१ पर्यंत, दिनमान ११.४१, सुर्योदय ६.५५, सुर्यास्त १८.३६ (कोल्हापूरचे), राहूकाळ सायं. ४.३० ते ६ प्रदोष, रेवणाराध्य जयंती, मध्यम दिवस सकाळी ८.३० पर्यंत, घबाड ८.३५ ते १९.११ पर्यंत.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**-जुन्या मित्रांबरोबरील भेटीगाठी तुमचा उत्साह द्विगुणित करतील.स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल. चांगल्या संकल्पना असलेली व्यक्ती तुमचे लक्ष वेधून घेईल.

**वृषभ**- तुमच्या जवळच्या माणसांबरोबर कोणताही वादविवाद छेडू नका.जर वादग्रस्त मुद्दे असतील तर ते संमतीने सोडवता येतात.तुमच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक परिवर्तन येईल.

**मिथून**-तुम्हाला मानसिक शांती मिळेल.घरातील आयुष्य शांततापूर्ण आणि मोहक असेल. आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळेल.

**कर्क**- तातडीच्या कामामुळे तुमच्या योजना बारगळतील. ऐतिहासिक स्थळांवर कुटुंबाची छोटीशी पिकनिक प्लॅन करा. धन लाभ होऊ शकतो.

**सिंह**-आत्मविश्वास मजबूत करणे हे कमालीचे मदतगार ठरू शकते. नोकरीच्या ठिकाणी तुमच्या कामाची आज स्तुती होईल. प्रलंबित कामे पूर्ण कराल.

**कन्या**- तुम्हाला कामाचे चांगले फळ मिळेल.आर्थिक स्थिती सुधारेल.तुम्ही कुठल्यातरी मोठ्या अडचणींमधून बाहेर निघू शकता. नातेवाईकांच्या येण्याने आनंदी वातावरण राहील.

**तुळ**-तुमच्या भवतीच्या लोकांचा पाठिंबा मिळाल्याने तुम्ही आनंदी व्हाल. आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल.सरकारी कामात वडिलधाऱ्यांचा सल्ला घ्या.

**वृश्चिक**-नवे तंत्रज्ञान शिकणे हे आपले कौशल्य वाढविण्यास त्याचा फायदा होईल.परिस्थिती अधिक वाईट बनण्याच्या आधी मतभेद दूर करण्यासाठी संवाद साधा.

**धनु**- आज तुम्हाला अनेक नवीन आर्थिक योजना सादर केल्या जातील.कोणतेही वचन देण्याआधी सदर योजनेच्या चांगल्या-वाईट बाबी तपासून पाहा.

**मकर**- क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. जर प्रवास करत असाल तर आपल्या महत्वाच्या वस्तूंची काळजी घ्या.

**कुंभ**- कामानिमित्त खाजगी कार्यक्रमांना जाण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.योगासने आणि ध्यानधारणा यामुळे मानसिकदृष्ट्या तुम्ही सक्षम राहाल.

**मीन**- तुम्हाला आपल्या भाऊ-बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे.कामानिमित्त प्रवास घडेल.कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांची मदत मिळेल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अ‍ॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# गोकुळमध्ये सत्ता मिळवण्यासाठी आकड्यांचा खेळ

## महायुतीची एकजूट की विरोधकांची व्यूहरचना?

कोल्हापूर, ता.२८ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्हा परिषद अध्यक्षपदावरून राष्ट्रवादी आणि भाजप यांच्यात रस्सीखेच सुरू असतानाच गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. त्यानुसार गावागावातील दूध संस्थांमधील मतांचे गणित जुळवण्यासाठी नेते आणि पक्ष प्रयत्नशील आहेत. त्यातच गोकुळ हे कोल्हापूरच्या राजकारणातील महत्त्वाचे केंद्र असल्याने या सहकारी संस्थेवर वर्चस्व मिळवण्यासाठी नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली असते. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही साम–दाम–दंड–भेद नीतीचा वापर करतात. २५ वर्षांची महाडिकांची सत्ता घालवून मंत्री हसन मुश्रीफ आणि काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांनी महाडिक यांच्या विरोधकांना एकत्र करत गोकुळवर सत्ता मिळवली.**

बुद्धिबळाच्या पटावर प्यादे हे सर्वांत महत्त्वाचे आणि संख्यात्मकदृष्ट्या जास्त असलेले सैन्य असते. प्याद्यांचा योग्य वापर केल्यास प्रतिस्पर्ध्याला अडचणीत आणता येते, याची जाणीव नेत्यांनाही आहे. २०२१ मध्ये झालेल्या गोकुळ निवडणुकीदरम्यान हे सिद्ध झाले होते. कारण गोकुळ दूध संघाचे ज्येष्ठ संचालक विश्वास पाटील आणि अरुण डोंगळे हे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांच्या सोबत राहिले होते. त्यामुळेच गोकुळमध्ये २५ वर्षांनंतर सत्तांतर झाल्याचे मानले जाते.

दरम्यानच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहिले. राज्यात आता महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे गोकुळ दूध संघाचा अध्यक्ष महायुतीचाच व्हावा, यावरून वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांच्या वर्चस्वाला हादरा बसला आहे.

दरम्यान,२०२१ मध्ये झालेल्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीसाठी ३६४७ संस्थांचे ठराव दाखल झाले होते. त्यापैकी ३६३९ ठरावधारकांनी मतदान केले होते. विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाळ ४ मे २०२६ रोजी संपणार आहे. मात्र गोकुळमध्ये २५ वर्षांच्या सत्तांतरानंतर नव्याने १८२३ संस्थांची नोंदणी झाली आहे.

त्यामुळे वाढलेले नवीन ठराव कोणाच्या पथ्यावर पडणार, असा सवाल उपस्थित होत आहे. कारण गोकुळमध्ये सत्तांतर घडवत असताना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील, आमदार विनय कोरे, आमदार चंद्रदीप नरके, माजी आमदार सुजित मिणचेकर या सर्वांची भूमिका महत्त्वाची राहिली होती. या सर्वांच्या ठरावांची गोळाबेरीज करूनच गोकुळमध्ये सत्तांतर करणे शक्य झाले होते.मात्र पाच वर्षांच्या काळानंतर आता अनेक राजकीय गणिते बदलली आहेत. गोकुळमध्ये सत्तांतर करण्यासाठी ज्यांनी मोठी भूमिका बजावली होती ते ज्येष्ठ संचालक विश्वास पाटील आणि अरुण डोंगळे हे सध्या महायुतीच्या बाजूने आहेत. ज्येष्ठ संचालक विश्वास पाटील हे आमदार चंद्रदीप नरके यांच्यासोबत आहेत, तर अरुण डोंगळे हे मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासोबत आहेत. त्यातच विद्यमान संचालक मंडळातील संचालकांची संख्या आता २१ वरून २५ करण्यात आली आहे.

२०२१ मध्ये झालेल्या गोकुळच्या निवडणुकीवेळी ३६४७ संस्थांचे ठराव होते, तर आता नव्याने झालेले १८२३ असे एकूण ५४७० संस्था मतदानासाठी पात्र असणार आहेत. त्यामुळे विजयासाठी किमान २८०० ठरावांची गरज लागणार आहे. निवडणुकीसाठीचे हे ठराव म्हणजे दूध संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी प्राथमिक दूध संस्थांनी अधिकृत प्रतिनिधी म्हणून नाव नोंदणी करण्यासाठी केलेला अधिकृत निर्णय असतो. हे ठराव कायदेशीररीत्या नोंदणीकृत संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सभेत मंजूर करून ठराविक वेळेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे जमा करावे लागतात.

गोकुळच्या निवडणुकीत सध्याच्या घडीला सर्वाधिक ठराव हे ज्येष्ठ संचालक विश्वास पाटील आबाजी व अध्यक्ष अरुण डोंगळे यांच्याकडेच असल्याचे मानले जात आहे. अरुण डोंगळे ज्या तालुक्याचे प्रतिनिधित्व करतात त्या राधानगरी तालुक्यात नव्याने २४५ संस्थांची वाढ झाली आहे. तर करवीर तालुक्यात २२९ संस्थांची नव्याने वाढ झाली आहे. त्यानुसार सध्या राधानगरीमध्ये ७०३, तर करवीर तालुक्यात ८६८ ठराव आहेत.त्यामुळे गोकुळच्या लढतीत या दोघांच्या भूमिकेला महत्त्व राहणार आहे. सध्या तरी हे दोघेही सत्तारूढ गटासोबत असले तरी विरोधकांची व्यूहरचना पाहता यातील एकाला 'प्यादे' करून विरोधकांनी सत्तेचा सारीपाट मांडला, तर आश्चर्य वाटायला नको. आमदार सतेज पाटील यांनी यापूर्वीच २००० हून अधिक संस्थांचे ठराव त्यांच्याकडे असल्याचे म्हटले आहे. गोकुळसाठी आमदार सतेज पाटील यांनी शड्डू ठोकला असला तरी त्यांना शह देण्यासाठी दुसरीकडे खासदार धनंजय महाडिक यांनी गोकुळची निवडणूक महायुती म्हणूनच लढणार असल्याचे जाहीर केले आहे. राजकीय पक्षांचा विचार केला तर भाजप, शिंदे सेना, अजित पवार राष्ट्रवादी, जनसुराज्य शक्ती यांच्या ठरावांची गोळाबेरीज अधिक होणार आहे. तर काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील तसेच माजी आमदार सत्यजित पाटील सरूडकर यांच्याकडे असलेले ठराव महत्त्वाची भूमिका बजावणारे ठरणार आहेत.

**करवीर ८६८, राधानगरी ७०३, कागल ६२२, भुदरगड ५९८, पन्हाळा ५१९, शाहूवाडी ४५१, चंदगड ४२६, गडहिंग्लज ४०२,आजरा ३०८,शिरोळ २७४, हातकणंगले १६७, गगनबावडा १३२**

## वर्तमानपत्राची मालकी व इतर संबंधीचे निवेदन

### दैनिक महासत्ता

इचलकरंजी.
फॉर्म ४
(नियम ८ अन्वये)

| | |
|---|---|
| १)प्रकाशन स्थळ | ''मँचेस्टर भवन'' ४४४/२/३–ए, महासत्ता चौक, इचलकरंजी – ४१६ ११५. |
| २)प्रकाशनाचे कालमान | दैनिक |
| ३)मुद्रकाचे नांव | श्री. वसंत कृष्णाजी दत्तवाडे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | ''मँचेस्टर भवन'' ४४४/२/३–ए, महासत्ता चौक, इचलकरंजी – ४१६ ११५. |
| ४) प्रकाशकाचे नांव | श्री. वसंत कृष्णाजी दत्तवाडे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | ''मँचेस्टर भवन'' ४४४/२/३–ए, महासत्ता चौक, इचलकरंजी – ४१६ ११५. |
| ५) उपसंपादकाचे नांव | श्री. तरुण वसंत दत्तवाडे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | ''मँचेस्टर भवन'' ४४४/२/३–ए, महासत्ता चौक, इचलकरंजी – ४१६ ११५. |
| ६)वृत्तपत्राचे मालक असणाऱ्या व्यक्तीचे आणि भागीदाराचे व भांडवलदारांच्या एका टक्क्यापेक्षा अधिक भाग असणाऱ्या भागधारकांची नांवे व पत्ता | श्री. वसंत कृष्णाजी दत्तवाडे, भारतीय, ''मँचेस्टर भवन'' ४४४/२/३–ए, महासत्ता चौक, इचलकरंजी – ४१६ ११५. |

मी, वसंत कृष्णाजी दत्तवाडे या अन्वये जाहीर करतो की, वरील दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

१ मार्च २०२६ — प्रकाशकाची सही/– वसंत कृ. दत्तवाडे

## इचलकरंजीत ७ मार्चपासून स्वामी परमार्थ देवजी हरिद्वार यांचे योग शिबिर

इचलकरंजी,ता.२८–

**येथील पतंजली योगपीठ हरिद्वार चे मुख्य केंद्रीय प्रभारी स्वामी परमार्थ देवजी यांचे योग शिबिराचे आयोजन मॉर्डन हायस्कूलच्या ग्राउंड वर दि. ७ ते ९ मार्च या दरम्यान आयोजित करण्यात आलेले आहे अशी माहिती मुख्य योग शिक्षक कथा जिल्हा प्रभारी पतंजली योग समिती (कोल्हापूर )चे विजय पोवार यांनी दिली.**

योगऋषी परमपूज्य स्वामीजी रामदेवजी यांचे परम शिष्य व मुख्य केंद्रीय प्रभारी पतंजली योगपीठ, हरिद्वार यांच्या सानिध्यात इचलकरंजी शहरांमध्ये मॉर्डन हायस्कूलचे ग्राउंडवर इंटिग्रेटेड योग, विज्ञान शिबिर दिनांक ७ ते ९मार्च रोजी मॉर्डन हायस्कूलच्या ग्राउंडवर संपन्न होत आहे.या शिबिरासाठी मुख्य प्रयोजक रोटरी क्लब आहेत.या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन विजय पोवार यांनी केले आहे.



मराठी दिनानिमित्त मनसेच्या वतीने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी घेतलेले छायाचित्र

## मराठी भाषा दिनानिमित्त निबंध स्पर्धा उत्साहात

इचलकरंजी, ता.२८–

**मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने छ. शिवाजी महाराज उद्यान येथे निबंध स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले.**

हा कार्यक्रम रवी गोंदकर, मनसे इचलकरंजी शहर अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडला. स्पर्धेत ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धा तीन विभागांमध्ये घेण्यात आली.स्पर्धेचे परीक्षण प्रफुल कुमार सातपुते यांनी केले.स्पर्धेत प्रथम क्रमांक पुढीलप्रमाणे त्यामध्ये कु. निलम किरण स्वामी (इयत्ता ७ वी), शिवराज संजय महिंद्रकर (इयत्ता९ वी) व खुला गटामध्ये गौतम गणेश साळुंखे यांनी क्रमांक मिळवला. या कार्यक्रमास जिल्हा सचिव प्रताप पाटील, नगरसेवक शिवाजी पाटील, मनोहर जोशी, अभिषेक सारडा, ऋषिकेश मराठे, संदीप पवार, रोहित कोटकर, रसिका साळुंखे, तन्मय तांबे, अश्विनी अरुण गोंदकर,अर्जुन माळी, नरेंद्र गोंदकर, सिद्धार्थ अजेटराव, अतुल जाधव, उमेश दरबे, रमेश पसलादी,सचिन माने,अरुण माळी, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच प्राध्यापक युवराज मोहिते आणि लेखक अशोक जाधव, अखिल खानापुरे ,यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## विश्व मराठी साहित्य संमेलनात आपटे वाचन मंदिराचा सन्मान

इचलकरंजी,ता.२८–

**शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी आपटे वाचन मंदिराचा नाशिक येथे कविवर्य कुसुमाग्रज नगरीत सुरू असलेल्या चौथ्या मराठी विश्व संमेलनात सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र शासनातर्फे मराठी भाषा संवर्धनासाठी काम करणारी संस्था म्हणून डॉ.अशोक केळकर मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार आपटे वाचन मंदिरास प्रदान करण्यात आला.**



आपटे वाचन मंदिरच्या अध्यक्षा सौ. सुषमा दातार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना शेजारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते ग्रंथालयाच्या अध्यक्षा सुषमा दातार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. रुपये दोन लाख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी त्यांच्या भाषणात आपटे वाचन मंदिराच्या कार्याचा गौरव केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आपटे वाचन मंदिराने ७० हजाराहून अधिक ग्रंथांचे जतन केले असल्याचे आवर्जून नमूद केले. यावेळी शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे साहित्य भूषण पुरस्कार भालचंद्र नेमाडे यांना तर विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना देण्यात आला.

राज्य शासनाच्या विविध साहित्य पुरस्कारांचे यावेळी वितरण करण्यात आले. मराठी भाषा मंत्री उदय सामंत, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, मंत्री गिरीश महाजन यांच्यासह विविध मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. आपटे वाचन मंदिराचे उपाध्यक्ष काशिनाथ जगदाळे, कार्यवाह प्रा. मोहन पुजारी, संचालक माया कुलकर्णी हे ग्रंथालयातर्फे उपस्थित होते.

## श्रीपेवाडी इलेक्ट्रोसल कंपनीचा एमएसएमई पुरस्काराने सन्मान




बेळगावः मान्यवरांकडून पुरस्कार स्विकारताना कंपनीचे डायरेक्टर तुळशीदास साळुंखे.

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

**श्रीपेवाडी येथील इलेक्ट्रोसल हायटेक प्रा.लि. कंपनीचा बेळगाव येथे लघुउद्योग संघटनेकडून एमएसएमई पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.**

श्रीपेवाडी ता.निपाणी येथे इलेक्ट्रोसल कंपनी सन–२०१३ पासून इलेक्ट्रॉनिक्स मधील विविध उत्पादन क्षेत्रामध्ये यशस्वीपणे काम करीत आहे.या कंपनीने या क्षेत्रात उत्कृष्ट काम केले असून याची दखल घेऊन या कंपनीला बेळगाव जिल्हा लघुउद्योग संघटनेने सदरचा पुरस्कार प्रदान केला आहे.या कंपनीने उत्कृष्ट प्रगती केली असून कंपनीने रोजगार निर्माण केला आहे.तसेच विदेशात या कंपनीचे ग्राहक आहेत.

बेळगाव येथे कंपनीचे डायरेक्टर तुळशीदास साळुंखे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.याप्रसंगी आर.व्ही.गुमास्ते,चंद्रशेखर डोली, सत्यनारायण भट, राम भंडारे, नितीन लांडगे, सतीश नेर्लेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून महात्मा बसवेश्वर संस्था कार्यरत

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

**महात्मा बसवेश्वर संस्थेने सहकारात पारदर्शकता कायम ठेवली आहे.त्यामुळेच ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास वाढला आहे.ग्राहकांशी केवळ व्यावहारिक नाते न ठेवता सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून संस्था कार्यरत आहे.असे प्रतिपादन संस्थेचे संस्थापक डॉ. सी.बी. कुरबेट्टी यांनी केले.**

येथील महात्मा बसवेश्वर क्रेडिट सौहार्द सहकारी संस्था व सिद्धगिरी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, कणेरी यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या ३६ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी मोफत आरोग्य तपासणी शिबिर पार पडले.येथील चिकोडी रोडवरील संस्थेच्या मुख्य कार्यालयात पार पडलेल्या या शिबिराला शहर व ग्रामीण भागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रारंभी संस्थेचे चेअरमन किशोर बाळी यांनी कार्यक्रमाचे प्रमुख प्राणलिंग स्वामीजी व उपस्थित मान्यवर तसेच विविध तज्ञ डॉक्टर्स व कर्मचारी सिद्धगिरी हॉस्पिटल कणेरी यांचे स्वागत केले. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे संचालक महेश बागेवाडी यांनी श्रीफळ वाढवून केले. तसेच कार्यक्रमाचे द्वीपप्रज्वलन प्राणलिंग स्वामीजी तसेच संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि संचालक मंडळ व सिद्धगिरी हॉस्पिटलचे डॉक्टर्स व कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आले.आरोग्य शिबिरामध्ये जवळजवळ २५० रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला. कार्यक्रमास संस्थेचे संचालक प्रताप पट्टणशेट्टी , डॉ.एस.आर.पाटील, ,श्रीकांत परमने, सुरेश शेट्टी, अशोक लिगाडे, दिनेश पाटील, राजेश पाटील, संचालिका पुष्पा कुरबेट्टी, विजया शेट्टी, सुवर्णा पट्टणशेट्टी, सीईओ एस.के.आदन्नावर, महेश शेट्टी, विद्या कमते,महादेव बडगीर, भद्रेश फुटाणे व कर्मचारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन सुजाता जाधव,राजेंद्र मगदूम यांनी केले. तर आभार सुरज घोडके यांनी मानले.

### डॉ.सी.बी.कुरबेट्टी : आरोग्य शिबीरास प्रतिसाद



निपाणी : शिबीर उद्घाटनप्रसंगी प्राणलिंग स्वामीजी, संस्थापक डॉ.सी.बी.कुरबेट्टी,अध्यक्ष किशोर बाळी व इतर.

## निपाणी–चिकोडी रोडवर कारच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

**निपाणी– चिकोडी मार्गावर पट्टणकुडी हद्दीत दाईगडे मळ्याजवळ कारने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात प्रकाश आप्पासाहेब मालवाडे (वय ४८) रा.चिंचणी हे गंभीर जखमी झाले.हा अपघात शुक्रवारी दुपारी झाला.घटनेची नोंद खडकलाट पोलिसात झाली आहे.**

जखमी प्रकाश मालवाडे हे निपाणीत एका सहकारी संस्थेत कामावर होते.ते चिकोडीहुन निपाणीकडे दुचाकीवरून कामानिमित येत होते.दरम्यान त्यांच्या दुचाकीला निपाणीहून राजीव गांधी हाऊसिंग सोसायटीकडे जात असलेल्या कारने धडक दिली.यावेळी दुचाकीस्वार असलेले प्रकाश मालवाडे हे जोराने खाली आपटल्याने गंभीर जखमी झाले.त्यांना कोल्हापूर येथे दाखल करण्यात आले आहे.

## मलकापूरातील अवैध व्यवसाय करणाऱ्या हॉटेलवर छापा

### बांगलादेशी महिलेसह चारजणी ताब्यात

कराड,ता.२८(प्रतिनिधी)–

**अवैध वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या मलकापूर, ता. कराड येथील हॉटेल अयोध्या लॉजिंगवर पोलीस उपाधीक्षक पथक व कराड शहर पोलिसांनी संयुक्तरीत्या कारवाई करत छापा टाकला. यात वेश्या व्यवसाय करणाऱ्या चार महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतली असून, त्यातील एक महिला बांगलादेशी असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे कराडमध्ये अजूनही बेकायदेशीररित्या बांगलादेश नागरिक वास्तव्यास असल्याचे सिद्ध झाले आहे.**

याप्रकरणी लॉज चालकावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय शरद पुजारी (वय २७) रा. कमळेश्वर मंदिर मंगळवार पेठ, कराड असे गुन्हा दाखल झालेल्या लॉज चालकाचे नाव आहे.

मलकापूर ता. कराड गावच्या हद्दीत अवैध वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलीस उपाधीक्षक राजश्री पाटील यांना मिळाली. कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्या अनुषंगाने पोलीस पथकाने बनावट गिऱ्हाईक संबंधित हॉटेल अयोध्या लॉजिंग येथे पाठवून दिले असता तेथे अवैध व्यवसाय सुरू असल्याची पोलिसांना खात्री झाली. त्यानंतर पोलिसांनी लगेच तेथे छापा टाकला असता लॉजिंगचा चालक अक्षय पुजारी हा तेथील व्यवहार पाहत असल्याचे समोर आले. पोलिसांनी लॉजमधील रूमची झडती घेतली असता तेथील रूममध्ये चार महिला मिळून आल्या. त्यापैकी एक महिला बांगलादेशी असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी बांगलोदशी महिलेकडील दोन मोबाईल, आधारकार्ड असा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान, या छाप्यात सापडलेली एक महिला बांगलादेशी असून, तिने मुंबई येथून दुसऱ्या नावाने आधारकार्ड तयार करून ती कराडमध्ये वास्तव्य करीत होती. पोलीस तपासात तिने तिच्या मूळ नावाची कबुली दिली .


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (SRM E-Tender) from registered contractors/suppliers on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works under 400kV R.S.Division Talandage.

| Sr. No. | RFX No. | Description of work | Tender Amount in Rs. (Incl. Tax) | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | 7000039064 | Work of Supply, Installation, Testing & Commissioning of ESE type L-CAT System at 400 KV RS Division, Talandage | Limited to Rs. 34,14,290/-only including all taxes | 34,142.90/- |

**Last date for submission of Bids online is up to 14.03.2026 up to 23:59 hrs**
**Note: -** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E—Tendering portal.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R. S. Division Talandage**

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**वीज बंद निवेदन**

म.रा.वि.वितरण कंपनीच्या मंडल कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ग्राहकांना सुचित करण्यात येते अतिशय तातडीच्या दुरुस्तीच्या व देखभालीच्या कामामुळे दिनांक **०२.०३.२०२६** रोजी खालील भागातील व आसपास परिसरातील वीज बंद राहणार आहे. तरी ग्राहकांनी सहकार्य करावे. वीज पुरवठा कामाच्या वेळेनुसार दिलेल्या वेळेपूर्वी किंवा नंतर पूर्ववत होऊ शकतो.

| | |
|---|---|
| १ | **३३ केव्ही ओल्ड लक्ष्मी वाहिनी (कालावधी: स. १0.00 ते दु. १४.00) बाधीत क्षेत्र:** ३३ केव्ही ओल्ड लक्ष्मी वाहिनीवरून पुरवठा होणारे सर्व ग्राहक |
| २ | **३३ केव्ही आवळी वाहिनी (कालावधी: स. १0.00 ते सायं. १७.00) बाधीत क्षेत्र:** वाळवा बुद्रुक, वाळवा खुर्द, पालकरवाडी, बेलवळे बुद्रुक, बेलवळे खुर्द, चंद्रे, चांदेकर वाडी, अर्जुनवाडा, ठिकपुर्ली, शेळेवाडी |
| ३ | **३३ केव्ही कागल वाहिनी (कालावधी: स. १0.00 ते सायं. १८.00) बाधीत क्षेत्र:** कागल |
| ४ | **३३ केव्ही अब्दुल लाट वाहिनी (कालावधी: स. १0.00 ते दु. १२.00) बाधीत क्षेत्र:** अब्दुल लाट, लाटवाडी, सत्यराज टेक्सटाईल पार्क, इचलकरंजी वाटर वर्क्स. |
| ५ | **३३ केव्ही शिरढोण वाहिनी (कालावधी: दु. १२.00 ते दु. १४.00) बाधीत क्षेत्र:** शिरढोण, टाकवडे. |

**कोप/पीआरओ नं. २९९/२०२५–२६** **अधीक्षक अभियंता (कोमं), कोल्हापूर**


## सार्वजनिक सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की **बाटलीबॉय रिनिव्हेबल एनर्जी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** (BRENSOL) आणि त्यांच्या समूह कंपन्यांनी खालील नमूद व्यक्तीस कोणतेही कागदपत्रे स्वीकारणे, आर्थिक व्यवहार करणे, रक्कम गोळा करणे किंवा कंपनीचे प्रतिनिधित्व करणे यासाठी कोणत्याही प्रकारे अधिकृत केलेले नाही.



जर खालील व्यक्तीशी कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार, देण्या–घेण्याचा व्यवहार किंवा संपर्क करण्यात आला, तर त्यासंबंधी बाटलीबॉय रिनिव्हेबल एनर्जी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (BRENSOL) किंवा त्यांच्या समूह कंपन्या कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

**व्यक्तीचे तपशील :**
नाव : श्री. कैय्यम कादर शेख
वडिलांचे नाव : कादर शेख
वय : ३६ वर्षे
पत्ता : सहारा मल्टीपर्पज हॉल, ५, सहारा नगर – ३, मजरेवाडी, व्हीटीसी, सोलापूर उत्तर,
पोस्ट : जिल्हा न्यायालय सोलापूर, तालुका : सोलापूर उत्तर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र – ४१३००३

**आपला विश्वासू,**
**Authorized Signatory**





# संघर्षातून कार्याचा ठसा उमटवणारे उत्तुंग व्यक्तीमत्व - उत्तम पाटील

**बेळगाव जिल्हा हा नेहमी दिग्गज नेत्यांच्या कर्तृत्व आणि नेतृत्वाने राज्याच्या राजकारणात आघाडीवर राहिला. ही परंपरा अनेक नेत्यांनी शून्यातून सुरू करून जीवनाच्या अखेरपर्यंत जपले .या परंपरेत स्वर्गीय रावसाहेब पाटील यांनी राजकारण व समाजकारणाला महत्त्व दिले. आज त्यांच्या पावलावर पाऊल ठेवीत त्यांचा वसा आणि वारसा जपत युवा नेते उत्तम पाटील यांनी कर्तृत्वाने जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात नेतृत्वासारखे काम करीत आहेत.अनेक दिग्गज नेत्यांनी उत्तम पाटील यांचे कार्य, कर्तृत्व व नेतृत्व पाहून त्यांना उज्वल भविष्य असल्याचे वक्तव्य केले आहे. यामुळे जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची ताकद त्यांच्यात आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.आज ता.१ मार्च रोजी त्यांचा वाढदिवस. त्यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांच्या कार्याचा घेण्यात आलेला आढावा....**

स्वर्गीय रावसाहेब पाटील यांचे जीवन अतिशय संघर्षमय ठरले. त्यांना अनेक वर्षे संघर्ष करावा लागला. सहकार क्षेत्रात काम करताना त्यांना अनेक अडीअडचणी आल्या. पण संधी मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. रावसाहेब पाटील यांचा दानशूरपणा संपूर्ण कर्नाटक व महाराष्ट्रात परिचित आहे. त्यांचेच विचार डोळ्यासमोर ठेवून संपूर्ण निपाणी मतदारसंघात उत्तम पाटील व अभिनंदन पाटील कार्य करीत आहेत. विकास आणि प्रगती एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र, या दोन्ही घटकांनी एकमेकांना पूरक म्हणून काम करायला हवा. हे जाणण्यासाठी आश्वासक ठरतो तो विकासाचा भविष्यवेधी दृष्टीकोन .नेमका हाच समतोल भविष्यवेधी विशाल दृष्टिकोन व कौशल्य बाळगून आणि संवाद तसेच सर्व समावेशकतेच्या आधारे कार्य ध्येयापर्यंत तडीस नेणारे चतुरस्त्र व्यक्तीमत्व म्हणजेच उत्तम पाटील. एक प्रभावी नेतृत्व कार्यकर्त्यांचे आवडलेले नेते,उच्चभूषित ,दृढनिर्धार ,उत्तुंग महत्त्वकांक्षा शिस्तबद्ध नियोजन ,भविष्यात वेध घेणारे दूरदृष्टी असे नेतृत्वाची विविध अंग असलेली युवा नेते उत्तम पाटील यांची ओळख सर्वश्रुत आहे. उत्तम पाटील म्हटले की, आपल्या डोळ्यासमोर फक्त राजकारण येते .पण त्या पलीकडे त्यांचे सर्व क्षेत्रातील कार्य आणि त्यात त्यांनी दिलेले योगदान नेहमीच मोठे आहे.

मतदार संघात ज्या ज्या वेळी नैसर्गिक आपत्ती आली, संकट आली. त्यावेळी उत्तम पाटील यांनी पक्ष, जात, धर्म असा भेदभाव वगैरे काही न पाहता प्रत्यक्ष जाऊन लोकांना मदत केली. आपल्या वडिलांचा विचारांचा वारसा घेऊन त्यांनी गोरगरीब दिन दुबळ्या लोकांना नेहमीच मदत केली.प्रसंगी त्यांनी आपल्या जीवाची पर्वा देखील केली नाही. कोरोनाच्या पहिल्या संकटावेळी त्यांनी अनेक कामे केले. दुसऱ्या लाटेतही त्यांनी लोकांना मदतीचा हात दिला. शिक्षण,आरोग्य,शेती, उद्योग आणि रोजगाराच्या क्षेत्रात मतदार संघात त्यांनी अनेकांना मदत केली आहे. अरिहंत उद्योग समूहाच्या माध्यमातून हजारो युवकांना शिक्षण व रोजगारच्या संधी उपलब्ध झाल्या.राजकीय दबाव, विरोधकाची टीका आणि असंख्य अडचणी असूनही त्यांनी कधीही धैर्य सोडले नाही. सेवा, संघर्ष आणि समर्पण हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ओळख.

वडील स्वर्गीय रावसाहेब पाटील व श्रीमती मीनाक्षी पाटील यांच्या संस्कारातून उत्तम पाटील यांनी सेवा, शिस्त ,संवेदनशीलता आणि नेतृत्व ही मूल्ये आत्मसात केली. वडिलांचा समृद्ध वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत. पूर , दुष्काळ, अतिवृष्टी प्रत्येक संकटात ते जनतेसाठी देवदूत ठरले. अनेक समाज उपयोगी व शाश्वत विकास कामांना प्राधान्य देत नेतृत्व म्हणजे सेवा हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले.गेल्या काही वर्षांपासून उत्तम पाटील यांच्या नेतृत्व व कर्तृत्वाचा आलेख पाहताना त्यांच्यातील गुणांचा साठा मनामध्ये साठवून ठेवावा असाच आहे. त्यांच्या नेतृत्त्वातील गुण सर्व क्षेत्राला मार्गदर्शक व विकासाचे मार्ग दाखविणारे आहेत. रावसाहेब पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली काम करत असताना त्यांच्या कामाची विशिष्ट शैली, दूरदृष्टी, जनतेच्या उज्वल भविष्याची त्यांच्या मनातील तळमळ वेळोवेळी प्रकर्षाने जाणवत आली आहे.

**शब्दांची धार, भारदस्त व्यक्तिमत्त्व**

प्रत्येक काम आव्हानात्मक म्हणून स्वीकारावे आणि त्या आव्हानांवर बुद्धीमत्तेच्या जोरावर विजय मिळवायचा हे गमक उत्तम पाटील यांच्या कर्तृत्वातून वेळोवेळी दिसून येते.

स्वच्छ कारभार व विकासाच्या गतिमान कल्पनेतून आपल्या कार्याचा वेगळा ठसा त्यांनी जिल्ह्याच्या पटलावर उमटविला आहे, याचा अभिमान निश्चितच निपाणी तालुक्यातील जनतेला आहे. शब्दांची धार, भारदस्त व्यक्तिमत्त्व, रोखठोकपणा, सामाजिक जाण आणि स्पष्टवक्तेपणा या पाच सुत्रांमुळे युवकांच्या मनातील उत्तम पाटील हे ताईत बनले आहेत.

**नियोजनबध्द कामाचा हातखंडा**

उत्तम पाटील हे वडिलांचे मार्गदर्शन व आई मीनाक्षी पाटील यांच्या संस्कारानुसार अल्पवयातच सहकार, शिक्षण, धार्मिक, राजकीय क्षेत्रात आगळा वेगळा ठसा उमटवत आहेत. दादांनी दिलेले प्रत्येक काम नेहमी नियोजनाने पूर्ण करण्यात उत्तम पाटील यांचा हातखंडा आहे. दूध संघ, प्राथमिक कृषी पतीन संघावर संचालक म्हणून काम करताना त्यांनी शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचे कार्य केले. शेतकऱ्यांना बँकेतून पत देऊन त्यांची आर्थिक पत सुधारली. विविध उल्लेखनीय कार्य करीत असल्याने सर्व संचालक मंडळाने त्यांची पीकेपीएसचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड केली.

बेळगाव जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून मोठी पत निर्माण करून दिल्याने सामान्य सभासद व शेतकऱ्यांना फायदा झाला. जिल्हा बँकेकडून मोठ्या प्रमाणात पत मिळविताना उत्तम पाटील यांचे मोठे कौशल्य पहावयास मिळाले. गावातील अनेक महिला स्वसाहाय्य संघांना कोट्यवधी रुपयांचे कर्ज देऊन महिलांना स्वावलंबी बनविले. गावात वस्त्रोद्योग सुरु व्हावा, यंत्रमाग कामगारांना गावातच रोजगार मिळावा, यासाठी ३ टक्के व्याजदराने कर्ज दिले. कृषी संघामार्फत गारमेंट व्यवसाय सुरू करून महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला.अशा कर्तृत्वान,महत्वकांक्षी नेतृत्वाला म्हणजेच उत्तम पाटील यांना वाढदिवसाच्या मनपूर्वक शुभेच्छा....

**श्यामलिंग किल्लेदार, बोरगांव**

